CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT


सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, ४ सप्टेंबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २९६ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपल्या देशातील जनतेत देशप्रेम व एकात्मता जोपर्यंत निर्माण होत नाही, तोपर्यंत स्वातंत्र्य प्राप्त होऊनही ते टिकणारे नव्हते, म्हणून समाज संघटित करण्याची कल्पना पू. डॉ. हेडगेवार यांनी मोठ मोठ्या पुढाऱ्यांसमोर मांडली. पण सगळ्यांनी ती अशक्य म्हणून झिडकारली. शेवटी स्वत: डॉक्टरांनीच मूठभर शिशू हाताशी घेऊन संघकार्य सुरू केले. आज त्याचेच भव्य स्वरूप आपणास दिसते आहे. याहूनही भव्य व मोठी कार्ये आपणास करायची आहेत.

**- भाऊराव देवरस**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

# ‘ओबीसीं’साठी मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना

### राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**◆ मुंबई, ३ सप्टेंबर**

मराठा आरक्षणाचे परिपत्रक काढल्यानंतर ‘ओबीसी’ वर्गात प्रचंड अस्वस्थता निर्माण झाल्यानंतर राज्यभरात ठिकठिकाणी आंदोलने सुरू झाली आहेत. त्यामुळे ‘ओबीसी’ वर्गाची समजूत काढण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्याचा निर्णय बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.


ओबीसी समाजासाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय यापूर्वी झालेल्या मागणीनुसार घेण्यात आल्याची माहिती मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. माध्यमांशी संवाद साधताना गुलाबराव पाटील म्हणाले की, ओबीसी समाजासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करावी, अशी मागणी यापूर्वी बरेचदा करण्यात आली होती. त्यावेळी ही समिती पंधरवड्यात स्थापन करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. या मागणीला अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार या उपसमितीत प्रत्येक पक्षाचे मंत्री असतील. या उपसमितीच्या कार्यक्षेत्राची सूची काही दिवसातच जाहीर केली जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

**उपसमितीचे अध्यक्षपद चंद्रशेखर बावनकुळेंकडे**

ओबीसी समाजासाठी स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्षपद राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे देण्यात आले आहे. या समितीत भाजपाचे चार, तर शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रत्येकी दोन सदस्य असतील. छगन भुजबळ, गणेश नाईक, गुलाबराव पाटील, संजय राठोड, पंकजा मुंडे, अतुल सावे, दत्तात्रय भरणे हे समितीचे सदस्य असतील, अशी खात्रिलायक माहिती आहे.

◀(तभा वृत्तसेवा)

### मंत्रिमंडळाच्या बैठकीवर भुजबळांचा बहिष्कार



मराठा समाजाच्या आरक्षणाचे परिपत्रक काढल्याने हा निर्णय ओबीसींवर अन्यायकरणारा असल्यामुळे राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ हे नाराज असून, त्यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार टाकून आपली नाराजी व्यक्त केली.

### न्यायालयात दाद मागू : भुजबळ

सरकारने काढलेल्या परिपत्रकाबाबत ओबीसी नेते, कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. आमची याबाबत विधितज्ज्ञांसोबत चर्चा सुरू आहे. वेळप्रसंगी न्यायालयात दाद मागू. उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयात जाण्याची आमची तयारी असल्याचे मत मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले. आंदोलने, उपोषण स्थगित करण्याचे आवाहन त्यांनी ओबीसी कार्यकर्त्यांना केले आहे.

# सार्वजनिक मालमत्तेची नुकसान भरपाई कोण करणार?

- शपथपत्र दाखल करा
- न्यायालयाचा आंदोलकांना आदेश



**मुंबई, ३ सप्टेंबर**

आंदोलन काळात मुंबईत आंदोलनकर्त्यांनी केलेल्या सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई कोणाकडून करायची, असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाने आंदोलनकर्त्यांच्या वकिलांना केला. यासंदर्भात नुकसान भरपाईबाबत प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करण्याचा आदेश दिला.

उच्च न्यायालयात बुधवारी तिसऱ्या दिवशी पुन्हा सुनावणी पार पडली. या सुनावणीवेळी पाच दिवसांच्या मराठा आंदोलनदरम्यान मुंबईत झालेल्या सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसान भरपाईचे काय, असा सवाल न्यायालयाने विचारला. प्रभारी मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्या. आरती साठे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी मराठा आंदोलन सरकारच्या मध्यस्थीने संपल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आली. यानंतर न्यायालयाने मराठा आंदोलन काळात मोठ्या प्रमाणात सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे. त्याची भरपाई कोणाकडून वसूल करणार, असा प्रश्न उपस्थित केला.

न्यायालयाच्या प्रश्नावर मराठा आंदोलकांच्या वकिलांनी सांगितले की, पोलिसांनी या प्रकरणी काही गुन्हे दाखल केले आहेत. त्याद्वारे भरपाईचा मुद्दा निकाली काढला जाईल. मात्र, आंदोलकांनी रस्ते, पदपथ, बस आणि रेल्वे स्थानके अडवण्यापलिकडे काहीही नुकसान केलेले नाही, असा दावा करण्यात आला.

मराठा आंदोलकांच्या वकिलांनी केलेल्या दाव्यानंतर न्यायालयाने काही छायाचित्रे दाखवले आणि या छायाचित्रात नुकसान झाल्याचे दिसत असल्याचे म्हटले. तसेच, समन्वयाचा अभाव किंवा अन्य कारणामुळे हे सगळे घडले असावे. परंतु, नुकसान झाल्याचे छायाचित्रातून दिसत आहे, असा पुनरुच्चार न्यायालयाने केला. यावर आंदोलकांच्या वकिलांनी आंदोलकांनी सार्वजनिक मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे नुकसान केले नसल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मात्र, न्यायालयाने नुकसान भरपाईबाबत प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करण्याचा आदेश आंदोलकांच्या वकिलांना दिले.

## महत्त्वाचे

### चॅटजीपीटीचे काम ठप्प; वापरकर्त्यांचा गदारोळ

**नवी दिल्ली** : जगप्रसिद्ध एआय चॅटबॉट चॅटजीपीटी पुन्हा एकदा तांत्रिक समस्यांना तोंड देत आहे. वापरकर्त्यांनी सोशल मीडियावर याबद्दल तक्रारी करण्यास सुरुवात केली आहे. नेटवर्क त्रुटी आणि सेवा बंद पडल्याने अनेक लोक त्रस्त आहेत. ऑनलाईन सेवा स्थिती ट्रॅक करणाऱ्या वेबसाइटवर फक्त २० मिनिटांत शेकडो तक्रारी नोंदवल्या गेल्या आहेत. यापैकी, एकट्या भारतातील ४३९ पेक्षा जास्त वापरकर्त्यांनी काम करत नसल्याचे नोंदवले आहे.

# ‘टीआरएफ’ला मलेशियातून दहशतवादासाठी निधी!

### एनआयए तपासातून समोर आली माहिती

**◆ नवी दिल्ली, ३ सप्टेंबर**

लष्कर-ए-तोयबाची उपसंघटना ‘द रेझिस्टन्स फोर्स’ अर्थात् टीआरएफच्या विरोधात राष्ट्रीय तपास संस्था (एनआयएने) महत्त्वपूर्ण पुरावे गोळा केले आहेत. या संघटनेला मलेशियातून दहशतवादासाठी निधी मिळत असल्याचे एनआयएच्या तपासातून समोर आले.

श्रीनगर येथील एका व्यक्तीच्या मोबाईलमधून एनआयएने ४५० पेक्षा जास्त क्रमांक असलेली संपर्क यादी मिळवली. यात टीआरएफला निधी उपलब्ध करून देणाऱ्यांची ओळख पटवण्यात आली. पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी सुरुवातीला टीआरएफने घेतली. नंतर टीआरएफ मागे हटली होती. मलेशियातून हवालामार्गे टीआरएफला दहशतवादासाठी निधी मिळत असल्याचे एनआयएच्या तपासातून समोर आले.

◀(वृत्तसंस्था)

# ५ आणि १८ टक्क्यांचा स्लॅब राहणार

- नवीन जीएसटीची २२ पासून अंमलबजावणी
- २५०० रुपयांच्या आतील चप्पल, बुटांवर ५ टक्के कर

**◆ नवी दिल्ली, ३ सप्टेंबर**

संपूर्ण देशाचे सध्या सुरू असलेल्या जीएसटी परिषदेकडे लक्ष लागले आहे. जीएसटी कौन्सिलने बुधवारी १२ आणि २८ टक्के स्लॅब रद्द करण्याचा आणि या स्लॅबमधून बहुतेक वस्तू अनुक्रमे ५ आणि १८ टक्के स्लॅबमध्ये हलवण्याचा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती सूत्रांनी दिली. याबाबतच्या निर्णयाची अधिकृत माहिती गुरुवारी दिली जाईल.



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांच्या अध्यक्षतेखाली आणि राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या उपस्थितीत ही परिषद होत आहे. महागाईने होरपळलेल्या जनतेला जीएसटी कमी झाल्याने मोठा दिलासा मिळणार आहे. जीएसटी कौन्सिलने २५०० रुपयांपर्यंतच्या पादत्राणे आणि कपड्यांवरील जीएसटी दर कमी करून ५ टक्के करण्यास मंजुरी दिली असल्याचे सांगितले जात आहे.

सध्या, १,००० रुपयांपर्यंतच्या पादत्राणे आणि कपड्यांवर ५ टक्के कर आकारला जातो. या मर्यादिपलीकडे, १२ टक्के वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) आकारला जातो. आता ५ टक्के हा कर स्लॅब २५०० पर्यंतच्या चप्पल आणि कपड्यांवर आकारला जाणार आहे. यामुळे शॉपिंग करणाऱ्यांसह ही उत्पादने बनविणाऱ्या कंपन्यांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

◀(वृत्तसंस्था)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...




### प्रशांत अरबाळे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी

**सोलापूर, दि, ३ सप्टेंबर-**

अक्कलकोट तालुक्याचे प्रभारी गटशिक्षण अधिकारी यांनी उप शिक्षण अधिकारी या पदावर जाण्यासाठी शासनाच्या नियमांचे उल्लंघन केला आहे. पाच वर्षे विस्तार अधिकारी अनुभव नसताना उपशिक्षण अधिकारी परीक्षा दिल्याने त्यांचे पद रद्द करण्यात यावे म्हणून त्यांच्यावर कारवाई करण्याचे निवेदन मागासवर्गीय शिक्षक संघटना अध्यक्ष महांतेश्वर कट्टीमनी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षण अधिकारी यांना दिली आहे. प्रशांत अरबाळे यांचे सातारा जिल्ह्यात शिक्षण विस्तारधिकारी म्हणून २०१३ मध्ये निवड झाले होते, निवड झाल्यानंतर सलग पाच वर्ष सेवा केल्यानंतर लोकसेवा आयोगाकडून उपशिक्षण अधिकारी पदासाठी पात्र ठरतो . विस्तार अधिकारी म्हणून पाच वर्षे सेवा पूर्ण नसताना उपशिक्षणाधिकारीचे अर्ज भरले होते . म्हणून सेवा पाच वर्ष नसल्याने अनुभव कमी म्हणून शिक्षण अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांनी विभागीय आयुक्तांना कळविले आहे. सोलापूर जिल्ह्यातील शिक्षणा विस्तार अधिकारी सुद्धा शिक्षणाधिकारी कडे अनुभव कमी म्हणून पत्र दिले आहे . तरी शिक्षण अधिकारी यांनी अरबळे यांचे कागदपत्रांची तपासणी करून योग्य निर्णय घ्यावे असे निवेदनात म्हटले आहे.

### सोनाली भोसले यांची महाराष्ट्र प्रदेश मुख्य कार्यकारी अध्यक्षपदी निवड

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

अंत्रोळी (ता.दक्षिण सोलापूर) येथील सामाजिक कार्यकर्त्या सोनाली भोसले यांची अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी प्रदेश मुख्य कार्यकारी अध्यक्ष युवती विभाग पदी निवड केली आहे. त्यांच्या निवडीबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.



### सेवानिवृत्त चतुर्थ श्रेणी सेवकांच्या अर्जित रजेची रक्कम द्यावी; महापालिका आयुक्तांना निवेदन

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

सेवानिवृत्त चतुर्थ श्रेणीतील सेवकांची अर्जित रजेची रक्कम तात्काळ द्यावी यासह विविध मागण्यांचे निवेदन अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस संघटनेच्या वतीने महापालिका आयुक्तांना देण्यात आले. महापालिकेतील सर्व कर्मचारी - अधिकाऱ्यांना मेडीकल कॅशलेस योजना चालू करावी. दि. ११ ऑगष्ट २०२५ च्या शासन निर्णयाप्रमाणे महागाई भत्ता लागू करण्यात यावा. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२०-२१ च्या सातव्या वेतनाचा फरक देण्यात यावा. बदली सफाई कामगारांना शासन नियमा प्रमाणे कायम करण्यात यावे. १० वर्षे सेवा पूर्ण होण्यापूर्वी मृत्यू झाल्यास त्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना शासन निर्णयाप्रमाणे १० लाख रुपये सानुग्रह अनुदान द्यावे. सन १९७५ पासून च्या शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आदेशान्वये सर्व वारसदारांना मनपा सेवेत सामावून घेण्यात यावे. सातव्या वेतनाचा एक वर्षाचा फरक सेवानिवृत्त सेवकांना रोखीने अदा करणे व सध्या सेवेत असलेल्या सेवकांना दोन टप्यात फरक द्यावा. बदली कामगारांना सातव्या वेतन आयोगा प्रमाणे वेतन अदा करावे. सफाई कामगारांच्या बुधवार पेठ येथील निवासस्थानांची पडझड झाल्यामुळे त्या सेवकांचे इतर ठिकाणी पुनर्वसन करण्यात यावे आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. यावेळी कार्याध्यक्ष श्रीनिवास रामगल, शहर सेक्रेटरी व्यंकटेश देवनल्लू आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# अल्पसंख्यांक शाळांना डिजिटल प्रमाणपत्र सक्तीचे


## प्रमाणपत्र न घेणाऱ्या शाळांचा लाभ होणार बंद

### अल्पसंख्यांक विभागाचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

राज्यातील ज्या अल्पसंख्यांक शाळांनी २०१७ पूर्वी अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त करून घेतला आहे त्या सर्व शाळांसाठी अल्पसंख्यांक विकास विभागाने आदेश काढला असून त्यानुसार त्या शाळाना आपले सरकार संकेतस्थळावर नव्याने अर्ज करून डिजिटल स्वाक्षरीचे दर्जा प्रमाणपत्र घेण्याचे बंधन घालण्यात आले आहे.

११ ऑगस्ट २०२५ पासून पुढील सामान्य अल्पसंख्यांक शाळांना २०१७ पूर्वीची मान्यता असलेल्या संबंधित विभागाकडून अल्पसंख्यांक दर्जा प्राप्तचे नवे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. आता अल्पसंख्यांक सर्व शाळांनी आपले सरकार संकेतस्थळावर अर्ज करून नवे डिजिटल स्वाक्षरीचे दर्जा प्राप्त प्रमाणपत्र घ्यावे , असा आदेश काढण्यात



आला आहे. आदेशानंतरही लाभ घेतल्यास किंवा अधिकाऱ्यांनी या शाळांना नियम घालून लाभ दिल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली जाईल, असा इशारा अल्पसंख्यांक विकास विभागाने दिला आहे. अल्पसंख्यांक विकास विभागाच्या २७ फेब्रुवारीच्या शासन निर्णय २०१७ पूर्वी अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त करून घेतलेल्या शाळांना अर्ज करावा लागणार आहे. विकास विभाग अस्तित्वात येण्यापूर्वी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून शैक्षणिक संस्थांनी धार्मिक, भाषिक दर्जा प्राप्त करून घेतला आहे. संस्थांना सहा महिन्यात डिजिटल स्वाक्षरीचे दर्जाबद्दल प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे अन्यथा संबंधित शैक्षणिक संस्थांची पदोन्नती, २/३ ची मान्यता तसेच इतर मान्यतांचे प्रस्ताव मान्य केले जाणार नाहीत, असे आदेश माध्यमिक शिक्षण विभागाकडूनसुद्धा काढण्यात आले आहेत. त्यामुळे सर्व अल्पसंख्यांक शाळांनी तातडीने आवश्यक कागदपत्रे सादर करून प्रमाणपत्राची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

> **आता मिळणार ऑनलाइन प्रमाणपत्र**
>
> राज्यात जुलै २०१७ पासून अल्पसंख्याक दर्जा मिळविण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. परंतु, त्याआधी सरकारच्या इतर विभागाच्या सक्षम प्राधिकारी यांनी तसेच राष्ट्रीय अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था आयोगाकडूनही कायमस्वरूपी दर्जा प्रमाणपत्र दिले जात होते. अल्पसंख्यांक दर्जाच्या शाळा, महाविद्यालयांना असलेल्या तरतुदींचा गैरवापर होत असल्याच्या तक्रारी सरकारकडे आल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

# मुख्याध्यापक संघाचे पुरस्कार जाहीर

### १४ सप्टेंबरला वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाच्या वतीने देण्यात येणारे ५० पुरस्कार जाहीर झाले. अण्णाप्पा कुंभार यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याचे वितरण रविवारी १४ सप्टेंबरला होणार आहे.

जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाच्या वतीने प्रत्येक वर्षी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील एक शाळा, एक मुख्याध्यापक, एक शिक्षक व एक शिक्षकेतर कर्मचारी असे ४८ पुरस्कार, त्याचबरोबर जिल्ह्यातून कला व क्रीडा शिक्षकांना २ पुरस्कार असे ५० पुरस्कार दिले जातात. मुख्याध्यापक संघाच्या उभारणीत ज्यांनी मोलाचे योगदान दिले आहे, अशा एका सेवानिवृत्त मुख्याध्यापकाला जीवन गौरव पुरस्कार दिला जातो. यावर्षीचा जीवन गौरव पुरस्कार अण्णाराव कुंभार यांना जाहीर करण्यात आला आहे. पुरस्कार वितरण रविवार १४ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता स्वातंत्र्य सेनानी संदिपानदादा गायकवाड सभागृह, मोहोळ येथे माजी आ. राजन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मोहोळ तालुक्याचे आमदार राजा खरे, शिक्षक आ. जयंत आसगावकर ,शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, शिक्षण उपसंचालक डॉ गणपत मोरे यांच्या हस्ते देण्यात येणार आहेत.

सदर कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक महामंडळाचे माजी अध्यक्ष सुभाषराव माने, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, योजना विभागाच्या शिक्षणाधिकारी सुलभा वठारे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे, अशी माहिती सोलापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तानाजी माने यांनी दिली .

# लाळ खुरकुत लसीकरणासाठी ११ लाख लस उपलब्ध

## सर्व जनावरांना लसीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर ..**

केंद्र पुरस्कृत पशुस्वास्थ्य व रोगनियंत्रण कार्यक्रमांतर्गत लाळ खुरकूत प्रतिबंधात्मक लसीकरणाच्या सातव्या फेरीत शिल्लक लसी वापरण्याच्या सूचना पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालयाने दिल्या होत्या. त्यानुसार जिल्ह्यात शिल्लक एक लाख १० हजार लसींमधून लसीकरण सुरू आहे. जिल्ह्यात १२ लाख ५० हजार जनावरे आहेत. लसीकरण मोहिमेला सुरवात होऊन दोन आठवडे उलटल्यानंतर केंद्र सरकारकडून १० लाख १४ हजार ९५० लस देण्यात आले आहेत.

केंद्र पुरस्कृत पशुस्वास्थ्य व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत लाळ प्रतिबंधात्मक लसीकरणाची मोहिम राबविण्यात येत आहे . त्यासाठी शिल्लक लाळ खुरकूत प्रतिबंधात्मक लसींचा साठा वापरण्यात आले असून, उर्वरित लसीकरणासाठी मंगळवारी लस पुरविण्यात आली आहेत , असे पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालयाने कळवले होते. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व जनावरांना लसीकरण करून लाळ खुरकुतमुक्त जिल्हा बनविण्यासाठी पशूसंवर्धन विभाग कामाला लागला आहे . त्यासाठी जिल्ह्यात ११ लाख २४ हजार ९५० लस उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

त्यापैकी पहिल्या टप्यातिल एक लाख १० हजार लसींचे तालुकास्तरावर वितरण केले आहे. पशुवैद्यकीय चिकित्सालय स्तरावर गाय व म्हैसवर्गीय पशुधनास लसीकरण सुरू असून आतापर्यंत सहा हजार ३२४ लसी देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात १२ लाख ५० हजार पशुधन आहे. त्यासाठी ११ लाख २४ हजार ९५० लस उपलब्ध आहेत. सर्व तालुक्यांतील जनावरांना लसीकरण करण्यात येणार असल्याचे पशूसंवर्धन विभागाने सांगितले.

> शिल्लक एक लाख १० हजार लाळ खुरकूत प्रतिबंधात्मक लसीचे तालुकास्तरावर वितरण केले आहे. त्या माध्यमातून लसीकरण मोहीम राबवली जात आहे. पशुधनाच्या संख्येनुसार आणखी ११ लाख लस उपलब्ध झाले आहेत . दोन दिवसात सर्व तालुक्यांना लस वाटप करण्यात येणार आहे. त्यानंतर मोहिमेला गती येईल. पशुधनास लाळ खुरकूतची बाधा झाल्यास तातडीने नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्रास संपर्क साधावा.
>
> **- डॉ. विशाल येवले,**
> **जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, सोलापूर**

# शाश्वत भविष्यासाठी एआयचा वापर करावा

## अभिजित अटले यांचे विचार : एमआयटी डब्ल्यूपीयूत एचएसडब्ल्यू टेक-२०२५ परिषदेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ३ सप्टेंबर-**

हवामान अनुकरण, हवेची गुणवत्ता, त्याची देखरेख, अचूक शेती आणि ऊर्जा ऑप्टिमायझेशनमधील अनुप्रयोगद्वारा एआय हा शाश्वतेला पुढे नेत आहे .त्यामुळे या संधीचा लाभ घेतांना एआयच्या नैतिक आव्हानाबद्दल सावधगिरी बाळगावी. शाश्वत भविष्यासाठी एआय वापरासाठी नाविन्यपूर्ण परंतु जबाबदार मार्गांची कल्पना करणे गरजेचे आहे. तसेच डेटा संरक्षण अत्यंत महत्वाचे आहे.'' असे विचार आयबीएमचे लिड क्लाइंट पार्टनर अभिजित अटले यांनी व्यक्त केले.

'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ इंजिनियरिंग अँण्ड टेक्नॉलॉजी अंतर्गत डिपार्टमेंट ऑफ इलेक्ट्रीकल अँण्ड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियरींग विभागाच्या



वतीने आयईईई इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन सस्टेनेबिलिटी टेक्नॉलॉजी फॉर ह्यूमिनिटी अँण्ड स्मार्ट वर्ल्ड (एचएसडब्ल्यू टेक-२०२५) या विषयावर आयोजित तीन दिवसीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ही परिषद एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनात होत आहे.

यावेळी सन्माननीय अतिथी म्हणून डॉ. सुब्रा कांती दास, आईईआई पुणे विभागाचे सचिव डॉ. अभिजित खुरापे, ब्रॉडकॉमचे वरिष्ठ अभियांत्रिकी व्यवस्थापक सुनील खराटे हे उपस्थित होते. तसेच एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम. चिटणीस, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. भरत काळे, अधिष्ठाता डॉ. सिद्धार्थ चक्रवर्ती, एमआयटी डब्ल्यूपीयू आणि तांत्रिक कार्यक्रम समितीचे वरिष्ठ प्रा. डॉ. भरत चौधरी, एमआयटी डब्ल्यूपीयूच्या इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियरिंग विभागाच्या कार्यक्रम संचालक डॉ. पारूल जाधव व प्रा. डॉ. सुनिल सोमाणी उपस्थित होत्या.

सुनील खराटे यांनी, तंत्रज्ञान आणि सोशल डिझाइनमधील नवीनतम प्रगतीवर एक आकर्षक विचार मांडले. सेमीकंडक्टर स्केलिंग कामगिरी, कार्यक्षमता आणि एकत्रीकरण कसे चालवते हे स्पष्ट केले. डिझाइन, पडताळणी आणि ऑप्टिमायझेशनमधील आव्हानांवर प्रकाश टाकला. आयओटी, ५जी, आरई सर्किट डिझाइनच्या वाढत्या भूमिकेवर भर देऊन चिप इनोव्हेशनला चालना देण्यात ब्रॉडकॉमच्या नेतृत्वाची भूमिका सामायिक केली. सेमीकंडक्अर डिझाइनमध्ये एआय आणि ऑटोमेशनचा प्रभाव किती खोलवर आहे हे सांगितले. एलटीआय माइंडट्रीचे उपाध्यक्ष आणि जागतिक वितरण प्रमुख निखिल दातार यांनी ग्रीन एआय आणि तंत्रज्ञानाचे अध्यात्माशी एकत्रीकरण यावर भाष्य केले. डॉ. सुब्राकांती दास यांनी भविष्य निर्मितीसाठी एआयचा वापर यावर भाष्य केले. त्यांनतर डॉ. आर.एम. चिटणीस, डॉ. भरत काळे, डॉ. भरत चौधरी, डॉ. सिद्धार्थ चक्रवर्ती यांनी अक्षय ऊर्जा प्रणाली, स्मार्ट ग्रिड, एआय चलित हवामान मॉडेलिंग, आयओटी आधारित अचूक शेती आणि हरित साहित्य ही पर्यावरणीय प्रणाली नाजूक राहिल्यास विज्ञान आणि इंजिनियरिंग कशी लवचिकता मजबूत करू शकते यावर भाष्य केले. डॉ. पारुल जाधव यांनी प्रस्तावनेत परिषदेच्या माध्यमातून नवीन कल्पनांवर केवळ चर्चा नाही तर त्याला बळकटी देऊ. याचा उपयोग मानवतेसाठी तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या आयईईच्या दृष्टिकोनात योगदान देतील असे सांगितले. सूत्रसंचालन आणि आभार डॉ. सुनिल सोमाणी यांनी केले.

# गडांचा राजा राजगड

सह्याद्रीच्या उंच डोंगररांगांच्या कुशीत उभा असलेला, भव्यता आणि ऐतिहासिक वैभव यांचा अद्वितीय संगम म्हणजे राजगड! छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या उभारणीतील पहिला भक्कम पाया या गडाने घातला. तब्बल पंचवीस वर्षे स्वराज्याची राजधानी म्हणून राजगडाने अनेक ऐतिहासिक घटना, शौर्यगाथा, राजकीय निर्णय आणि युद्धांचा साक्षीदार होण्याचा मान मिळवला. मराठ्यांच्या पराक्रमाला व स्वराज्याच्या कर्तृत्वाला दिशा देणारा हा गड, केवळ एक किल्ला नसून स्वराज्याच्या आत्म्याचे मूर्तिमंत प्रतीक आहे.

राजगड किल्ल्यावर पोहोचण्याचा प्रवास रोमांचकारी आहे. दाट जंगलातून जाणाऱ्या पायवाटा, खडतर चढण आणि सह्याद्रीच्या निसर्गसौंदर्याचा आनंद यामुळे हा प्रवास अविस्मरणीय ठरतो. गडावर पोहोचल्यानंतर दिसणारे विस्तीर्ण पर्वत आणि खोल दऱ्यांचे विहंगम दृश्य थकवा दूर करून मन भारावून टाकते. इतिहास, साहस आणि निसर्ग यांचा अद्भुत संगम राजगडावर अनुभवता येतो. हा किल्ला केवळ एक पर्यटनस्थळ नाही, तर मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाचे दार आहे. इथली शांतता, प्राचीन वास्तू आणि डोंगरमाथ्यावर वाहणारा गार वारा प्रत्येकाला पुन्हा-पुन्हा येथे येण्यासाठी प्रेरित करतो.

### प्राचीन इतिहास

आजचा राजगड किल्ला मुळात ''मुरुंबदेव'' या नावाने ओळखला जात होता. विविध राजवटींच्या अखत्यारीत असताना या ठिकाणी फक्त बालेकिल्ल्याचा भाग अस्तित्वात होता. परंतु इ.स. १६४३ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला ताब्यात घेताच त्याचे पुनर्निर्माण सुरू झाले. तेव्हाच या गडाला ''राजगड'' म्हणजेच गडांचा राजा हे साजेसे नाव लाभले आणि स्वराज्याची राजधानी म्हणून तो घोषित करण्यात आला.

या गडावर अनेक ऐतिहासिक घटना घडल्या. इथेच शिवाजी महाराजांचे सुपुत्र राजाराम यांचा जन्म झाला. त्यांची पत्नी सईबाई यांचे याच ठिकाणी दुःखद निधन झाले. १६६४ मध्ये सूरत लुटल्यानंतर मिळालेल्या संपत्तीचे संरक्षण याच गडावर करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक महत्त्वाच्या



लढायांची रणनीती राजगडावर आखली. भक्कम तटबंदी, मजबूत बुरुज आणि चतुराईने बांधलेल्या रचना यामुळे हा किल्ला अभेद्य बनला. मुघल आणि आदिलशाही सैन्याने कित्येक वेळा किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला.

आजही राजगड हा इतिहास, साहस आणि निसर्ग सौंदर्याचा संगम आहे. पर्यटनासाठी हा किल्ला एक उत्तम ठिकाण आहे. किल्ल्यावरील सुवेळा माची, संजीवनी माची आणि बालेकिल्ला ही विशेष आकर्षणाची ठिकाणे. राजगडावरून दिसणारे सह्याद्रीचे डोंगर आणि धुके भरलेले निसर्गदृश्य मन मोहून टाकतात. इतिहासप्रेमी, साहसिक पर्यटक आणि निसर्गप्रेमी यांच्यासाठी राजगड एक अनोखा अनुभव देणारे ठिकाण आहे.

### नैसर्गिक रचना आणि संरक्षण व्यवस्था

राजगड किल्ला मध्ययुगीन स्थापत्यकलेचा अद्वितीय नमुना आहे. सुमारे ४० किलोमीटर परिघ असलेल्या या किल्ल्याची समुद्रसपाटीपासून उंची १३७६ मीटर आहे. भक्कम तटबंदी आणि सुयोग्य रचना यामुळे हा किल्ला संरक्षण आणि प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला.

या किल्ल्याचा मध्यभाग पद्मावती माची म्हणून ओळखला जातो. येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे निवासस्थान होते. पद्मावती देवीचे मंदिर, पद्मावती तलाव आणि राजवाड्याचे अवशेष येथे पाहायला मिळतात. ही माची केवळ निवासासाठीच नव्हे, तर सैन्याच्या हालचालींसाठीही अत्यंत महत्त्वाची होती.

किल्ल्याच्या पश्चिमेला संजीवनी माची आहे. येथे तीन स्तरांमध्ये बांधलेली तटबंदी आजही मराठ्यांच्या लढाऊ कौशल्याची साक्ष देते. शत्रूच्या हल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठी ही संरचना अत्यंत उपयुक्त ठरली. पूर्व बाजूला सुवेळा माची आहे. येथून दिसणारे निसर्गसौंदर्य विलोभनीय आहे. याच ठिकाणी ''नेढे'' नावाची मोठी नैसर्गिक दगडी कमान आहे. हा भूशास्त्रीय चमत्कार किल्ल्याच्या सौंदर्यात भर घालतो. बालेकिल्ल्यावरून सह्याद्री पर्वतरांगेचे अप्रतिम दृश्य दिसते. पूर्वी येथे राजवाडा होता आणि याच ठिकाणी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जात असत.

राजगडाची भौगोलिक व लष्करी रचना अतिशय अद्वितीय आहे. किल्ला डोंगरांच्या उंचसखल उतारांवर बांधलेला असल्याने तो जिंकणे जवळजवळ अशक्य होते. एका सरळसरळ तटबंदीवर अवलंबून न राहता तीन प्रमुख माच्या पद्मावती, संजीवनी आणि सुवेळा या गडाला त्रिसूत्री स्वरूपात जोडलेल्या आहेत. या प्रत्येक माचीचा आपापला वेगळा उपयोग होता :

पद्मावती माची गडाचे हृदय मानली जाणारी ही माची प्रशासनिक व निवासी केंद्र होती. येथे राजसदर, पद्मावती देवीचे मंदिर, महाराजांचे निवासस्थान, राणीवसा तसेच मंत्र्यांचे निवासस्थान यांचा समावेश होता. मोठमोठ्या पाण्याच्या टाक्यांमुळे या माचीवर वर्षभर पाणी उपलब्ध असे.

संजीवनी माची पश्चिमेकडे पसरलेली ही माची मजबूत तटबंदी, अर्धगोलाकार बुरुज आणि पहारेकऱ्यांसाठी सोयीस्कर स्थानांनी युक्त होती. संरक्षण आणि आक्रमण अशा दोन्ही दृष्टींनी ती अत्यंत महत्त्वाची मानली जात असे.

सुवेळा माची पूर्वेकडे असलेली ही माची अरुंद व उग्र कड्यांवर पसरलेली आहे. येथे पाण्याची टाकी, पहारेकऱ्यांची ठाणी आणि गुप्त, अरुंद प्रवेशद्वार होते. शत्रूवर लक्ष ठेवण्यासाठी हे स्थान अनन्यसाधारण उपयोगी ठरत असे. या तिन्ही माच्या एका ठिकाणी येऊन मिळतात तो म्हणजे बालेकिल्ला. उंच मनोरे, भक्कम भिंती आणि विस्तीर्ण परिसरावर नजर ठेवणारा हा भाग म्हणजे गडाचा सर्वोच्च आणि अंतिम संरक्षणस्तर. गडाच्या प्रवेशासाठी पाली, गुंजवणे व अळू दरवाजा हे मार्ग वापरले जात. तसेच खडकात कोरलेल्या असंख्य टाक्यांमुळे पाणी व धान्यसाठा अखंड उपलब्ध राहावा याची काळजी घेण्यात आली होती.

> **गडाचे वैशिष्ट्ये**
>
> राजगडाच्या बांधणीत केवळ संरक्षणाचा विचार केलेला नव्हता, तर राजकारण, प्रशासन, सैनिक व्यवस्थापन आणि दीर्घकालीन टिकाऊपणा या सर्व बाबी लक्षात घेऊन गड उभारण्यात आला. वळणावळणाच्या पायवाटा, धान्यकोठारे, पहारेकऱ्यांच्या चौक्या यामुळे गड एक परिपूर्ण राजधानी ठरला.

> **जागतिक ओळख**
>
> इतिहास, वास्तुकला, युद्धतंत्र आणि सांस्कृतिक महत्त्व यांचा अनोखा संगम असलेला राजगड आज युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या मालिकेत समाविष्ट होऊन भारताचे आणि मराठ्यांचे वैभव जगभर पोचवत आहे. राजगड किल्ला केवळ ऐतिहासिक वारसा नाही, तर तो एक साहस, एक प्रवास आणि मराठ्यांच्या अदम्य शौर्याला वाहिलेली आदरांजली आहे. येथील प्रत्येक दगड भूतकाळाच्या कथा सांगतो. इतिहासप्रेमींना येथे मराठ्यांच्या विजयगाथांचा अनुभव येतो. ट्रेकिंगच्या चाहत्यांसाठी हा किल्ला एक रोमांचक आहे. निसर्गप्रेमींना येथे सह्याद्रीच्या भव्य सौंदर्याचे दर्शन होते. येथील शांतता आणि वारा मनाला ताजेतवाने करतो. राजगड महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची आठवण करून देतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचे आणि पराक्रमाचे साक्षीदार असलेला हा किल्ला आजही दिमाखात उभा आहे. येथे आल्यावर प्रत्येक क्षण संस्मरणीय वाटतो. एकदा का तुम्ही येथे पोहोचलात, तर हा प्रवास केवळ एक ट्रेक राहणार नाही, तर तो एक ऐतिहासिक अनुभव बनून हृदयात कोरला जाईल. राजगड तुमची वाट पाहतो आहे, चला निघा ''गडांच्या राजाला'' भेट द्यायला!

> **सांस्कृतिक वारसा**
>
> आजचा राजगड हा फक्त एक पुरातन अवशेष नाही, तर जिवंत वारशाचे प्रतीक आहे. येथे होणारे उत्सव गडाच्या ऐतिहासिक महत्त्वाची आठवण करून देतात. दिवाळीच्या वेळी होणारा दीपोत्सव संपूर्ण गडाला दिव्यांच्या उजेडात न्हाऊ घालतो. शिवजयंतीच्या दिवशी तर हजारो लोक गडावर जमतात. पारंपरिक वाद्ये, भाषणे, शिवचरित्रावर आधारित नाटिका यामुळे गड पुन्हा एकदा इतिहासाच्या सोनेरी क्षणात जगू लागतो.

**-संजय डी.ओरके**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## 'सह्याद्री'च्या डॉ. मनोजकुमार पाटील, डॉ.अशपाक तांबोळी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३ सप्टेंबर -**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे (ता.सांगोला) येथील प्राचार्य डॉ.मनोजकुमार शेषेराव पाटील व प्रा.डॉ.अशपाक मुबारक तांबोळी यांनी पिसिआय दिल्ली यांच्या अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शक नियमानुसार टेक्स्ट बुक ऑफ फार्मासुटिकल ऑरगॅनिक केमिस्ट्री-१ या बी.फार्मसी प्रथम वर्षाच्या दुसऱ्या सत्राच्या विषयावर पुस्तक प्रकाशित केले आहे. सदर पुस्तक २००८ ची स्थापना असलेले सुप्रसिद्ध फार्मा करिअर पब्लिकेशन, नाशिक यांनी प्रकाशित केले आहे. या पुस्तकामध्ये फार्मसी क्षेत्राशी संबंधित फार्मासुटिकल ऑरगॅनिक केमिस्ट्री विषयावरील सर्व मूलभूत माहिती, साध्या सेंद्रिय संयुगांचे वर्गीकरण आणि नामकरण, संरचनात्मक समस्थानिकता, अभिक्रियांमध्ये तयार होणारे मध्यवर्ती घटक, महत्त्वाचे भौतिक गुणधर्म, अभिक्रिया व संयुगांच्या तयारीच्या पद्धतींशी संबंधित आहे. अभ्यासक्रमात अभिक्रियांच्या यंत्रणा आणि अभिमुखतेवर देखील भर दिला आहे व त्याचा फार्मसी क्षेत्रास होणारा फायदा याचा समावेश या पुस्तकामध्ये केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना यामधून मोलाचे मार्गदर्शन व लाभ होणार आहे. या त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले यांनी सन्मान करून अभिनंदन केले.





# करमाळा पोलीस ठाण्याची मोठी कारवाई; १३ किलो गांजा जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.३ सप्टेंबर-**

तालुक्यातील केम-कंदर रोडवर पोलिसांनी सोमवारी सापळा रचून केलेल्या कारवाईत तिघांना गांजासह ताब्यात घेतले. या कारवाईतून तब्बल १३ किलो ४५० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असून, त्याची अंदाजे किंमत ३, ३६, २५० रुपये एवढी आहे. करमाळा पोलिसांनी तिन्ही आरोपींवर गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.१ सप्टें. रोजी स. ११.४० वा. पोसई सुशीलकुमार पाखरे यांना गोपनीय बातमी मिळाली कि, केम-कंदर या रोडने तिघे जण स्कुटर व चारचाकी वाहणात असून ते गांजा विक्रीसाठी घेऊन येणार आहेत, त्यानंतर कायदेशीर कारवाई करण्यासाठी लागणारे लेखी अधिकार पत्र घेऊन पोलिसांनी कारवाईची सूत्रे हलवली

सदर ठिकाणी गेल्यानंतर मिळालेल्या माहितीनुसार केम-कंदर रोडवर पोलिसांनी सापळा रचला व काही क्षणात केमकडून कंदरच्या दिशेने एक बिगर नंबरची स्विफ्ट कार व बिगर नंबरची ॲक्टिवा स्कुटर येताना दिसल्याने संशय आला व त्यास थांबण्याचा इशारा केला असता ते थांबले नाही. त्यानंतर त्या वाहनांचा पोलिसांकडून पाठलाग करून पकडण्यात आले. कारवाईत ॲक्टिवा स्कुटरवरून प्रवास करणारा सचिन नागनाथ निवाळ (वय २६, रा. वेणेगाव, ता. माढा, जि. सोलापूर) तसेच स्विफ्ट कारमधील आकाश उर्फ सोन्या उत्तरेश्वर गोसावी (वय २६, रा. ता. माढा, जि. सोलापूर) व सचिन सुरेश बावळे (वय ४०, रा. ता. माढा, जि. सोलापूर) यांची नावे निष्पन्न झाल्यानंतर, वाहणांची तपासणी केल्यानंतर त्यामध्ये ॲक्टिवा स्कुटर मध्ये चिकट पट्टीने पॅक केलेले एक पॅकेट तर स्विफ्ट कार मध्ये चिकट पट्टीने पॅक केलेले पाच पॅकेट मिळून आले.

सदरची सहा पॅकेट उघडून पाहिले असता, त्यामध्ये झाडपत्ती सारखा ओलसर व उग्र वास येणारा गांजा असल्याचे दिसून आले. सदर आरोपीकडून १३ किलो ४५० ग्रॅम (अंदाजे भाव २५, ००० रु. प्रति किलो प्रमाणे) ३,३६,२५० रु. किंमतीचा गांजा व ॲक्टिवा स्कुटर कींमत ७५,००० रु. व स्विफ्ट कारची किंमत ४,००,००० रु. असे एकूण ८,११,२५० रु.किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोना मनीष पवार यांनी आरोपींच्या विरुद्ध सरकारतर्फे फिर्याद दिली असून गुरनं ७२५/२०२५ अन्वये एन.डी.पी.एस ॲक्ट कलम ८ (क) २० (ब) () (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी (भा.पो.से), अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अंजना कृष्णा व्ही.एस, करमाळा पोलीस निरीक्षक रणजित माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई सुशीलकुमार पाखरे, सपोफौ शिनगारे, पोहेकॉ आप्पासाहेब लोहार, पोहेकॉ अजित उबाळे, पोना मनीष पवार, पोना वैभव ठेंगल, पोकॉ रविराज गटकूळ, पोकॉ मिलिंद दहीहांडे, पोकॉ अर्जुन गोसावी, पोकॉ येवले, पोकॉ भराटे, पोकॉ रंदील, पोकॉ खोटे, पोकॉ प्रसाद काटे तसेच सायबर पो ठाणकडील पोहेकॉ व्यंकटेश मोरे यांनी केली आहे. सदरील गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुशीलकुमार पाखरे हे करीत आहेत.करमाळा पोलिसांचा हा धडाकेबाज उपक्रम तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे.





## तुळजाभवानी मंदिर प्रतिकृती देखावा बार्शीकरांच्या पसंतीस उतरेल

- आमदार दिलीप सोपल यांचे केले प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.३ सप्टेंबर-**

पुणेनंतर बार्शीत पाहण्यासारखे देखावे असतात, असे सांगत पुणेनंतर कुलस्वामिनी व देशातील शक्तीपीठांपैकी एक असलेल्या आई तुळजाभवानी मातेवर असलेल्या श्रद्धेची प्रेरणा मिळावी म्हणून योगेश क्रीडा व सांस्कृतिक मंडळाने सादर केलेला तुळजाभवानी मंदिर प्रतिकृती हा देखावा निश्चितच बार्शीकरांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास आमदार दिलीप सोपल यांनी व्यक्त केला.

सायंकाळी योगेश क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या तुळजाभवानी मंदिर प्रतिकृती देखाव्याचे उद्घाटन तुळजाभवानी मंदिराचे महंत तुकडोजीबुवा यांच्या हस्ते झाले. त्यानंतर लिंगायत बोर्डिंग सभागृहात कार्यक्रमात सोपल बोलत होते.

अध्यक्षस्थानी खासदार ओमराजे निंबाळकर होते. यावेळी व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष योगेश सोपल, नागेश अक्कलकोटे, बाळासाहेब आडके, प्रा. अशोक सावळे, आनंद रोचकरी, कृष्णराज बारबोले, सुभाष शेळके, पृथ्वीराज राजपूत उपस्थित होते. पूर्वी मंडळाचे कार्यकर्तेच देखावे तयार करत होते. आता मात्र तयार देखावे धेतले जातात.

### तुळजापूरची पायी वारी

१९७८ मध्ये किसनराव देशमुख आमदार व्हावे, यासाठी पौर्णिमेला पायी जाऊन तुळजाभवानी मातेचे दर्शन घेण्याचा नवस केला होता. तेव्हापासून पुढे २१ वर्षे मातेचे दर पौर्णिमेला दर्शन घेतले. दरम्यान, मला स्वतःला १९८५ पासून पुढे १९९०, १९९५ ला आमदारकीची लॉटरी लागत गेली, असा पौर्णिमा पायी वारीचा किस्सा यावेळी सोपल यांनी सांगितला.

## देवाजवळ जाण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे वारी

- सचिन महाराज पवार
- उद्योग बँक रोटरी क्लब व्याख्यानमाला

**सोलापूर, दि.३ सप्टेंबर**

पंढरपूरची वारी ही वारकऱ्यांची उपासना आहे. महाराष्ट्रातील सर्वात जुनी उपासना वारीच आहे. दर महिन्याला दोनदा वारी करणे अपेक्षित मानले जाते. काहींना ते शक्य नसते, त्यामुळे ते वर्षातून चार वेळा वारी करतात. काहींना तेही जमत नसल्याने किमान दोनदा किंवा एकदा वारी केली जाते. कारण देवाजवळ जाण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे वारी, असे प्रतिपादन सचिन महाराज पवार यांनी केले.

सोलापूर उद्योग बँक माजी सेवक सांस्कृतिक मंडळ व रोटरी क्लब सोलापूर एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गणेशोत्सव बौद्धिक व्याख्यानमालेत 'पंढरपूरची वारी : इतिहास आणि वर्तमान' या विषयावर बुधवारी त्यांनी सातवे पुष्प गुंफले. व्यासपीठावर व्याख्यानमाला समितीचे प्रेसिडेंट यल्लादास लछमापुरे, अध्यक्ष श्रीनिवास बिंगी, रोटरी अध्यक्ष रमेश कमटम, सचिव काशीनाथ कुंटला, व्यंकटेश बिटला आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विठ्ठल वंगा यांनी केले. तसेच कवयित्री रेणुका बुधाराम, पुरुषोत्तम बुधाराम, राहुल पोफळे, पुंडलिक पगडीमल आदी उपस्थित होते.

सचिन महाराज पवार म्हणाले की, वारी माणसाला परमार्थासाठी प्रोत्साहन देते. बदमाशपणा सोडणे म्हणजेच परमार्थाची सुरुवात होय. देव माना किंवा न माना, परंतु देव न मानणाऱ्यांविरोधात द्वेष पसरवणारे हे अविवेकाचे पाईक आहेत. त्यांना वारकरी संप्रदायात स्थान नाही. शुद्ध भक्तीभाव, सतत नामस्मरण आणि संतांची संगत हे संस्कार वारकरी संप्रदाय शिकवतो. एकाच ठिकाणी वारंवार जाणे म्हणजे वारी. श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी वारंवार पंढरपुरात येणाऱ्यांना वारकरी म्हणतात. महाराष्ट्रात असे एकही गाव नाही जिथून वारकरी पंढरपुरात येत नाही. संत ज्ञानेश्वरांच्या पूर्वीपासूनच वारकरी पंढरपुरात येत होते. भगवान शंकर हे पहिले वारकरी होते, अशी अख्यायिका सांगितली जाते.

### संजय कळमकर यांचे आज व्याख्यान

गुरुवार, ४ सप्टेंबर रोजी 'जगण्यातील आनंदाच्या वाटा' या विषयावर संजय कळमकर यांचे व्याख्यान होणार आहे. ही व्याख्यानमाला दररोज सायंकाळी ६:३० वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात होत आहे.



## भारतीय नौदल जगातील सर्वोत्कृष्ट असल्याचे ऑपरेशन सिंदूर मुळे झाले स्पष्ट

- मेजर जनरल (निवृत्त) राजेंद्र मेहता
- जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळ व्याख्यानमाला सुरू

**सोलापूर : प्रतिनिधी**

पाकिस्तानने पहेलगाम येथे भारतीयांची हत्या केल्यानंतर भारताने पाकिस्तानला इशारा देऊन धडा शिकवला. भारतीय नौदल हे जगातील तीन सर्वोत्कृष्ट नौदलापैकी एक आहे हे ऑपरेशन सिंदूर मुळे स्पष्ट झाले,असे प्रतिपादन मेजर जनरल (निवृत्त) राजेंद्र मेहता (चंदीगड) यांनी केले. जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळ आणि सोलापूर जनता सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बौद्धिक व्याख्यानमालेचे उद्घाटन बुधवारी सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या हस्ते झाले. व्याख्यानमालेचे पहिले पुष्प श्री. मेहता यांनी ऑपरेशन सिंदूर या विषयावर गुंफले.

व्याख्यानमालेचे यंदाचे ४९ वे वर्ष आहे. व्याख्यानमालेच्या उद्घाटनप्रसंगी व्यासपीठावर बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे, संचालक राजेश पवार, प्राचार्य गजानन धरणे, सी.ए. गिरीश बोरगावकर, पुरुषोत्तम उडता, जगदीश भुतडा, संचालिका चंद्रिका चौहान, गौरी आमडेकर, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे, मंडळाचे अध्यक्ष सुहास मुळजकर उपस्थित होते. मेजर जनरल मेहता म्हणाले, अमेरिकेने सांगितल्यानंतर भारताने पाकिस्तानवरील हल्ले थांबवल्याचे खोटे सांगण्यात येत आहे, हे पाकिस्तानच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या वक्तव्यांवरून समोर येत आहे. ऑपरेशन सिंदूर मध्ये भारताचे मोठे नुकसान झाल्याची चर्चा वारंवार काही जणांकडून करण्यात येते. युद्ध होत असेल तर काही प्रमाणात नुकसान होतेच. परंतु देशाची जगातील प्रतिमा उंच ठेवणे हे प्रत्येक भारतीयाचे प्रथम कर्तव्य ठरते. कायद्याचे पालन करणे, शिक्षणाला प्रोत्साहन देणे, संकटाला घाबरून न जाता धैर्याने सामोरे जाणे, देशाला मोठे करणे या मुद्द्यांवर भारतीयांनी काम केले तर आपण जगावर राज्य करू शकतो असेही श्री. मेहता यांनी सांगितले. मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे यांनी प्रास्ताविक केले. वनिता संगा यांनी परिचय करून दिला. संजोगीता चौधरी यांनी सूत्रसंचालन तर पूर्वा पाटील - बंकुर यांनी आभार मानले. पेंटप्पा गड्डम, मकरंद जोशी, अंजली कुलकर्णी, देवदत्त पटवर्धन, मदन मोरे आदी उपस्थित होते.





### आज व्याख्यानमालेत आज

जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाच्या व्याख्यानमालेत आज (गुरुवारी) गणेश शिंदे यांचा संत श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनावर आधारित मोगरा फुलला हा संगीतमय कार्यक्रम सादर होणार आहे. यावेळी सोलापूरकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे आणि मंडळाचे अध्यक्ष सुहास मुळजकर यांनी केले आहे.

## आत्मनिर्भरतेमुळे ऑपरेशन सिंदुर यशस्वी

- सेवानिवृत्त प्रदिप बापट
- विवेकानंद प्रतिष्ठान व्याख्यानमाला ७ वे पुष्प

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि ३ सप्टेबर**

सारेजग शांत होते तेव्हा आपले इस्त्रोचे शास्त्रज्ञ टायगर कामगिरी करत होते. भारत आत्मनिर्भर झाला आहे. १४० करोड भारतीयांच्या जिद्दीमुळे ऑपरेशन सिंदुर यशस्वी झाले. याचे श्रेय भारतीय इस्त्रोच्या संरक्षण सिद्धतेला आहे. भारताने आपल्या बोर्डर मध्ये राहून पाकच्या १०० किमी आत हल्ला केल्याचे प्रतिपादन सेवानिवृत पीव्ही एस एम व्ही एस प्रदिप बापट यांनी केले .

येथील विवेकानंद प्रतिष्ठानतर्फे अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सवानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत आज सेवानिवृत पीव्ही एस एम व्हीएस एम प्रदिप बापट, सेवानिवृत्त विंग कमांडर अविनाश मुगळ यांनी ७ वे पुष्प गुंफले. 'ऑपरेशन सिंदुर : पराक्रम अभूतपूर्व' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. प्रारंभी दिप प्रज्वलन व प्रतिमा पुजन श्री. बापट व श्री. मुगळ, वसुंधरा मुगळ, प्रविण शहा, पत्रकार अरविंद पाटील, बाबासाहेब निंबाळकर, राजेश जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. प्रतिष्ठानतर्फे मान्यवरांचा समर्थाची प्रतिमा व रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार कल्याणशेट्टी, संचालक मल्लीनाथ कल्याणशेट्टी, प्रा. भिमराव साठे, मुकुंद पतकी, राचप्पा वागदरे, ओमप्रकाश तळेकर प्रदिप पाटील, अशोक येणगुरे, मलकप्पा भरमशेट्टी, चंद्रकांत दसले, महेश कापसे, प्रफुल इचगे, मल्लीनाथ मसुती, गुरुपादप्पा आळगी, प्रदीप तोरस्कर, विजय तडकलकर, खंडेराव घाटगे, जितेंद्र जाजु आदि बहुसंख्य रसिक श्रोते महिला वर्ग उपस्थित होते.





पाकिस्तानने ऑपरेशन सिंदुर ला प्रतिकार करताना एक हजार हल्ले केले. एकही हल्ला भारताने यशस्वी होऊ दिला नाही.पाकचे फक्त ड्रोन मध्ये १०० कोटी चे नुकसान झाले आहे. मेडइन चायना चे अनेक ड्रोन फुसके निघाले. आपली संरक्षण सिद्धता आहे हा आत्मनिर्भर भारताबद्दल सांगताना संरक्षण सिद्धतेचे अनेक बारकावे पुर्वीचा भारत आत्ताचा भारत फरक सांगितला.


सेवानिवृत्त विंग कमांडर अविनाश मुठाळ यांनी एलईडी प्रेझेंटेशनद्वारे युद्धजन्य परिस्थितींचे जिवंत चित्र नागरिकांसमोर उभे केले. मुठाळ म्हणाले की, 'सिंदूर' ही संकल्पना भगवद्गीतेतून प्रेरित आहे. आपण आपल्या घरात राहून पाकिस्तानमध्ये घुसून हल्ले केले आणि त्यासाठी वापरलेली शस्त्रेही आपणच बनवली. हे आत्मनिर्भर भारताचे खरे यश आहे. या कारवाईदरम्यान पाकिस्तानला टर्की, उझबेकिस्तान व चीनकडून मदत मिळाली होती, तरीही भारतीय सैन्याने सर्व हल्ले परतावून लावले. पाचशे ड्रोन निकामी करून शत्रूचे तब्बल शंभर कोटी रुपयांचे नुकसान झाले. भारताने या लढाईत कोणतेही नुकसान सोसले नाही, उलट शत्रूला मोठा धक्का दिला. पाकिस्तानी मानसशास्त्रीय युद्धालाही भारताने तितक्याच ताकदीने प्रत्युत्तर दिले.

# इस्त्रोचे शास्त्रज्ञ डॉ.शर्मा यांनी घेतले विठ्ठलाचे दर्शन

## साधी राहणी उच्चविचारांचे मुर्तीमंत उदाहरण

## उच्चपदाचा कोणताही डामडौल नाही

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.३ सप्टेंबर -**



अलिकडच्या काळात गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत नसता डामडौल करणारे आपण नेहमीच पाहतो. परंतू एका उच्च पदावर कार्यरत असूनही कोणताही डामडौल न करता साध्या राहणीतून आपली छाप पाडणारे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे अवकाशयान प्रक्षेपणाचे मुख्य सल्लागार डॉ.एस.व्ही.शर्मा असल्याचे दिसून आले. दोन दिवसांपूर्वी डॉ.शर्मा हे पंढरपूरात विठ्ठल दर्शनासाठी आले होते. मात्र त्याचा कुणालाही मागमुस देखील लागला नाही.

इस्त्रो या संशोधन संस्थेमध्ये डॉ. एस.व्यंकटेश्वर शर्मा हे उच्च पदावर कार्यरत आहेत. तरी सुध्दा कोणताही डामडौल नाही. कोणताही गाजावाजा नाही. आपल्या व्हीआयपी वागणूकीमुळे देवाच्या दर्शनाला आलेल्या इतर भक्तांना त्रास नाही. कारण देवापुढे आपण सगळे समान. आपण केवळ भक्त आणि भक्तच असे मानून येथील विठ्ठल रुक्मीणीमातेचे दर्शन घेत ते तृप्त झाले. दुसरीकडे एखादा राजकीय नेता, कोणत्यातरी संस्थेचा पदाधिकारी या बरोबरच राज्य,केंद्रातील काही मंत्रीसंत्री विठ्ठल दर्शनासाठी येताना आपल्या गाड्यांचा ताफा बरोबर आणतात. त्यांच्या बरोबर पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा घोळका असतो. दर्शन रांग थांबवुन अगदी व्हीआयपी पध्दतीने त्यांना दर्शनाची सुविधा मंदिरातील आधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना पुरवावी लागते. यावेळी दर्शन रांगेतील भाविकांची आणि अशा सो- कॉल्ड व्हीआयपी मंडळींच्या बरोबर घोळक्यांनी मंदिरात घुसलेल्या कार्यकर्त्यांची बाचाबाची होते. अशा घटना आपण वारंवार पाहतो. पंढरपूरच्या बाबतीत तर अशा घटना नित्याच्याच आहेत. मात्र एकीकडे असे जरी सर्रास चित्र दिसत असले तरी इस्त्रो सारख्या देशाची प्रतिमा अंतरराष्ट्रीय पातळीवर उंचाविणाऱ्या एका मोठ्या संस्थेत उच्च पदावर कार्यरत असताना डॉ.शर्मा यांची साधी राहणी, खरोखर वाखणण्या जोगी आहे. विशेष म्हणजे डॉ.शर्मा यांचा पंढरपूरचा हा दुसरा दौरा होता. या अगोदर देखील येथे येवून त्यांनी विठ्ठल रुक्मिणीमातेचे दर्शन घेतले होते. एवढेच नव्हे तर येत्या काळात सपत्नीक विठ्ठलरुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी आपण येथे येणार असल्याचे देखील आवर्जुन त्यांनी सांगितले. पंढरपूरातील डॉ.शर्मा यांच्या दौऱ्यावेळी दोन, तीन स्थानिक परिचित मंदिरात तसेच पंढरपूरची माहिती देण्यासाठी त्यांच्या बरोबर आवर्जून उपस्थित होते. त्यांना देखील डॉ.शर्मा यांच्या साधेपणाचे अप्रुप वाटले. डॉ.शर्मा यांच्या साधेपणाने ते देखील भारावून गेले. विशेष म्हणजे झेड प्लस सेक्युरिटी असताना देखील कोणताही शासकीय प्रोटोकॉल न घेता अगदी सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे स्वत:ची अगदी साधी राहणी आणि जमिनीवर पाय ठेवलेले व्यक्तिमत्त्व असलेल्या डॉ.शर्मांनी अत्यंत भक्तीभावाने विठ्ठल आणि रखुमाईचे दर्शन घेतले. त्यांच्या राहणीमानातील साधेपणा सांगावयाचा झाल्यास येथील विठ्ठल मंदिराकडे चारचाकी गाडीतून जाण्यासाठी स्थानिक पोलिस विभागाची परवानगी लागते.

यंदाच्या आषाढी यात्रेपासून येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये व्हीआयपी मंडळींना आपली गाडी उभी करुन मंदिर समितीच्या ई रिक्षातून (गाडीतून ) मंदिरा पर्यंत जावे लागते. मात्र असला कोणताही डामडौल नको म्हणून मंदिर परिसरातील एका लॉंजवर त्यांनी मुक्काम केला. या मुक्कामात पहिल्यादिवशी संध्याकाळी मंदिरात जावून त्यांनी विठ्ठलरुक्मिणीमातेचे दर्शन घेतले आणि पहाटे पुन्हा काकड आरतीला देखील त्यांनी उपस्थिती लावली. मंदिर परिसरातील एका साध्या उपहारगृहात जाऊन त्यांनी सकाळी नाश्ता देखील केला आणि जेवण देखील घेतले. हा त्यांचा साधेपणा खरोखरच वाखाणण्याजोगा आहे. इस्त्रो सारख्या संशोधन संस्थेत डॉ.शर्मा उच्चपदावर कार्यरत असणाऱ्या व्यक्तीने, साधेपणा जोपासला आहे तो डामडौल करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांच्या डोळ्यात खरोखरच अंजन घालणारा असा आहे.

### डॉ. एस.व्ही. शर्माचा अल्प परिचय

डॉ.एस.व्ही.शर्मा हे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे शास्त्रज्ञ आणि एक प्रमुख व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी यू.आर. राव उपग्रह केंद्र येथे उपसंचालक आणि कार्यक्रम संचालक म्हणून काम केले. इस्त्रो मधील ३५ वर्षांहून अधिक दीर्घ आणि यशस्वी कारकिर्दीत त्यांनी उपग्रहांसाठी उड्डाण हार्डवेअरच्या निर्मितीचे नेतृत्व केले तसेच चांद्रयान आणि मंगळयान सारख्या महत्वाच्या मोहिमांमध्ये मोलाचे योगदान दिले. त्यांनी उपग्रहांचे डिझाइन, विकास आणि निर्मिती यांची जबाबदारी देखील सांभाळली आहे. या बरोबरच इस्त्रोच्या उपग्रह कार्यक्रमांसाठी सर्व उड्डाण हार्डवेअरची महत्वपुर्ण देखरेख देखील त्यांच्या मार्गदर्शनाखाली झालेली आहे. डॉ.एस.व्ही.शर्मा यांनी उपसंचालक आणि कार्यक्रम संचालक म्हणून इस्त्रोच्या प्रमुख उपग्रह डिझाइन केंद्रात अभियंत्यांच्या मोठ्या टीमचे देखील त्यांनी नेतृत्व केले आहे. या बरोबरच चांद्रयान आणि मंगळयानसह भारताच्या आंतरग्रहीय मोहिमांमध्ये त्यांची महत्वाची भूमिका राहिलेली आहे. इस्त्रोसंस्था आणि देशातील विविध शैक्षणिक क्षेत्रा मधील शैक्षणिक संस्थांच्या कार्याला त्यांनी सहकार्य आणि प्रोत्साहन देवून विद्यार्थी उपग्रहांसारख्या संयुक्त प्रकल्पांना चालना दिली. त्यांमुळेच नैसर्गिक तंत्रज्ञान द्रष्टे म्हणून देखील त्यांना ओळखले जाते. भारताच्या अंतराळ कार्यक्रमात नावीन्य व उत्कृष्टता घडवून आणण्यात डॉ.शर्मा यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. इस्त्रो मध्ये ३५ वर्षांहून अधिक काळ ते कार्यरत आहेत. त्यांनी उपप्रकल्प संचालक, गट संचालक, कार्यक्रम संचालक, आणि उपसंचालक अशी अनेक महत्वाची पदे भूषवली आहेत. त्यांच्या या प्रयत्नांमुळे इस्त्रोची राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा अधिक नक्कीच उंचावली आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# आंदोलन यशस्वी झाले...

मराठा समाजाने मुंबईत पाच दिवस केलेल्या आरक्षणविषयक आंदोलनाला मोठे यश मिळाले असून, त्याबद्दल त्या समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील, त्यांचे सर्व सहकारी आणि समस्त समाजाचे अभिनंदन केले पाहिजे. त्याचप्रमाणे इतक्या गुंतागुंतीच्या विषयावर तोडगा काढून हे आंदोलन हाताळणारे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही अभिनंदन केले पाहिजे. त्यांच्या सहकाऱ्यांचेही तेवढेच कौतुक केले पाहिजे. या आंदोलनात मराठा समाजाच्या आठ मागण्या होत्या. त्यापैकी हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीसाठी शासन निर्णय जारी करणे, मराठा आरक्षण आंदोलनात सहभागी झालेल्यांविरुद्धचे गुन्हे मागे घेणे, आंदोलनातील मृतांच्या वारसांना आर्थिक मदत तसेच नोकऱ्या देणे, प्रलंबित जात पडताळणीला मान्यता देणे आणि आंदोलकांच्या वाहनांवरील दंड मागे घेणे अशा सहा मागण्या शासनाने मान्य केल्या. सातारा संस्थान, पुणे व औंध संस्थानच्या गॅझेटियरची अंमलबजावणी करावी आणि मराठा-कुणबी एकच असल्याचा शासनादेश जारी करावा, या दोन मागण्यांसाठी महाराष्ट्र सरकारने वेळ मागून घेतला आहे. तरीही एक मात्र खरे की, मराठा आंदोलनाला फार मोठे यश मिळाले आहे. विशेष म्हणजे संवैधानिक तरतुदींच्या चौकटीत राहून आणि न्यायालयात टिकेल, अशा पद्धतीचा दिलासा मुख्यमंत्र्यांनी मराठा समाजाला दिलेला आहे. त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडे. आंदोलक व सरकार अशा दोघांचेही अधिक कौतुक यासाठी केले पाहिजे की, कोणत्याही प्रश्नावर चर्चेतून तोडगा निघू शकतो, हे नव्याने सिद्ध झाले.

मराठा आंदोलक तब्बल पाच दिवस मुंबईत तळ ठोकून बसले होते. साऱ्या देशाचे लक्ष या आंदोलनाकडे लागलेले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील अन्य सहकारी आणि एकूणच राज्य सरकारच्या संयमाची आणि कसबीपणाची ही कसोटी होती. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरू होत्याच. त्याही स्थितीत दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी फडणवीसांना उत्तम सहकार्य केले. मंत्रिमंडळ उपसमितीचे प्रमुख राधाकृष्ण विखे पाटील यांनी शासनाची बाजू मनोज जरांगे यांना समजावून सांगितली आणि तोडगा निघाला. हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीसाठी ताबडतोब शासनादेश जारी करण्यात यावा, ही आंदोलकांची मागणी मान्य होऊन अवघ्या तास-दोन तासांत शासन निर्णय जारी करण्यात आला. ओबीसींच्या आरक्षणाला कुठेही धक्का न लावता मराठा समाजातील नागरिकांना कुणबी प्रमाणपत्रे मिळण्याचा मार्ग मोकळा व्हावा, हे तसे किचकट काम होते. ते मुख्यमंत्र्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी अतिशय चांगल्या रीतीने केले असे दिसते. मंत्रिमंडळ उपसमितीने या विषयावर आधीच अभ्यास केलेला होता. त्यामुळे हे इतक्या लवकर होऊ शकले. हा निर्णय न्यायालयात टिकेल आणि संविधानाच्या कसोटीवरही टिकेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलेला आहे. या निर्णयाचा प्रामुख्याने मराठवाड्यातील मराठा समाजाला फायदा होणार आहे. मराठवाड्यातील पाच जिल्हे (वर्तमानातील आठ जिल्हे) स्वातंत्र्यापूर्वी हैदराबादच्या निजामाच्या अखत्यारीत होते. हैदराबाद संस्थान स्वातंत्र्य मिळाल्यावर सार्वभौम भारतीय गणराज्यात सामील झाले. त्या संस्थानचे गॅझेटियर ब्रिटिशांच्या काळात प्रकाशित झाले होते. हैदराबाद गॅझेटियर म्हणतात ते तेच. त्या गॅझेटियरमध्ये मराठा समाजाच्या नोंदी कुणबी किंवा कापू या नावाने आहेत. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती हा होता. हैदराबाद गॅझेटियरमधील नोंदी लक्षात घेऊ मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया शासनाने या शासनादेशातून निश्चित केलेली आहे. हैदराबाद गॅझेटियरमुळे या नोंदी शोधणे सोपे होणार आहे. एखाद्याच्या वंशावळीत कोणत्याही टप्प्यावर कुणबी अशी नोंद झालेली असेल तर त्याला विनासायास प्रमाणपत्र मिळू शकेल, अशी व्यवस्था या शासनादेशातून केली जात आहे. शिवाय, महसूल, ग्रामविकास आणि कृषी खात्यातील अधिकाऱ्यांच्या सहभागाने स्थानिक पातळीवरील समित्यांच्या मार्फत ही पडताळणी होणार असल्यामुळे तिला फार वेळ लागणे अपेक्षित नाही. आणि तरीही या समित्यांच्या कामात पारदर्शकता राखण्याचे आव्हान असेलच हे लक्षात ठेवले पाहिजे. आरक्षणाचा लाभ मराठा समाजातील गरीब, गरजू लोकांनाच झाला पाहिजे, याची काळजी घेणे ही आता त्या समाजाचे नेतृत्व करणाऱ्यांची जबाबदारी आहे. शासनालाही त्यावर लक्ष ठेवावेच लागेल.

थोडे मागे वळून पाहिले तर गेली दोन वर्षे हा विषय पेटत राहिला आहे. मराठा समाजाच्या आंदोलनाला बऱ्याच प्रयत्नांच्या नंतर आलेल्या मुंबईतल्या या यशाचा पहिला अध्याय थोडा तणावाचा होता. तरी त्याचा शेवट गोड झाला, याचे सर्वांना समाधान वाटावे. परंतु, हा विषय येथे संपलेला नाही. आता ओबीसी समाजाच्या नेत्यांनी या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे. हा विषय न्यायालयात नेण्याची तयारी सुरू झाली आहे. ओबीसींचे नेते व मंत्री छगन भुजबळ यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार घालण्याचा पवित्रा घेतल्याच्याही बातम्या आलेल्या आहेत. याचा अर्थ असा की, या विषयाचा दुसरा अध्याय आता सुरू झालेला आहे किंवा लवकरच होणार आहे. मागासवर्गीय समाज कोणता यासंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार केवळ मागासवर्गीयांसाठी असलेल्या आयोगाला असताना राज्य सरकारने व त्यातही उपसमितीने हा निर्णय कसा घेतला, असा ओबीसी नेत्यांचा सवाल आहे. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, असे सांगितले जात असताना मराठा समाजाला मागच्या दाराने सवलत देण्याचा सरकारचा मनसुबा असल्याचेही त्यांना वाटते. परंतु, मुख्यमंत्र्यांनी मात्र ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, असा निर्वाळा दिलेला आहे हेही तेवढेच खरे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कायद्याचे पदवीधर आहेत. त्यामुळे ते उगाच असे दिलाशाचे बोलणार नाहीत. त्यांनी अभ्यास केलेला असणारच. मात्र, आता प्रश्न असा की, मराठा समाजाच्या मागण्या मान्य केल्यामुळे ओबीसी समाजाला आपल्यावर काही अन्याय होईल, अशी शंका वाटत असेल तर तिचेही निरसन राज्य शासनाला करावे लागणार आहे. त्यातून आणखीही फाटे फुटू शकतात. आरक्षण हा विषय तसाही फार गुंतागुंतीचा आहे. हा विषय न्यायालयात नेला गेला तर शतकभरापूर्वीच्या गॅझेटियरमधील संदर्भ आजच्या कसोटीवर टिकतील काय, हा प्रश्न आहेच. याचा अर्थ असा की, राज्य शासनाची कसोटी पुन्हा लागेल. पुन्हा कोर्ट-कचेरीच्या चकरा होतील. सारांश, दुसरा अध्याय हा पहिल्याच्या तुलनेत अधिक गुंतागुंतीचा असू शकेल. आजचे खरे आव्हान आहे ते आरक्षणाची अपेक्षा असलेल्या सर्व घटकांचे समाधान करण्याचे. सर्वांना आरक्षण देता येत नाही आणि दिले तरी त्यातून सर्वांचे समाधान होऊ शकत नाही. सध्याच्या काळात शिक्षण व नोकऱ्या यासाठी इतकी स्पर्धा असते की, आरक्षणाचा लाभ घेण्यास पात्र असलेल्या व्यक्तीला देखील योग्य ठिकाणी, योग्य अभ्यासक्रमाला प्रवेश मिळणे किंवा चांगली नोकरी लागणे शक्य होतेच असे नाही. ज्यांना आरक्षण नाही, त्यांचे तर सोडाच. वर्तमानातील परिस्थिती अशी आहे की, केवळ आरक्षण देऊन कोणत्याही व्यक्तीचे वा समुदायाचे उत्थान होऊ शकत नाही. लोकसंख्येतील वाढ, शिक्षणातील वाढ आणि त्या तुलनेत नोकऱ्यांची कमतरता हा तसा जुनाच विषय. तरीही काही समुदायांना-व्यक्तींना आरक्षण दिले पाहिजे, हे खरेच आहे. अनेक समुदायांना आरक्षणासह इतर सवलतींचीही गरज आहे. मराठा समाजातही सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागे असलेले लोक आहेत. त्यांना अशा सवलती मिळणे गरजेचेच आहे. मनोज जरांगे पाटील हे अशाच लोकांसाठी आंदोलन करीत आले आहेत. त्यांनी ज्या धैर्याने आंदोलन एका यशस्वी टप्प्यावर आणले, त्याचे कौतुक करावेच लागेल. या आंदोलनादरम्यान आंदोलकांवर दोषारोप झाले आणि मुख्यमंत्र्यांवरही झाले. दोन्ही बाजूंनी संयम पाळला गेला म्हणून आंदोलनाची सांगता यशस्वी स्वरूपात झाली. आता अपेक्षा एवढीच की, शासनाने मान्य केलेल्या मागण्यांची अंमलबजावणी तत्काळ सुरू करावी आणि मराठा समाजाच्या धुरिणांनी शासनाला या निर्णयांच्या अंमलबजावणीत सहकार्य करताना गरीब-गरजूंच्या कल्याणाकडे प्राधान्याने लक्ष द्यावे. ▮

## तंत्रवेध

### डॉ. दीपक शिकारपूर

# चौकटीपलीकडचा शिक्षकी पेशा

शिक्षक म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान देणारी व्यक्ती नाही, तर ती विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारी एक शिल्पकार असते. आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांची भूमिका अधिकच आव्हानात्मक आणि महत्त्वाची झाली आहे. विसाव्या शतकात शिक्षणाच्या कल्पना पारंपरिक होत्या. सध्याच्या तंत्रबदलत्या युगात शिक्षणाच्या कल्पना बदलत आहेत. नवे शैक्षणिक धोरण, ऑनलाईन शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रशिक्षक (रोबोटिक), परदेशी विद्यापीठांचे भारतात झालेले आगमन अशा अनेक बाबींमुळे शिक्षकांना बदलावे लागणार आहे. ऑनलाईन शिकवण, इंटरॅक्टिव्ह बोर्ड, शिक्षणासंबंधी मोबाईल ॲप्स आणि वेबसाईट्स यांचा वापर वाढला आहे. शिक्षकांना या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम करावे लागेल. पारंपरिक शिक्षणपद्धती आणि नवीन तंत्रज्ञान यांचा मेळ घालणे हे आजच्या शिक्षकांपुढील मोठे आव्हान आहे. म्हणूनच आजच्या युगात शिक्षकांनी कसे असले पाहिजे, याबाबत सविस्तर विचार करणे गरजेचे आहे. दरवर्षी ५ सप्टेंबर हा दिवस आपल्या देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या जयंतीनिमित्त शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि त्यांच्या योगदानाला सलाम करण्याचा दिवस आहे. ते एक महान शिक्षक, तत्त्वज्ञ आणि भारताचे दुसरे राष्ट्रपती होते. त्यांचे शिक्षणक्षेत्रातील योगदान अतुलनीय आहे. मात्र त्या पलीकडे जाऊन आजघडीला शिक्षकी पेशाचा विचार करणे आवश्यक आहे.

आजचे जग वेगाने बदलत आहे. माहितीचा महासागर इंटरनेटवर उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत शिक्षकांनी केवळ पाठ्यपुस्तकांवर अवलंबून राहणे पुरेसे नाही. त्यांनी स्वतःला अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. नवीन शोध, वैज्ञानिक प्रगती, सामाजिक आणि आर्थिक बदल याबद्दल त्यांना माहिती असणे गरजेचे आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांनी डिजिटल साक्षर असणे आवश्यक आहे. स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टर, ऑनलाईन लर्निंग प्लॅटफॉर्म आणि शैक्षणिक ॲप्सचा वापर करून शिक्षण अधिक प्रभावी बनवता येते. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता जागतिक घडामोडींची माहिती देणे, विविध विषयांवर ऑनलाईन संशोधन करण्यास प्रोत्साहन देणे हे आधुनिक शिक्षकांचे कर्तव्य आहे. पारंपरिक शिक्षणपद्धतीत शिक्षक हे केवळ ज्ञान देणारे होते, पण आजच्या युगात त्यांची



भूमिका ज्ञान सोपे करून सांगणे आणि विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करणे अशी झाली आहे. इंटरनेटमुळे आज माहिती सहज उपलब्ध असली तरी, त्या माहितीचे योग्य विश्लेषण करणे आणि तिचा योग्य वापर कसा करावा हे शिकवणे महत्त्वाचे आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार करण्याची क्षमता विकसित केली पाहिजे. प्रश्न विचारण्याचे, वाद-विवाद करण्याचे आणि स्वतःची मते योग्य प्रकारे मांडण्याचे स्वातंत्र्य त्यांनी विद्यार्थ्यांना दिले पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी आणि क्षमता ओळखून कारकीर्दीचा योग्य पर्याय निवडण्यास मदत केली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची गती आणि पद्धत वेगळी असते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे आवश्यक आहे.

आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांवर खूप शैक्षणिक आणि सामाजिक दबाव असतो. परीक्षेचा ताण, पालकांच्या अपेक्षा, सामाजिक माध्यमे आणि समवयस्कांकडून मिळणारा दबाव यामुळे अनेक विद्यार्थी मानसिक ताण अनुभवतात. अशा वेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे केवळ शैक्षणिकच नव्हे तर मानसिक आधारस्तंभ म्हणून काम केले पाहिजे. त्यांनी विद्यार्थ्यांशी मोकळेपणाने संवाद साधला पाहिजे, त्यांच्या समस्या ऐकून घेत मानसिक पातळीवर मदत केली पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे प्रोत्साहित करून आत्मविश्वास वाढवला पाहिजे. एखादा विद्यार्थी मागे पडत असल्यास शिक्षा न करता, त्याच्या अडचणी समजून घेऊन मदत करणे आवश्यक आहे. शाळेत किंवा वर्गात सकारात्मक आणि सुरक्षित वातावरण निर्माण करणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. शिक्षण केवळ चांगले गुण मिळवण्यासाठी नाही, तर एक चांगला माणूस बनण्यासाठी असते. आधुनिक युगात शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नैतिक आणि सामाजिक मूल्यांची शिकवण दिली पाहिजे. प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम, सहकार्य, इतरांचा आदर करणे आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव यासारखी मूल्ये केवळ तोंडी सांगून चालणार नाही, तर शिक्षकांनी स्वतःच्या आचरणातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली पाहिजे. आपण बोलतो तसे वागतो, हे विद्यार्थी पाहतात, तेव्हा मूल्य अधिक गांभीर्याने घेतात. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये करुणा आणि संवेदनशीलता विकसित केली पाहिजे; जेणेकरून ते स्वतःचाच नव्हे तर समाजाचाही विचार करतील.

आजच्या काळात ज्ञान आणि तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. त्यामुळे शिक्षकांनी स्वतःला सतत शिकत राहण्यास तयार ठेवले पाहिजे. नवीन शिक्षणपद्धती, अभ्यासक्रम आणि अध्यापनाच्या पद्धती शिकून घेणे आवश्यक आहे. शिक्षक केवळ विद्यार्थ्यांचे शिक्षकच नाही, तर स्वतःही एक विद्यार्थी असतात. नवीन तंत्रज्ञान, शिक्षणपद्धती आणि विद्यार्थ्यांच्या बदलत्या गरजा समजून घेण्यासाठी त्यांनी कार्यशाळा, प्रशिक्षण आणि चर्चासत्रांमध्ये आवर्जून भाग घेतला पाहिजे. लवचीक वृत्तीमुळे ते विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतात आणि त्यानुसार आपल्या अध्यापनाच्या पद्धतींमध्ये बदल करू शकतात. शिक्षण हे केवळ ज्ञान देणारे नाही तर, विद्यार्थ्यांच्या भविष्याला आकार देणारे माध्यम आहे. शिक्षकांचा सकारात्मक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता निर्माण करतो. शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवला पाहिजे. कोणताही विद्यार्थी कमजोर नसतो, फक्त त्याला योग्य मार्गदर्शनाची गरज असते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या लहान यशाचे कौतुक केले पाहिजे. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि ते आणखी प्रयत्न करण्यासाठी प्रोत्साहित होतात. शिक्षण प्रक्रिया केवळ शाळेतच घडत नाही. ती पालक आणि समाजाच्या सहकार्याने पूर्ण होते. शिक्षकांनी पालकांशी नियमित संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल माहिती दिली पाहिजे. पालकांचे सहकार्य मिळाल्यास विद्यार्थ्यांच्या अडचणी अधिक चांगल्या प्रकारे सोडवता येतात. याशिवाय, शिक्षकांनी समाजामध्ये होणाऱ्या बदलांची जाणीव ठेवून त्यानुसार आपल्या शिकवण्याच्या पद्धतींमध्ये बदल केले पाहिजेत. त्यांना सामाजिक समस्यांची जाणीव करून देणे महत्त्वाचे आहे.

शिक्षण म्हणजे शाळा-कॉलेज, घोकंपट्टी आणि अखेर पदवी हे आपल्या मनावर आत्तापर्यंत कोरलेले चित्र बदलायला हवे. पाया बळकट करून, प्रात्यक्षिकांवर भर देऊन, कार्यसंस्कृती अवलंबून रोजगारक्षम विद्यार्थी घडवणे हे आजच्या जमान्यात शिक्षकांचे खरे कार्य आहे. त्याचबरोबर मूल्ये, नीतिमत्ता, राष्ट्रप्रेम, सर्वसमावेशकता, संवेदनशीलताही महत्त्वाची आहे. स्वयंशिस्त आणि चांगला नागरिक घडणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आजच्या युगात शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, मित्र आणि तत्त्वज्ञ बनले पाहिजे. त्यांनी स्वतःला सतत अद्ययावत ठेवले पाहिजे, तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत. ▮

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

### नीलेश जोशी

# गणेशोत्सव, आरक्षण अन् फेक नॅरेटिव्ह

'संविधानात बदल केला जाणार आहे' हा फेक नॅरेटिव्ह लोकसभा निवडणुकीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर पसरविण्यात आला. ज्यांनी हा नॅरेटिव्ह पसरविला त्यांचा हेतू त्यावेळी बऱ्यापैकी साध्य झाल्याचे दिसून आले. मुळात फेक नॅरेटिव्ह म्हणजे काय तर खोटी, दिशाभूल करणारी किंवा अर्धसत्यावर आधारित अशी माहिती की, ज्या माहितीच्या प्रसारामुळे समाजातील सर्वसामान्य लोकांमध्ये भ्रम, भीती किंवा द्वेषभाव निर्माण होतो. खोटी माहिती लक्ष्यित समाजापर्यंत इतक्या सुनियोजित पद्धतीने पोहोचविण्यात येते की ज्यामुळे त्या समाज गटाचा बुद्धिभ्रम होतोच होतो. याच रडीच्या डावाचा वापर करून पश्चिम विदर्भातील अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ या जिल्ह्यांसह मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये आदिवासी समाजामध्ये भीती निर्माण करण्यात आली. त्यात धाक दाखविण्यात आला तो आरक्षण जाण्याचा आणि त्या आधारे हिंदू संस्कृतीशी अभिन्न नातं असलेल्या आदिवासींना हिंदूंपासून तोडण्याचा हीन प्रयत्न केला गेला. दुर्दैवाने हे कारस्थान रचणाऱ्यांचा हेतू सफल झाल्याचे काही गावांमध्ये दिसून आले.

आदिवासीबहुल वस्ती असलेल्या पश्चिम विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये व्हॉट्सॲप व तत्सम समाज माध्यमावरून अत्यंत महत्त्वाची सूचना असे उल्लेखून एक संदेश प्रसारित करण्यात आला. त्यात आदिवासी आंध समाजाच्या गाव आणि कुटुंबाची पुणे येथील एसआयटीची टीम सर्वेक्षण करणार असल्याचे म्हटले. गणपती व लक्ष्मी यांची मूर्ती कुठेही दिसू नये, कुठलीही मूर्तिपूजा करतो हे सांगू नये, आमच्या चालिरीती हिंदू धर्माशी निगडित नाहीत असे सांगावे अन्यथा आदिवासी आरक्षण संपुष्टात येईल अशी भीती त्या संदेशात दाखविण्यात आली. दुर्दैवाने अनेक ठिकाणी आदिवासी आंध समाजाचे बांधव या अपप्रचाराला बळी पडले आणि त्यांनी गणेशोत्सवाचे दहा दिवस पूर्ण होण्याआधीच घरगुती आणि सार्वजनिक गणेशाचे विसर्जन केले. खरं म्हणजे अनेक गावांमध्ये आदिवासी बांधवांनी श्रद्धेने गणेशाची स्थापना केली होती. पण आरक्षण जाण्याच्या भीतीतून त्यांनी गणेशाचे विसर्जन केले. मात्र अशी भीती निर्माण करण्याचे कारण काय? हा उद्योग केला कुणी आणि सुनियोजित पद्धतीने भ्रम निर्माण करून धार्मिक भावनेला ठेच पोहोचविणाचे पाप कोणाचे? याचा शोध घेऊन पोलिस प्रशासनासह संबंधित प्रशासकीय विभागांनी दोषींवर ठोस कारवाई करण्याची आवश्यकता आहे. सोबतच भ्रामक प्रचार असल्याचे समुपदेशन गरजेचे आहे. या समुपदेशनाकरिता केवळ शासकीय नव्हे तर सामाजिक संस्थांनी देखील पुढाकार घेणे आवश्यक आहे.

सण, उत्सव याची समृद्ध परंपरा असलेला आपला समाज आहे. सण, उत्सव केवळ कुळाचार नसून प्रत्येक चालिरीतीमागे विज्ञान आहे. पण ही समृद्ध परंपरा खंडित व्हावी नव्हे नष्ट व्हावी असे षडयंत्र फार पूर्वीपासून सुरू आहे. या षडयंत्राला परकीय बळ असल्याचे देखील अनेक वेळा समोर आले. आताही ज्या-ज्या वेळी हिंदू सण, उत्सव सुरू होतात त्या-त्या वेळी पर्यावरणासह असंख्य बाबींचे हित धोक्यात आल्याची आवई उठविणारी एक जमात पुढे येते. त्याला माध्यमातील पिवळा चष्मा घातलेले अनेक जण साथ देतात आणि परंपरेने साजरे होणारे आमचे सण, उत्सव कसे चुकीचे हे बिंबविण्याचा प्रयत्न करतात. पण गत काही वर्षांपासून त्यांचा हा डाव सफल होत नसल्याचे त्यांना दिसून आले. त्यामुळेच आता संभ्रम पसरविण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यासाठी त्यांनी लक्ष्य केले ते दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींना. संभ्रम निर्माण करूनच आरक्षण जाण्याची भीती निर्माण केली गेली. त्याचा परिणाम गणेश विसर्जनात झाला.

एवढेच नव्हे तर या परिसरात श्वेतवस्त्रधारण केलेली भूते देखील सक्रिय असल्याची चर्चा दबक्या आवाजात आहे. ते गत काही वर्षांपासून त्यांना नेमून दिलेले षड्यंत्राचे काम चोख बजावत असल्याची देखील माहिती आहे. त्यांच्या षडयंत्रात अनेक कुटुंबे अडकले असून या कुटुंबांनी देव-धर्मासह पारंपरिक चालिरीती बदलल्या आहेत. ही अत्यंत गंभीर बाब असून समाजातील सजग प्रहरींसाठी आव्हान आहे. वास्तविक समाजात द्वेषभाव निर्माण होईल अशी अफवा पसरविणे कायद्याने गुन्हा आहे. हा गुन्हा करणारे गुन्हेगार मात्र ठिकठिकाणी दहा दिवसांपूर्वीच झालेल्या गणेश विसर्जनाचा असुरी आनंद घेत आहेत. ज्या आदिवासी बंधूंच्या धार्मिक भावनेशी अफवा पसरवून खेळ करण्यात आला त्या आदिवासी बंधूंनी आता पुढाकार घेऊन शासनाकडे संविधानानुसार कारवाईची मागणी करावी. सज्जनशक्तीने त्यांच्या मागणीला आवश्यक ते बळ द्यावे. ▮

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

### श्यामकांत जहागीरदार

# निवडणूक उपराष्ट्रपतींची, राज्यसभा अध्यक्षांची

दि. ९ सप्टेंबरला म्हणजे पुढील आठवड्यात उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक होत आहे. रालोआचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन् आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांच्यात ही लढत होत आहे. यावेळची उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक दक्षिण भारतातील दोन उमेदवारांमध्ये होत आहे. यातील राधाकृष्णन् हे महाराष्ट्राचे विद्यमान राज्यपाल तर सुदर्शन रेड्डी हे सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आहेत.

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत फक्त लोकसभा आणि राज्यसभेच्या खासदारांनाच मताधिकार असतो. राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत लोकसभा आणि राज्यसभेच्या खासदारांसोबत देशातील सर्व राज्यांतील विधानसभा तसेच विधान परिषदेच्या आमदारांनाही मतदानाचा अधिकार असतो. या निवडणुकीत संख्याबळाच्या आधारावर राधाकृष्णन् यांचा विजय निश्चित मानला जात आहे. उपराष्ट्रपतिपद हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे घटनात्मक पद आहे. राष्ट्रपतींनंतर उपराष्ट्रपतिपदाचे घटनात्मक महत्त्व आहे. उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्षही असतात. लोकसभेचे सभापती हे लोकसभेवर निवडून आलेले असतात. मात्र राज्यसभेचे अध्यक्ष हे राज्यसभेवर निवडून आलेले नसतात.

उपराष्ट्रपतिपदाचे दोन्ही उमेदवार सध्या प्रचारात व्यस्त आहेत. विविध राज्यांच्या राजधानीत जाऊन विविध प्रादेशिक पक्षांच्या नेत्यांच्या तसेच खासदारांच्या भेटी घेत आहेत. दोन आघाड्यांच्या उमेदवारांत ही निवडणूक होत असल्यामुळे सामान्यपणे कोणता पक्ष कोणत्या उमेदवाराला मतदान करणार, याचा अंदाज करणे कठीण नाही. खरी चुरस आहे, ती रालोआ आणि इंडिया आघाडीत नसणाऱ्या पक्षांना आपल्या बाजूला ओढण्याची. मात्र यातही रालोआने बाजी मारली आहे. रालोआत नसणाऱ्या अनेक प्रादेशिक पक्षांनी राधाकृष्णन् यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला आहे. रालोआ आणि इंडिया आघाडीतील पक्ष ठरलेले असल्यामुळे दोन्ही बाजूच्या मतदारांची संख्या जवळपास निश्चित आहे, त्यामुळे त्यापेक्षा कमी मते एखाद्या आघाडीच्या उमेदवाराला पडली तरी त्यांची मते फुटली, असे मानता येईल. मते फुटण्याचा सर्वाधिक धोका इंडिया आघाडीच्या उमेदवाराला आहे. राधाकृष्णन् हे महाराष्ट्राचे राज्यपाल असल्यामुळे महाराष्ट्रातील प्रादेशिक पक्षांनी महाराष्ट्राची अस्मिता म्हणून त्यांना मतदान करावे, असे आवाहन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार आणि शिवसेना उबाठाचे उद्धव ठाकरे यांना करत राजकीय मुत्सद्देगिरीचे दर्शन घडवले होते. या दोन्ही नेत्यांनी फडणवीस यांची विनंती फेटाळली असली तरी एखादा चमत्कार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे इंडिया आघाडीतील काही पक्षांनी आणि त्यांच्या खासदारांनी राधाकृष्णन् यांना मतदान केले तर आश्चर्य वाटून घेण्याचे कारण नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या निवडणुकीत कोणत्याच पक्षाला आपल्या मतदारांसाठी पक्षादेश (व्हीप) जारी करता येत नाही. सर्व पक्षाच्या मतदारांना सद्सदविवेकबुद्धीने मतदान करावे लागते. त्यामुळेच या निवडणुकीत मते फुटण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेष म्हणजे उपराष्ट्रपतिपदावर सलग दुसऱ्यांदा निवडून येण्याचे भाग्य आतापर्यंत देशातील दोन नेत्यांना लाभले. पहिले म्हणजे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् आणि दुसरे म्हणजे मोहम्मद हमीद अन्सारी. डॉ. राधाकृष्णन् हे देशाचे पहिले उपराष्ट्रपती होते. १९५२ ते १९६२ असे सलग दोन कार्यकाळ ते उपराष्ट्रपती होते. नंतर ते राष्ट्रपतीही झाले. मोहम्मद हमीद अन्सारी २००७ ते २०१७ या काळात उपराष्ट्रपती होते.

उपराष्ट्रपतिपदाचा विचार केला तर आतापर्यंत भाजपाचे तीनच नेते या पदावर विराजमान झाले. भैरोसिंग शेखावत हे भाजपातून उपराष्ट्रपती झालेले पहिले नेते होते, व्यंकय्या नायडू हे भाजपाचे दुसरे नेतेही उपराष्ट्रपती झाले होते. जगदीप धनकड हे उपराष्ट्रपतिपदाची शपथ घेणारे तिसरे नेते होते. आता राधाकृष्णन् हे भाजपाचे चौथे उपराष्ट्रपती ठरणार आहेत. यातील गंमत म्हणजे भाजपाचा एकही उपराष्ट्रपती हा राष्ट्रपती झाला नाही. राष्ट्रपती होण्याचे भाग्य भैरोसिंह शेखावत, व्यंकय्या नायडू आणि जगदीप धनकड यांना लाभले नाही. धनकड यांना तर अर्ध्यातच उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा द्यावा लागला. आता राधाकृष्णन् यांच्या नशिबात राष्ट्रपतिपद आहे का, हे काळच सांगणार आहे. उपराष्ट्रपती होणारे व्यंकय्या नायडू हे भाजपाचे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष होते. यानंतर भाजपाचा कोणताही राष्ट्रीय अध्यक्ष उपराष्ट्रपती होऊ शकला नाही.

उपराष्ट्रपतिपदावर विराजमान होणारे राधाकृष्णन् हे भाजपाचे दक्षिण भारतातील दुसरे नेते ठरणार आहेत. याआधी व्यंकय्या नायडू हे दक्षिण भारतातील भाजपाचे नेते उपराष्ट्रपती झाले होते. त्यामुळे भाजपाला मिळालेल्या उपराष्ट्रपतिपदातील दोन नेते उत्तर भारताचे तर दोन नेते दक्षिण भारताचे होते, असे म्हणायला हरकत नाही. भैरोसिंह शेखावत आणि जगदीप धनकड हे उत्तर भारतातील नेते म्हणावे लागतील. योगायोग म्हणजे शेखावत आणि जगदीप धनकड हे दोघेही राजस्थानचे होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा कार्यकाळ संपणार असल्यामुळे २०२७ मध्ये राष्ट्रपतिपदाची निवडणूक होणार आहे.

उपराष्ट्रपतिपदावरून राष्ट्रपतिपदावर बढती मिळालेले डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् हे पहिले नेते होते. त्यानंतर झाकिर हुसेन, व्ही. व्ही. गिरी हे उपराष्ट्रपतीही नंतर राष्ट्रपती झाले. आर. व्यंकटरमण, डॉ. शंकरदयाल शर्मा आणि के. आर. नारायणन् या तीन उपराष्ट्रपतींनाही नंतर राष्ट्रपतिपदावर विराजमान होण्याचे भाग्य लाभले. तर मोहम्मद हिदायतुल्लाह आणि बी. डी. जत्ती या दोन उपराष्ट्रपतींनाही काळजीवाहू राष्ट्रपती होण्याचे भाग्य लाभले. हिदायतुल्लाह जवळपास एक महिना काळजीवाहू राष्ट्रपती होते. बी. डी. जत्ती ११ फेब्रुवारी १९७७ ते २५ जुलै १९७७ या काळात कार्यवाहक राष्ट्रपती होते. १९९२ ते ९७ या काळात नारायणन् उपराष्ट्रपती होते, त्यानंतर म्हणजे १९९७ नंतर हे भाग्य कोणत्याही उपराष्ट्रपतींना लाभले नाही. लोकसभेच्या ५४३ तर राज्यसभेच्या २३३ आणि १२ नामनियुक्त अशा २४५ मिळून एकूण ७८८ सदस्यांना या निवडणुकीत मतदानाचा अधिकार आहे. यापैकी लोकसभेतील एक तर राज्यसभेतील ५ अशा सहा जागा रिक्त आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष ७८२ सदस्य मतदानाचा अधिकार बजावणार आहेत. त्यामुळे ३९२ मते ज्या उमेदवाराला मिळतील, तो विजयी होणार आहे. यात रालोआजवळ दोन्ही सभागृहात ४२२ खासदार आहेत. यात लोकसभेतील २९३ आणि राज्यसभेच्या १२९ सदस्यांचा समावेश आहे. इंडिया आघाडीजवळ ३१२ मते आहेत. यात लोकसभेतील २३४ आणि राज्यसभेतील ७८ सदस्यांचा समावेश आहे. दोन्ही आघाडीत नसणाऱ्या तिसऱ्या आघाडीचे संख्याबळ ४८ आहे. यात लोकसभेतील १४ तर राज्यसभेतील ३४ सदस्यांचा समावेश आहे. संख्याबळाचा विचार करता रालोआच्या उमेदवाराला किमान ४५० मते मिळतील, असा अंदाज आहे. त्यामुळे राधाकृष्णन् देशाचे नवे उपराष्ट्रपती होणार हे नक्की आहे. ▮

९८८१७१७८१७

### उत्सव आणि पर्यावरण

भारतीय संस्कृती अनमोल आहे. या संस्कृतीत वर्षभर सण, उत्सव, परंपरा जपल्या जातात आणि त्या अनुषंगाने पर्यावरण संवर्धनही आपोआप साध्य होते. प्रत्येक देवाचे आवडते फूल असते. त्यांच्या पूजनासाठी पत्री असतात. प्रत्येक सण उत्सवाचे अनन्यसाधारण महत्त्व आहेच. निसर्गातील प्रत्येक घटक तेवढाच महत्त्वाचा आहे अशी आपली संस्कृती आहे. हाच एक महत्त्वाचा संदेश या सण उत्सवात आहे

गणेशोत्सव, नवरात्र, रामनवमी, जन्माष्टमी असे अनेक उत्सव आनंदात, जल्लोषात आणि भावभक्तीने साजरे केले जातात. पण या निमित्ताने होणारा महाप्रसाद, शोभायात्रा आटोपली की पर्यावरणाला धोका निर्माण होतो. सर्वत्र निर्माल्य, वाया गेलेले अन्न आणि कचऱ्याचे ढीग यामुळे उत्सवाला गालबोट लागते. प्रत्येक व्यक्तीने आणि मंडळाने आपली जबाबदारी ओळखून कचऱ्याचे योग्य नियोजन केले पाहिजे. अन्न वाया जाऊ नये इतकेच ताटात घ्यावे. अन्न उरले असल्यास योग्य व्यक्तींपर्यंत पोहचवावे. निर्माल्याचे खत करून बागेत, शेतात वापरावे. त्यापासून बरेच लघुउद्योग पण करता येतात, जे पर्यावरण संवर्धन करू शकतात. तलाव, नद्या, समुद्र यात मूर्ती, निर्माल्य टाकून निसर्ग सौंदर्याला बाधा आणू नये इतकी काळजी घ्यायला हवी. तरच निसर्ग आणि परमेश्वर देखील आपोआपच प्रसन्न राहून आशीर्वाद देईल हे निश्चित.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

●● ●●

### ओबीसींच्या हक्काची खरी लढाई

मनोज जरांगे यांच्या उपोषणानंतर सरकारने हैदराबाद गॅझेटियरनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला. मात्र मराठ्यांचा ओबीसी आरक्षणात समावेश झाल्यास कुणबी व ओबीसी समाजाचे नुकसान होईल, अशी भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे ओबीसी संघटनांचा विरोध कायमअसून संघर्ष तीव्र होण्याची शक्यता आहे. ओबीसींवर सतत अन्याय होत असून सरकारी नोकरभरतीतील भेदभाव, खाजगीकरण, अपुरी शिष्यवृत्ती, तसेच 'नॉट फार सुटेबल' या कारणाखाली आरक्षणाची गळचेपी सुरू आहे. बिहारसारख्या राज्यांनी जातनिहाय जनगणना करून लोकसंख्येनुसार आरक्षण दिले, तर दक्षिण भारताने ५० टक्क्यांवरील मर्यादा ओलांडून ती नवव्या अनुसूचित टाकली. महाराष्ट्र मात्र या बाबतीत मागे आहे. खरा तोडगा फक्त दोनच आहेत -जातनिहाय जनगणना आणि ५० टक्के मर्यादा हटविणे. मराठ्यांचा ओबीसी आरक्षणात समावेश अशक्य आहे. त्यामुळे समाजाने गोंधळाला बळी न पडता, एकत्र येऊन आपल्या हक्कांसाठी लढा दिला पाहिजे.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

●● ●●

## वाचक पत्रे

### शिक्षकी पेशा; एक व्रत

शिक्षकी पेशा म्हणजे केवळ एक नोकरी नसून ते एक व्रत आहे जे प्रत्येक शिक्षकाने संपूर्ण श्रद्धेने आणि जबाबदारीने स्वीकारलेले असते. 'कि घेतले न हे व्रत आम्ही अंधतेने' या ओळीतून शिक्षकाच्या समाजाप्रति जबाबदारीची व समर्पणाची भावना व्यक्त होते. हा पेशा स्वीकारण्यासाठी एका शिक्षकाने देखील डॉक्टर, इंजिनीयर, वकील यांच्याप्रमाणे स्वतंत्र व विशेष असे शिक्षण व प्रशिक्षण घेतलेले असते. त्यानंतरच प्रत्येक शिक्षक स्वतःला ज्ञानाचा दीप म्हणून विद्यार्थ्यांपुढे उभा करतो आणि नंतर हा दीप स्वतः आयुष्यभर जळून इतरांना प्रकाश देतो व मार्ग दाखवतो. कुंभाराप्रमाणे शिक्षक ओल्या मातीच्या गोळ्याप्रमाणे असलेल्या लहान अबोध बालकांना घडवून सुबक आकार देऊन त्यांचे भविष्य घडविण्याचा प्रयत्न करतो. शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची आवड निर्माण करतो आणि त्यांना भविष्यासाठी तयार करतो. एक चांगला शिक्षक विद्यार्थ्यांना स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवायला शिकवतो. हीच खरी शिक्षकाच्या आयुष्याची व्याख्या आहे.

भारतात दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो. या दिवशी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या जयंतीनिमित्त शिक्षकांचे योगदान आणि त्यांचा सन्मान केला जातो. शिक्षकांच्या समर्पणाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये कृतज्ञता निर्माण व्हावी, त्यांचे योगदान लक्षात राहावे म्हणून हा खास दिवस असतो. शिक्षक समाजाची मूलभूत प्रेरक शक्ती असतो. शाळा, गाव, शहर जिथे कुठे असो, शिक्षक आपल्या शिष्यांना घडवताना स्वतःच्या सुख-दुःखाचा विचार करत नाहीत. संस्कार, शिस्त, मेहनत आणि प्रामाणिकपणा शिक्षक स्वतःच्या जीवनातून विद्यार्थ्यांना शिकवतात. नव्या पिढीला घडवताना ते अनेकदा स्वतःच्या आयुष्यातील अडचणीही बाजूला ठेवतात. त्यांच्या मार्गदर्शनाने अनेक डॉक्टर, इंजिनीयर, वकील, नेता, शास्त्रज्ञ घडतात. शिक्षक म्हणजे शिक्षणाची आणि चारित्र्य जडणघडणीची एक कार्यशाळा असते. जेव्हा समाज शिक्षकी पेशाकडे आदराने पाहतो, तेव्हा समाजाची नवी दिशा निश्चित होते. शिक्षक केवळ अभ्यासक्रम शिकवत नाहीत, तर ते विद्यार्थी घडवतात. संस्कारांची मशाल त्यांच्या हातात असते. डिजिटल युगात विद्यार्थ्यांना नानाविध माहिती सहज मिळते, पण योग्य विचार करायला शिकवणे हे काम एक शिक्षकच करू शकतो. शिक्षकी पेशात शिक्षकांनी जे व्रत घेतले आहे ते अंधतेने नव्हे, तर दृढ विश्वासाने, सेवाभावाने, कर्तव्यभावनेने आणि विवेकाने घेतलेले असते. यात विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य घडविण्याच्या ठाम निर्धार असतो. देशाच्या भावी नागरिकांना ज्ञानाचा, संस्कारांचा आणि प्रेरणेचा प्रकाश देण्याचे हे व्रत आहे. ▮

**सुमेघ रामचंद्र वानरे**/९१३००२१३८७

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com/



# महत्वाचे...

## बसमधून खाली उतरत असताना ३२ हजाराची रोकड पळविणारी महिला ताब्यात

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

बसमधून खाली उतरत असताना, गर्दीचा फायदा घेत ४१ वर्षीय महिलेच्या पर्समधून ३२ हजाराची रोकड पळवणाऱ्या २६ वर्षीय महिलेस फौजदार चावडी पोलिसांनी ताब्यात घेतले. तिच्याकडून चोरी गेलेला ३२ हजाराचा ऐवज हस्तगत केला. नेहा तेजू मंसू (वय २६ रा. चिकलठाणा, संभाजी नगर,सध्या केगाव) असे ताब्यात घेतलेल्या महिलेचे नाव आहे. ही घटना सोलापूर बस स्थानकात मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली आहे. गुन्हा दाखल होताच दुसऱ्या दिवसीच सीसीटीव्ही व गोपनीय माहितीच्या आधारे त्या महिलेस ताब्यात घेत गुन्हा उघडकीस आणला आहे. सोनाली शंकर वगरे (वय ४१ रा. घाटी ता. माढा सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यामध्ये त्या दोन सप्टेंबर दुपारी बाराच्या सुमारास सोनाली वगरे या सोलापूर एसटी स्टँड येथे बसमधून खाली उतरत होत्या. त्यामध्ये बसमध्ये आरोपी नेहा मंसू ही देखील होती. बसमधून उतरताना बसमध्ये गर्दी होती. त्या गर्दीचा फायदा घेत नेहा मंसू हिने फिर्यादीच्या पर्समधील ५०० रुपयांच्या ६४ नोटा म्हणजे एकुण ३२ हजार रुपये काढून घेतल्याचे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे. पोलिसात गुन्हा नोंद होताच पोलिसांनी त्या दिवशी आलेल्या बसेची पाहणी केली त्यामध्ये नेहा मंसू हा आपल्या तीन वर्षाच्या लहान मुलाला घेवनू उतरल्या होत्या. त्याचा शोध घेतला असता त्या केगाव येथील पालात राहत असल्याची माहिती मिळाली, तीस ताब्यात घेवून चौकशी केली असता तीने चोरी कबुली दिली. तिने चोरी केलेल्या ३२ हजाराचा ऐवज हस्त केला आहे. या तपास प्रवीण चुंगे हे करीत आहेत.

## शेतजमिनीवरून वाद; दमदाटी करून रस्ता अडवला

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील केगाव येथे शेतजमिनीवरून निम र्ण झालेल्या वादातून पाच संशयित आरोपींनी शेतकऱ्याला व त्याच्या मुलीला दमदाटी करून रस्ता अडवला आहे.फिर्यादी संजय




ज्ञानोबा पाटील (वय-६१) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार,दि.२७ ऑगस्ट रोजी दुपारी १२.३० वाजता आरोपी नागनाथ पाटील,अम ोल पाटील,रोहन पाटील,राज पाटील व समर्थ पाटील (सर्व रा.मुरारजी पेठ,सोलापूर) यांनी फिर्यादीच्या जमिनीवर जाणाऱ्या वाटेत मोहाच्या झाडाच्या फांद्या टाकून अडथळा केला.फिर्यादी व त्यांची मुलगी फांद्या बाजूला करताना,संशयित आरोपींनी त्यांना दमदाटी केली व झाडाच्या फांद्या पुन्हा जमिनीत टाकल्या. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे गाताचीवाडी तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे गाताचीवाडी येथील शेतजमीन तिचा जुना गट नं. २५४४ असून तिचा नविन गट नं. २३ याचे क्षेत्र हे. ०२-२८ आर + पो. ख. हे. ००-०३ आर, असे एकुण क्षेत्र हे. ०२-३१ आर, आकार रु. ०८-१७ पैसे यासी चतुःसिमा पुर्वेस-गट नं. २४, दक्षिणेस-गट नं. २, पश्चिमेस-गट नं. २१ व उत्तरेस-गट नं. २२ व २४, या जमिनीपैकी माझे अविभक्त ३/४ हिश्श्याची जमीन तिचे क्षेत्र हे. ०१-७१ आर + पो. ख. हे. ००-०२ आर असे एकूण क्षेत्र हे. ०१-७३ आर, आकार रु. ०६-१२ पैसे, येणेप्रमाणे शेतजमीन आतील सर्व झाड, झुडूप, दगड, माती, ताली वगैरे तद्गंभूत वस्तुसह.

सदरहू जमिन श्री. संदिप सुरेश बारंगुळे यांचे स्वतंत्र खरेदी मालकीची व कब्जेवहिवाटीची असून रेकॉर्डला त्यांचे नावाची नोंद असलेली मिळकत आहे. सदर मिळकत त्यांनी त्यांचे कौटूंबिक व कायदेशीर अडचणीकरीता, व इतर कायदेशीर गरजेकरीता विक्री करण्याचे ठरवले आहे. त्याप्रमाणे सदर मिळकतीबाबत आमचे अशिल सौ. अर्चना श्रीकृष्ण जाधव यांचेसोबत श्री. संदिप सुरेश बारंगुळे यांनी खरेदीखताचा व्यवहार केलेला असून सदर व्यवहारापोटी इसारादाखल रक्कमही स्विकारलेली असून त्याबाबतचा दस्त देखील आमचे अशिलाचे हक्कात लिहून नोंदवून दिलेला आहे. तरी सदर मिळतीबाबत कोणाचे कसलेही अधिकार, हक्क, म्हणजे साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, गहाणखत, साठेखत, बोजा, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही हक्क असल्यास ते कागदोपत्री पुराव्यासह आमचे कार्यालयात १० दिवसात लेखी हरकत नोंदवावी. कागदोपत्री पुराव्याशिवाय हरकत आल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदी करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ता. ०३/०९/२०२५

सही/-
ॲड. शंकर पांडूरंग ननवरे
जिल्हा व सत्र न्यायालय आवार, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
मो. नं ८१४९०६०००८
अशिला तर्फे ॲडव्होकेट

### शिवलाल रामचंद वाचनालय, माढा
### वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

शिवलाल रामचंद वाचनालयाची सर्वसाधारण सभा दिनांक २१/९/२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता संस्थेच्या बालुबाई सभागृहात आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे. ही नम्र विनंती. विषयपत्रिका वाचनालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आली आहे. दिनांक ३/९/२०२५

सही/- हणमंत परबत (सर) (अध्यक्ष)
सही/- संकल्प शहा (कार्यवाह)

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि।। व सब डि।। सोलापूर महानगरपालिका सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील न्यु पाच्छा पेठ (भद्रावती पेठ) येथील टी.पी. स्किम १ सिटी सर्व्हे नं १०३८१ पैकी फायनल प्लॉट नं ६०+१७ पैकी सब प्लॉट नं ३५ पैकी एकूण क्षेत्र १९९ चौ.मी इतके असून यात बांधलेल्या आलेल्या रमण कॉम्प्लेक्स मधील पहिल्या मजल्यावरील १ बी एच के असे फ्लॉट नं २ याचे कारपेट क्षेत्र ६०.६५ चौ.मी व सुपर बिल्टअप क्षेत्र ७२.७० चौ. मी इतके असून याचे प्रमाणित हक्क २४% इतके असून यासी चतुःसिमा येणेप्रमाणे - पुर्वेस - फा. प्लॉट नं. १६/३६, दक्षिणेस - फा. प्लॉट नं. १६/४६, पश्चिमेस - फ्लॉट नं १. उत्तरेस - रस्ता.

येणेप्रमाणे वर नमुद मिळकत व त्यातील तदंगभूत वस्तु व वहिवाटीच्या हक्कासह श्री हर्षवर्धन अशोक विडप यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. तरी श्री हर्षवर्धन अशोक विडप यांनी मिळून आमचे अशिलांना सदर मिळकत विक्री करण्याचे ठरवून त्या अनुषंगाने त्यांनी दि.१६/०६/२०२५ रोजी आमच्या अशिलाच्या नावे इसार पावती लिहुन देऊन त्या अन्वये त्यांनी साक्षीदारासमक्ष आमचे अशिलाकडून इसारा रक्कमही स्विकारलेली आहे तरी श्री हर्षवर्धन अशोक विडप हे आमचे अशिलास लवकरात लवकर सदर मिळकतीचे रजि. खरेदीखत करून देणार आहेत.

तरीसदर वर नमुद मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दावा, लीज, जप्ती, टाच, गहाण, बक्षिस, कुलमुख्त्यार, वहिवाटी हक्क, वारसदार, वाटणी हक्क, खरेदी विक्री वगैरे अन्य स्वरूपाचा हक्क व हितसंबंध असतील तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३ (तीन) दिवसाचे आत खालील नमूद पत्यावर कागदोपत्री व पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाच्याही कसल्याही प्रकारची तक्रार व हरकत न आल्यास सदर वर नमुद मिळकतही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील मग मात्र कोणाचाही कसल्याही प्रकारची तक्रार, हरकत चालणार नाही व ते आमच्या अशिलाच्या खरेदी व्यवहारावर मुळीच बंधनकारक राहणार नाही. कोणाचेही कसल्याही प्रकारची फसवणूक होऊ नये यास्तव सदरहू नोटीस दिली आहे. ही जाहीर नोटीस दिली तारीख - ०३/०९/२०२५

सही/-
महेंद्र तुळजाराम वड्डेपल्ली
डी.सी.एल., (सायबर लॉ), एलएल.बी., एलएल.एम.
(ॲडव्होकेट)
ऑफिस - शॉप नं. १५ पहिला मजला, राघवेंद्र भवनम कॉम्प्लेक्स, दत्त नगर, सोलापूर
मो.नं. ९९६०९५९८५९

# दुष्कर्माचा खटला तडजोडीने रद्द करता येतो

## कोल्हापूर उच्च न्यायालय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. ३ सप्टेंबर-**

येथील युवतीवर दुष्कर्म केल्याप्रकरणी अमोल ज्ञानदेव जाधव (रा. औरंगपूर, ता. राजुरी, जिल्हा बीड) याच्यावर असलेली दाखल फिर्याद कोल्हापूर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एम.एस. कर्णिक व शर्मिला देशमुख यांनी रद्दबादल केली.

याची हकीकत अशी की पीडिता व आरोपी अमोल हे नातेवाईक होते व त्यांचे लग्न जमले होते. परंतु काही दिवसांनी त्यांचे लग्न मोडले. त्यानंतर दोघे फोनवर बोलत होते. आरोपी अम ोल हा मी तुझ्याशीच लग्न करणार असे म्हणत होता, दिनांक १० नोव्हेंबर २०२४ रोजी अमोल हा सोलापूरला आला व त्याने पिडीतेस बोलावून घेऊन तिस हॉटेलमध्ये नेऊन तिचेवरती दुष्कर्म केले. त्यानंतर अमोल याने पीडितेस फोन करून वाढदिवसासाठी बीड येथे बोलावले. १६ नोव्हेंबर २०२४ रोजी पीडितता ही बीड येथे आली असता अमोल याने लग्नाचे अमिष दाखवून तिचेवर दुष्कर्म केले. पीडिता ही अमोल यास लग्नाबाबत विचारत असता, तो थोडे थांब असे म्हणत असायचा. २१ डिसेंबर २०२४ रोजी अमोल याने तिचे घरी येऊन शिवीगाळ करून तिचे वडिलांस जीवे मारण्याची धमकी दिली. अशा आशयाची फिर्याद पिडीतेने २७ डिसेंबर २०२४ रोजी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात दिली होती. त्यावर आरोपी अमोल जाधव याने ॲड. रितेश थोबडे यांचेमार्फत कोल्हापूर उच्च न्यायालयात त्याच्याविरुद्ध दाखल असलेली दुष्कर्माची फिर्याद रद्द होणे बाबत याचिका दाखल केली होती.

याचिकेच्या सुनावणी वेळेस यातील पिडीतेस खटला पुढे चालविण्याचा नाही, तिने दाखल केलेली फिर्याद रद्द करण्यास तिची हरकत नाही हे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्या पृष्ठार्थ सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे सादर केले त्यावरून न्यायमूर्तींनी आरोपी विरुद्ध दाखल असलेली फिर्याद रद्दबातल केली. यात आरोपीतर्फे ॲड. रितेश थोबडे यांनी तर सरकारतर्फे ॲड वीर शिंदे यांनी काम पाहिले.



## घरफोडीचे २ गुन्हे उघडकीस, ३० ग्रॅम सोने हस्तगत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. ३ सप्टेंबर-**

वेळापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीचे गुन्हे केलेल्या आरोपीला अटक करून त्याच्याकडून गुन्ह्यातील ३० ग्रॅम वजनाचे सोने हस्तगत केले. ही कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

करण शरन्यां भोसले (वय २९, रा मतकरवस्ती कोराळे ता. बारामती जिल्हा पुणे) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. वेळापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या घरफोडी, चोरीच्या गुनह्यातील आरोपीचा शोध घेत असताना, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला आरोपीचा या गुन्ह्यात सहभाग असल्याची माहिती मिळाली. याबाबत विनायक घोरपडे यांना मिळालेल्या माहितीनुसार आरोपीला पुणे जिल्ह्यातील मतकरवस्ती कोराळे येथून ताब्यात घेतले. त्याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडून ३० ग्रॅम सोने हस्तगत करण्यात केले. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जगताप, यांच्या म ार्गदर्शनाखाली सपोनि विजय शिंदे, पोसई श्रीकांत गायकवाड, हवालदार रवी माने, सलीम बागवान, धनराज गायकवाड, मनोज राठोड, सूरज रामगुडे, विनायक घोरपडे, अन्वर अत्तार, अश्विनी गोटे, दीपाली जाधव, सुनंदा झळके, सतीश बुरकुल यांनी बजावली आहे.

## शाळेत बाकड्यावरून पडून विद्यार्थी जखमी

**सोलापूर :** शाळेत वर्गात असताना बाकड्यावरून तोल जाऊन पडल्याने विद्यार्थी जखमी झाला. हा प्रकार बुधवारी सकाळी ९.३० वाजता प्रोगेसिव्ह हायस्कूल येथे घडला. अलि आलम शेख (वय ९, रा. नई जिंदगी अमन चौक) असे विद्यार्थ्याचे नाव आहे. अलि हा बुधवारी वर्गात असताना, अचानक तोल गेल्याने तो बाकड्यावरून खाली पडला. यात डोक्याला मार लागून अलि जखमी झाला. उपजिल्हा रुग्णालयात उपचार करून वडील आलम यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले.

### सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

विजापूर रोड, रेवण सिध्देश्वर मंदिर लगत, सोनीनगर, सोलापूर
**पशुवैद्यकीय विभाग व प्राणिसंग्रहालय विभाग**
E-mail ID : mahatmagandhizoosolapur@gmail.com

जा.क्र./पशुवैद्यकीय/१५२ | दि.०३/०९/२०२५

**जाहीर टेंडर नोटीस**

सोलापूर महानगरपालिका, म.गांधी प्राणीसंग्रहालय, पशुवैद्यकीय विभागाकडील सन 2025-2026 चिकन, म्हैसवर्गिय बीफ व अंडी पुरवठा करणेकरिता ई निविदा प्रसिध्दीकरण करणे या कामाचे महाराष्ट्र शासनाच्या सो.म.पा. संकेतस्थळ http// www.mahatenders.gov.in व सो.म.पा. चे या वेबसाईटवर दि.01/09/2025 पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

**टेंडर ID NO : 2025_SMC_1214546_1**

सही/-
पशु शल्य चिकित्सक
पशुवैद्यकीय विभाग व प्राणीसंग्रहालय विभाग
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

### Uddyam PAHSUI Foundation, Solapur

(Section 8 Company)
An incubation Centre of PAH Solapur University, Solapur
Website- https://incubation.sus.ac.in/, Email- diil@sus.ac.in Tel: 02132017 2744770

**Recruitment Advertisement**

Uddyam PAHSUI Foundation Solapur is an Incubation Center (Section 8 Company CIN: U80300PN2019NPL187196) hosted by Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur.

Uddyam PAHSUI Foundation invites the application for following posts-

1. **Assistant Manager-Skill Development & Entrepreneurship (01)**
2. **Office Assistant. (01)**

Applicant shall be dynamic and self- motivated person possessing relevant experience in Start-up Ecosystem. For more details visit: http://incubation.sus.ac.in/ and interested candidate can submit application on or Before 18th Sep, 2025 in a prescribed format as stated in advertisement.

**Date : 3/9/2025**

Sd/-
**President**
**Uddyam PAHSUI Foundation**

### नावात बदल

मी **आमीर शाहिद अन्सारी** (जुने नाव) वडील- शाहिद अब्दुल शकूर अन्सारी, माझे नाव बदलून **मो. आमीर मो. शाहिद अन्सारी** असे केले आहे कारण माझे सगळे नवीन दस्तावेज मधे माझा नवीन नाव उपस्थित आहे. दि. ०३/०९/२०२५ असे एफिडेविट केले आहे. नोटरी- एडवोकेट भीमराव लंकेश्वर, माढा, जिल्हा सोलापूर

### CHANGE IN NAME

I, **MIR SHAHID ANSARI** (OLD NME), S/O SHAHID ABDUL SHAKUR ANSARI, have changed my name to **MOHD AAMIR MOHD SHAHID ANSARI** (NEW NAME) as all my documents are available as per new name and shown vide affidavit Dtd: 03/09/2025 sworn before NOTARY Adv. Bhimrao Ashok Lankeshwar, Madha, District : Solapur.

### जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमलेली ता. ३०/०९/२०२५
क्रि. कि. अर्ज नं. ५९/२०२३

**बार्शी येथील मे. ज्यु. मॅ. वर्ग १ साहेब यांचे न्यायालयात**

**अजित गोरख भोसकर,** वय-३९ वर्षे, धंदा- शेती, रा. शिवाजी नगर, वैराग, अर्जदार ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

**वि.**

**मा. निबंधक/जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी** नगरपंचायत वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर — **सा.वाला**

ज्या अर्थी, अर्जदार हा वर नमुद ठिकाणी त्याचे कुटूंबासह राहत आहे अर्जदाराचा मुलगा शंभूराजे अजित भोसकर हा दि.०९/०५/२०१९ मौजे वैराग, ता. बार्शी येथे जन्म झाला. सदर जन्माची नोंद अर्जदाराने वैराग नगरपंचायतीचे जन्म मृत्यु रजिष्टरला करावी परंतु यातील अर्जदाराचे अनावधानाने व कुटूंबात कोणीही जाणकार इसम नसलेने अर्जदाराचे मुलाचे जन्माची नोंद संबंधीत नगरपंचायतीचे जन्म मृत्युचे रजिष्टरला झाली नाही. परंतु हल्ली अर्जदारास त्याच्या मुलास शाळेच्या कामकाजासाठी व इतर शासकीय कामाकरिता जन्माचा दाखल्याची गरज भासलेने अर्जदाराने सा.वाला नगरपंचायतकडे त्यांचे जन्माचा दाखल्याची मागणी केली असता संबंधीत अधिकारी यांनी त्यांचेकडील रेकॉर्डचा शोध घेतला असता अर्जदाराचे जन्माची नोंद केल्याचे आढळून आली नाही म्हणून तसे पत्र दिले असे कथन करुन अर्जदाराने मुलांचे जन्माची नोंद सा.वाला यांनी करावी म्हणून या मे. कोर्टाकडे अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते को, वर नमुद अर्जदाराचे अर्जातील मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचे काही हरकती, आक्षेप, तक्रारी असतील तर संबंधितांनी हा जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमलेल्या ता.३०/०९/२०२५ रोजी पर्यंत मे. कोर्टात स्वतः अगर आपल्या विधीज्ञामार्फत हजर होवुन आपले तक्रारी, हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील. हे जाहीर प्रसिध्दिकरण आमचे सही निशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी केले असे. ता.२९/०८/२०२५

सही/- कनिष्ठ लिपीक | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा. अधिक्षक मे.ज्यु.मॅ.वर्ग १ सो. बार्शी

### जाहिर प्रसिध्दीकरण

अर्ज वारस दाखला मिळणेबाबत
दि. कि. अर्ज नं. ३४/२०२४
नि. नं. १२

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात**
**मे.H.U.U. पाटील कोर्ट**

**रोहिणी उर्फ मिना राजू कांबळे, वय- ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. शामराव नगर, सिध्दीविनायक चौक, सांगली, ता. जि. सांगली** — **अर्जदार**

**विरूध्द**

**कोणी नाही** --- **सा.वाला**

ज्या अर्थी, यातील अर्जदार यांनी शाम प्रभाकर घोलप हे दि. २७/०३/२००९ रोजी मयत झालेने मे. कोर्टात यातील अर्जदार यांना मयत शाम प्रभाकर घोलप यांचे पश्चात मौजे अलिपूर, ता. बार्शी या ठिकाणी गट नंबर ११ पैकी ०.०१.५० आर या मिळकतीवर अर्जदार यांचे नांव लावणेकरीता अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत शाम प्रभाकर घोलप यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. ८/१०/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल. कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्क्यानिशी दिले असे, ता.

कोर्टाचा शिक्का | सही/- सहाय्यक अधिक्षक मा.दिवाणी न्यायालय क.स्तर बार्शी

### जाहिर प्रसिध्दीकरण नोटीस

नेमलेली तारीख ७/१०/२०२५
रे.गु.नं. ९८८/२०१५
नि.६६

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. सो यांचे कोर्टात**

**लक्ष्मीबाई पौळ** -- **वादी**
**विरुध्द**
**दिलीप काशिद** --- **प्रतिवादी**

**या जाहिर नोटीसद्वारे सुचित करणेत येते की,**

ज्या अर्थी यातील वादीने बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि साहेब यांचे कोर्टात रे.मु. नं.९८८/२०१५ हा निरंतर मनाई मिळणेसाठी दाया प्रतिवादी विरुध्द दाखल केलेला आहे. याकामी वादी यांनी

**प्रतिवादी नं. २) लता प्रकाश पवार,** वय- सज्ञान, धंदा-घरकाम, रा. वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
**प्रतिवादी नं. ३) नंदा बाळासाहेब काळे,** वय-सज्ञान, धंदा-घरकाम, रा. पानगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर
**प्रतिवादी नं. ४) वैशाली दशरथ काळे,** वय-सज्ञान, धंदा- घरकाम, रा. पानगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर
**प्रतिवादी नं. ६) कालीदास गंगाराम देवकते,** वय- सज्ञान, धंदा-काही नाही, रा.इर्ले, ता. बार्शी, जि. सोलापूर
**प्रतिवादी नं. ७) खंडू दत्तु सुरवसे,** वय-सज्ञान, धंदा-काही नाही, रा. वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर

यांना सदरकामी प्रतिवादी नं. २,३,४,६,७ यांना याकामी प्रतिवादी म्हणून सामील केलेले आहे. सदर दाव्यास या प्रतिवादीतर्फे लेखी कैफियत म्हणणे, उत्तर दाखल करणेकामी नमूद व्यक्तिनी मे. कोर्टामध्ये नेमलेल्या तारखेस अगर सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० तीस दिवसाचे आत समक्ष अथवा वकिलामार्फत हजर होवून म्हणणे, कैफियत दाखल करावे, अन्यथा मे. कोर्ट तुमचेविरुध्द पुढील योग्य ते हुकूम करतील याची नोंद घ्यावी. कळावे ही जाहिर नोटीस प्रसिध्द केली असे दि.३०/८/२०२५

सही/- लिपीक | कोर्टाचा शिक्का | सही/- स. अधिक्षक मे.सि.ज.ज्यु. डि साहेब कोर्ट बार्शी

### कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि. श्रीपूर

जा.क्र. : ०४३०/२०२५-२६

**अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

(फक्त सभासदांकरिता)

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लिः श्रीपूर या संस्थेची सन २०२४-२०२५ या वर्षाची अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि.२०/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता कारखान्याचे चेअरमन मा.आ.श्री. प्रशांतराव प्रभाकर परिचारक यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर विचार विनिमय करून निर्णय घेण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सदर सभेस सभासदांनी उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**- सभेपुढील विषय-**

विषय नं. १ : दि. २६-०९-२०२४ रोजी झालेल्या तेहतीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृतांत वाचून कायम करणे.
विषय नं. २ : दि.१-४-२०२४ ते ३१-३-२०२५ या वर्षाच्या कामकाजाचा संचालक मंडळाने तयार केलेला अहवाल स्विकारणे.
विषय नं. ३ : दि.१-४-२०२४ ते ३१-३-२०२५ या वर्षाच्या हिशोबाचे नफा-तोटा पत्रक व दि.३१-३-२०२५ अखेरचे ताळेबंद पत्रक स्विकारणे.
विषय नं. ४ : दि.१-४-२०२४ ते ३१-३-२०२५ या कालावधीतील वैधानिक लेखापरिक्षक मे.एस. जे. जे. एस. ॲड. कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांचेकडून आलेल्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेवून मागील वर्षाच्या लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल स्विकारणे.
विषय नं. ५ : सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजपत्रकापेक्षा कमी अधिक झालेल्या खर्चाची नोंद घेणे.
विषय नं. ६ : सन २०२५-२६ चे महसुली व भांडवली अंदाजपत्रकाची नोंद घेणे व मंजुरी देणे.
विषय नं. ७ : शासनमान्य लेखापरिक्षकांच्या नामतालिकेमधून आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व लेखापरिक्षण शुल्क ठरविणे.
विषय नं. ८ : सन २०२५-२६ करिता आयकर सल्लागार, विक्रीकर सल्लागार, सर्व्हिस टॅक्स सल्लागार, इंटरनल ऑडिटर, कॉस्ट ऑडिटर, एनर्जी ऑडिटर, जी.एस.टी. सल्लागार इत्यादिंच्या नेमणुका करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
विषय नं. ९ : सन २०२४-२५ मध्ये विक्री केलेल्या स्क्रैप मटेरियलची नोंद घेवून सन २०२५-२६ मध्ये निर्माण होणारे स्क्रॅप विक्री करणेबाबत निर्णय घेणे.
विषय नं. १० : कारखान्याच्या गाळप क्षमतेनुसार ऊसाच्या उपलब्धतेनुसार इतर कारखान्याकडून ऊस गळीतास घेणे अथवा देणे बाबत निर्णय घेणे.
विषय नं. ११ : गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये गाळपास आलेल्या व हंगाम २०२५-२६ मध्ये गाळपास येणाऱ्या ऊसाची एफ. आर.पी. नुसार ऊसबिल देयके व्याज याबाबत ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी करण्यात आलेल्या करारानुसार पुर्तता करणेबाबत निर्णय घेणे.
विषय नं. १२ : सन २०२४-२५ या वर्षाच्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर राहणेबाबत सभासदांच्या आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.
विषय नं. १३ : मा.अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

**✲ विशेष सूचना ✲**

१) सहकारी संस्था, सभासद यांनी अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे, कामकाजात भाग घेणे, मतदान करणे, इत्यादिबाबत आपल्या प्रतिनिधीस अधिकार दिल्याबद्दल संस्थेच्या पंचकमिटीच्या ठरावाची खरी नक्कल मा. चेअरमन अथवा मा. व्हाईस चेअरमन आणि सेक्रेटरी यांच्या संयुक्त सही शिक्यानिशी दि.१३/०९/२०२५ पर्यंत कारखाना कार्यालयामध्ये मिळेल अशा रितीने पाठवावी.
२) कारखान्याच्या पोटनियम क्रमांक २३ ला अधिन राहून आवश्यक असलेली गणपूर्ती (कोरम) नसल्यास सभेचे कामकाज सात दिवस स्थगित करून पूर्वीच्याच विषयपत्रिकेप्रमाणे सभेचे कामकाज त्याचठिकाणी त्याचवेळी होईल. त्यावेळी सभेस नियमाप्रमाणे गणपूर्तीची (कोरम) आवश्यकता राहणार नाही.
३) मा. सभासदांना कारखान्याच्या कामकाजासंबंधी काहीं धोरणात्मक प्रश्न विचारावयाचे असल्यास ते प्रश्न दि.१३/०९/२०२५ पर्यंत कारखान्याच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पोहचतील अशा बेताने पाठवावेत.
४) सभेस येताना ओळखपत्र सोबत आणावे.

**स्थळ :** गणेश हॉल, श्रीपुर (कारखाना कार्यस्थळ) ता. माळशिरस, जि. सोलापूर
**दिनांक :** ०४/०९/२०२५

मा. संचालक मंडळाचे आदेशावरून
डॉ. यशवंत कुलकर्णी
कार्यकारी संचालक

### सोलापूर महानगरपालिका सोलापूर

पत्ता :- इंद्रभुवन, पुण्यश्लोक आबासाहेब वारदपथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१ नगर अभियंता कार्यालय, नागरीकामे
ई-मेल - ce.smc@gmail.com मो. ९८९०६९४९७५
जा.क्र. नगरअभियंता/नागरीकामे/२०२५-२६/११२५ | दिनांक - २५/०८/२०२५

**सोलापूर महानगरपालिका सोलापूर**
**जाहिर प्रसिध्दीकरण**

सोलापूर महानगरपालिकेमार्फत श्री. गणेश मुर्ती विसर्जन २०२५ करिता शहरातील सर्व नागरिक विविध गणेश उत्सव मंडळ यांना खालील नमुद विसर्जन ठिकाणे/विहिरी/कुंडामध्ये व्यवस्था करणेत आलेली आहे. या व्यतिरिक्त ज्या श्री. गणेश भक्तांना श्री. गणेश मुर्ती विसर्जनासाठी संकलन केंद्रामध्ये जमा करावयाच्या आहेत. त्यांच्या करिता श्री. गणेश मुर्ती संकलन केंद्राची व्यवस्था सोलापूर महानगरपालिकेकडून करणेत आलेली असून, त्याची माहिती वर्तमान पत्रात संक्षिप्त पणे देणेत आलेली आहे.

| अ. क्र. | विभागीय कार्यालय क्र. | श्री. गणेश मूर्ती विसर्जन ठिकाण/कुंड/विहिरी |
|---|---|---|
| १ | ०१ | गणपती घाट कुंड |
| २ | ०१ | विष्णू घाट कुंड |
| ३ | ०२ | विडी परकुल म्हाडा विहीर |
| ४ | ०२ | मंठाळकर खाण हिप्परगा, तुळजापूर रोड |
| ५ | ०३ | एम.आय.डी.सी. ओपन स्पेस प्रिसिजन फैक्ट्री जवळ-कृत्रिम कुंड |
| ६ | ०५ | श्री छत्रपती संभाजी महाराज तलाव (कंबर तलाव) - (३ कृत्रिम कुंड) |
| ७ | ०५ | राजस्व नगर विहीर |
| ८ | ०६ | विष्णू मिल विहीर |
| ९ | ०६ | बसवेश्वर नगर विहीर (श्री. अक्कलकोटे) |
| १० | ०८ | मार्कंडेय उद्यान कृत्रिम कुंड |
| ११ | ०८ | सुभाष उद्यान कृत्रिम कुंड |

**विभागीय कार्यालय क्र.१**

| अ. क्र. | श्री. गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | प्रसन्न हॉल, वसंत विहार |
| २ | इंदिरा कन्या प्रशाला, शिंदे चौक |
| ३ | सो.म.पा. शाळा नं.२१, न्यू बुधवार पेठ |
| ४ | विठ्ठल मंदिर, जुनी पोलीस लाईन |
| ५ | शरदचंद्र पवार प्रशाला, उमा नगरी |

**विभागीय कार्यालय क्र.२**

| अ. क्र. | श्री. गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | रोशन प्रशाला, किसान नगर |
| २ | संभाजीराव शिंदे प्रशाला |
| ३ | राज मेमोरियल इंग्रजी शाळा |
| ४ | जिल्हा परिषद शाळा, शेळगी |
| ५ | जोशी गल्ली रविवार पेठ |

**विभागीय कार्यालय क्र.३**

| अ. क्र. | श्री. गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | एम.आय.डी.सी. प्रिसिजन कारखाना जवळ, भुखंड क्र.६ व ७ खुली जागा |
| २ | जय भवानी प्रशाला, भवानी पेठ |
| ३ | गांधी नगर नं.२ येथील समाज मंदिर |
| ४ | पावन गणपती, कर्णिक नगर |
| ५ | विनोभा भावे झोपडपट्टी येथील ललीतांचा मंदिर |

**विभागीय कार्यालय क्र.४**

| अ. क्र. | श्री. गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | मार्कंडेय नगर, जिल्हा परिषद शाळा |
| २ | माधव नगर, पद्ममारुती मंदिर |
| ३ | बुर्ला मंदिर कार्यालय |
| ४ | गणेश मंदिर, बोमड्याल शाळेजवळ |
| ५ | बोल्ली मंगल कार्याल, अशोक चौक |
| ६ | जि.प.शाळा, निलम नगर |
| ७ | साने गुरुजी प्रशाला, बत्तुल प्रशाला लगत |
| ८ | मा. सिध्दारुढ मठ गवळी वस्ती नीलमनगर |
| ९ | केंगनाळकर शाळा |

**विभागीय कार्यालय क्र.५**

| अ. क्र. | श्री. गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | राजस्व नगर सांस्कृतीक भवन राजस्व नगर |
| २ | किल्लेदार मंगल कार्यालय आसरा |
| ३ | बालाजी मंगल कार्यालय जुळे सोलापूर |
| ४ | गोविंदश्री मंगल कार्यालय जुळे सोलापूर |
| ५ | शिवदारे कॉलेज, जुळे सोलापूर |
| ६ | मातोश्री रखुमाबाई हत्तुरे मंगल कार्यालय, हत्तुरे वस्ती |
| ७ | हत्तुरे मंगल कार्यालय, हत्तुरे वस्ती |
| ८ | मारुती मंगल कार्यालय ओम गर्जना चौक |
| ९ | कुसुमराज मंगल कार्यालय आदित्य नगर |
| १० | समृध्दी गार्डन राजस्व नगर |
| ११ | पोस्ट बेसीक शाळा, विजापूर रोड |
| १२ | प्रगती लॉन्स, अंत्रोळीकर नगर |
| १३ | अथर्व मंगल कार्यालय नई जिंदगी रोड नगर |

**विभागीय कार्यालय क्र.६**

| अ. क्र. | श्री. गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | सुंदराबाई डागा प्रशाला, दमाणी नगर |
| २ | थोबडे वस्ती समाज मंदिर, थोबडे वस्ती |
| ३ | जांबमुनी समाज मंदिर, सोनी नगर |
| ४ | उत्कर्ष नगर मनपा शाळा |
| ५ | मनपा शाळा क्र.२८, सुंदरम नगर |

**विभागीय कार्यालय क्र.७**

| अ. क्र. | श्री. गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | नियोजन भवन सात रस्ता |
| २ | प्र.क्र.१६ मोदी शाळा, बिग बाजार समोर |
| ३ | मनपा रामवाडी शाळा |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला, एम्प्लायमेंट चौक (खाजगी) |
| ५ | मनपा उर्दू शाळा क्र.३ |
| ६ | मनपा मराठी शाळा क्र.३ दक्षिण कसबा |
| ७ | शिवानुभव मंगल कार्यालय (खाजगी) |
| ८ | भोईराज समाज मंदिर शुक्रवार पेठ |

**विभागीय कार्यालय क्र.८**

| अ. क्र. | श्री. गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | जोडबसवण्णा चौक, शाळा नं. ६ |
| २ | पोलिस मुख्यालय लगत MPSC अभ्यास केंद्र |
| ३ | वॉर्ड ऑफिस म्हेत्रे |
| ४ | सुभाष उद्यान विहीरीलगत |
| ५ | बालाजी मंदिर मुर्गीनाला भाजी मार्केट |
| ६ | इन्डोअर स्टेडिअम अश्विनी हॉस्पिटल जवळ |
| ७ | वसंतराव नाईक शाळा |
| ८ | लोधी गल्ली शाळा नं.१४ जवळ समाज मंदिर |
| ९ | सतनाम चौक ललीत कला केंद्र |
| १० | म.बेकरी शास्त्री नगर समाज मंदिर महादेव मंदिर |
| ११ | वॉर्ड ऑफिस नल्लामंदू |
| १२ | गणेश मंदिर हॉल, विकास नगर पोस्टल कॉलनी परिसरात |
| १३ | कॅम्प शाळा |
| १४ | शास्त्री नगर तायम्मा मंदिर |
| १५ | जांबमुनी समाज मंदिर अलकुंटे चौक |
| १६ | ५ नं. शाळा, भारतरत्न इंदिरा नगर |
| १७ | बापूजी नगर हनुमान मंदिर |
| १८ | ७० फुट रोड मस्जिद जवळ, समाज मंदिर (गेंट्याल टॉकीज रोड) |
| १९ | अशोक चौक, पोलिस मुख्यालय लगत |

सही/- संदिप कारंजे
अति आयुक्त -(२), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

## महत्वाचे...

### नदीम शेख महाराष्ट्राच्या संभाव्य रणजी संघात

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

येथील जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा वेगवान व मध्यमगती गोलंदाज नदीम शेख याची महाराष्ट्र रणजी संभाव्य संघात निवड झाली आहे. हा संघ येत्या ४ सप्टेंबरपासून कर्नाटक क्रिकेट असोसिएशन यांच्यावतीने बेंगलोर येथील निमंत्रित ४ दिवसीय क्रिकेट सामने स्पर्धेत सहभागी होणार असून या संघाचे नेतृत्व रणजी खेळाडू मंदार भंडारी करणार आहे. उजव्या



हाताचा गोलंदाज असलेला नदीम हा गेले ३ वर्षे जिल्हा संघाकडून उत्तम कामगिरी करत असल्याने त्याची रणजी संभाव्य संघ आणि सराव शिबिर साठी निवड झाली आहे. नदीम याच्या निवडी बद्दल सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेचे चेअरमन आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, सचिव खासदार धैर्यशील भैय्या मोहिते पाटील, अध्यक्ष माजी आमदार दिलीप माने, व्हाइस चेअरमन श्रीकांत मोरे आणि संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



### सुशीलकुमार शिंदे बीपीएड कॉलेजच्या नेहा पवारला राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत रौप्य

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

येथील श्री सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनच्या नेहा पवार हिने महाराष्ट्र महिला बेसबॉल संघात उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या संघाला उपविजेतेपद मिळवून दिले. संत गाडगे बाबा विद्यापीठ अमरावती येथे झालेल्या ३८व्या वरिष्ठ महिला बेसबॉल स्पर्धेत तिने भाग घेताना ही कामगिरी केली. तिच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुभाष चव्हाण, उपाध्यक्ष विवेक चव्हाण, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.कलाश्री देशपांडे, प्रा.नागनाथ पुदे, प्रा.विजय तरंगे, सुनील राठोड, अनिल राठोड यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### उद्या मुलींची जिल्हा क्रिकेट निवड चाचणी

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

जिल्ह्याचे १५,१७ व १९ वर्षांखालील मुलींचे संघ निवडण्यासाठी येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर ५ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते १ व दुपारी २ ते ५-३० दरम्यान निवड चाचणी होईल. जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडे रजिस्टर झालेल्या खेळाडूंनी सोबत रजिस्टर कार्ड व शुल्क भरल्याची पावती आणणे बंधनकारक आहे. १५ वर्षांखालील गटासाठी १-९-११ ते ३१-८-२०१४ दरम्यान जन्मलेले, १७ वर्षांखालील गटासाठी १-९-२००८ व १९ वर्षांखालील गटासाठी १-९-२००७ च्या पुढील मुली पात्र आहेत. ही निवड चाचणी चेअरमन किरण मणिहार, स्नेहल जाधव, सारिका कुरनूरकर, मानसी जाधव व राजेंद्र गोटे हे करणार आहेत, असे जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु यांनी कळविले आहे.

### आनंदाचा क्षण दुःखद क्षणात बदलला : कोहली

**बंगळुरू :** गत ४ जून २०२५ हा आमच्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघासाठी सर्वात आनंदाचा दिवस असायला हवा होता, मात्र आयपीएल विजयाच्या उत्सवादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीमुळे आमच्या फ्रॅन्चायझीच्या इतिहासातील सर्वात आनंदाचा क्षण... दुःखद क्षणात बदलला, असे भारत आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा स्टार फलंदाज विराट कोहली म्हणाला. आरसीबीच्या पहिल्या आयपीएल जेतेपदाचा आनंद साजरा करण्यासाठी एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर अंदाजे २.५ लाख चाहत्यांनी एकच गर्दी केली होती तेव्हा ही दुःखद घटना घडली. 'आम्ही गमावलेल्यांच्या कुटुंबीयांबद्दल व जखमी झालेल्या आमच्या चाहत्यांसाठी मी विचार करत आहे व प्रार्थना करत आहे. तुमचे नुकसान आता आमच्या कथेचा एक भाग आहे.

# श्रेयस, जयस्वाल, ठाकूरला पश्चिमकडून मध्यविभागाविरुद्ध संधी मिळण्याची आशा

**दुलीप करंडक क्रिकेट**


**उत्तर विभागाची दक्षिणेशी गाठ**

◆ **बंगळुरू, ३ सप्टेंबर**

दुलीप करंडक क्रिकेट स्पर्धेत गुरुवारपासून येथे ध्रुव जुरेलच्या नेतृत्वाखालील मध्य विभाग आणि शार्दुल ठाकूरच्या नेतृत्वाखालील पश्चिम विभाग यांच्यात पहिला उपांत्य सामना, तर अंकित कुमारच्या नेतृत्वाखालील उत्तर विभाग आणि मोहम्मद अझरुद्दीनच्या नेतृत्वाखालील दक्षिण विभाग यांच्यादरम्यान दुसरा उपांत्य सामना खेळला जाणार आहे. या चार दिवसीय सामन्यात श्रेयस अय्यर, यशस्वी जयस्वाल आणि शार्दुल ठाकूर या गतिमान त्रिकुटांना पश्चिमेकडून खेळताना आपल्या कौशल्याची छाप सोडण्याची संधी मिळू शकते.



श्रेयस अय्यर



यशस्वी जयस्वाल

भारताच्या आशिया चषक संघात स्थान मिळवू न शकलेला श्रेयस अय्यर येथे हंगामाची सुरुवात चमकदारपणे करण्यास आणि वेस्ट इंडीजविरुद्धच्या घरच्या मालिकेपूर्वी आणि त्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यासारख्या महत्त्वपूर्ण मालिकेत कामगिरी करण्यापूर्वी स्वतःला स्पर्धेत टिकवून ठेवण्यास उत्सुक असेल. नव्या दमाने खेळताना अय्यर अधिकाधिक धावा करू शकला तर पश्चिम विभागाला फायदा होऊ शकतो.

जयस्वालने भविष्यासाठी कसोटी संघात आपले स्थान आधीच निश्चित केले आहे, तर युवा डावखुरा फलंदाज वेस्ट इंडीज व विश्वविजेत्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या घरच्या मालिकेपूर्वी लाल चेंडूचा खेळ कायम ठेवू इच्छित असेल. त्याचा शेवटचा स्पर्धात्मक सामना इंग्लंडविरुद्ध ओव्हल येथे पाचवा कसोटी सामना होता. आंतरराष्ट्रीय सामन्यासाठी जयस्वालला ऑक्टोबरमध्ये वेस्ट इंडीजविरुद्धच्या मालिकेपर्यंत वाट पहावी लागू शकते.

दुसरीकडे, पश्चिम विभागाचे नेतृत्व करणार असलेला शार्दुल ठाकूर, अँडरसन-तेंडुलकर चषकामध्ये इंग्लंडविरुद्धच्या सौम्य कामगिरीनंतर निवडकर्त्यांच्या रडारवर राहण्यासाठी आपला धीर वाढवण्याचा प्रयत्न करेल.

ऋतुराज गायकवाड व तनुश कोटियन सारखे पश्चिम विभागीय संघातील इतर प्रमुख सदस्य राष्ट्रीय स्तरावर परत येण्यासाठी जोरदार प्रयत्न करतील अशी आशा करतील.

कागदावर पश्चिम विभाग खूप जास्त मजबूत आहे, परंतु मध्य विभाग हा केवळ धक्कादायक नाही. जर ध्रुव जुरेल हा भारताचा यष्टिरक्षक फलंदाज ईशान्य विभागाविरुद्धच्या उपांत्यपूर्व सामन्यात दुखापतीतून सावरला असेल तर तो पुन्हा संघाचे नेतृत्व करू शकतो.

जुरेलशिवायही, त्यांच्या फलंदाजीने गेल्या आठवड्यात हंगामी कर्णधार रजत पाटीदार, दानिश मालेवार आणि शुभम शर्मांनी शतके ठोकली. त्यांच्याकडे डावखुरा फिरकी गोलंदाज हर्ष दुबे आणि वेगवान गोलंदाज खलील अहमद व दीपक चहरसारखे सक्षम गोलंदाज आहेत.

तथापि, त्यांना पश्चिम विभागाच्या मजबूत फलंदाजी संघाविरुद्ध काम करावे लागेल. त्यांना दुखापतग्रस्त सर्फराज खानची उणीव भासेल.

बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्सची खेळपट्टी उपांत्यपूर्व फेरीदरम्यान संथ आणि गुळगुळीत दिसत होती, परंतु त्यांना डावखुरा मनगट फिरकी गोलंदाज कुलदीप यादवची उणीव भासेल. कुलदीप भारताच्या आशिया चषक संघात सहभागी होण्यासाठी दुबईला जात आहे.

**दक्षिण विभागाचा संघ कमकुवत**

आशिया चषकासाठी तयारी सुरू करण्यासाठी दुबईला रवाना झालेला तिलक वर्मा, वेगवान गोलंदाज वैशाख विजयकुमार आणि डावखुरा फिरकी गोलंदाज आर. साई किशोर यांच्या अनुपस्थितीमुळे दक्षिण विभाग कमकुवत होईल. त्यामुळे त्यांना केरळ क्रिकेट लीगमध्ये नुकतेच १३ चेंडूत ११ षट्कार ठोकणारा एन. जगदीशन, देवदत्त पडिक्कल व सलमान निजारसारख्या काही तंदुरुस्त खेळाडूंची आवश्यकता असेल. त्यांनी उत्तर विभाग संघाचे आव्हान पेलले.

उत्तर विभागाला संघाला आशिया चषक संघाचा भाग असल्यामुळे वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग व हर्षित राणाच्या अनुपस्थितीचा सामना करावा लागेल. भारताचा वेगवान गोलंदाज अंशुल कंबोज या सामन्यासाठी खेळण्याची शक्यता आहे. त्यामुळे, त्यांना आयुष बदोनी, अंकित कुमार व यश धुलसारख्या खेळाडूंची आवश्यकता असेल, कारण त्यांनी उपांत्यपूर्व सामन्यात शतके झळकावली होती. ◂(वृत्तसंस्था)



# आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेस सांगोला महाविद्यालयात सुरवात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.३ सप्टेंबर -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेस सुरवात झाली.

सांगोला महाविद्यालयाच्या क्रीडाभवन येथे याचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, सचिव ॲड. उदयबापू घोंगडे यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविकात प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांनी विद्यार्थ्यांनी क्रीडाक्षेत्रातही शैक्षणिक प्रगतीइतकीच ऊर्जा व लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. क्रीडा शिक्षक प्रा.जगदीश चेडे यांनी आभारमानले. या स्पर्धेत विद्यापीठ क्षेत्रातील विविध महाविद्यालयांचे पुरुष व महिला संघ सहभागी झाले आहेत. स्पर्धेत विजयी ठरणाऱ्या संघांना चषक व पारितोषिके प्रदान केली जातील. यातील यशस्वी खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल.

# पद्मनगर बास्केटबॉल स्पोर्ट्स अकॅडमीत क्रीडा दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

पदमनगर स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे मेजर ध्यानचंद याच्या जन्मदिन राष्ट्रीय दिन म्हणून साजरा करण्यात आला. राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजा करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय हॅन्डबॉल प्रशिक्षक राहुल हजारे , प्रशिक्षक सचिन गाडेकर, विद्यापीठ खेळाडू अंजली वल्लाकाठी, शिंदुजा शिंघम, क्रिकेट प्रशिक्षक श्याम



गुप्ते यांचा अकॅडमीकडून स्वाती कोठे यांच्याकडून मान्यवरांचे सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बाबुराव क्षीरसागर, सुशील नाटकर, प्रबुद्ध चिंचोळीकर, आनंद वल्लाकाठी, श्रीशैल पुजारी, श्रीधर ताटीपामुल, विशाल बनसोडे, अस्विनी येदूर, श्रीधर गायकवाड. प्रशिक्षक ऐश्वर्या होनकर्वे आदी उपस्थित होते.

# जिल्हा मैदानी निवड चाचणी स्पर्धा शनिवारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने शनिवार ६ सप्टेंबर रोजी शासकीय मैदान नेहरूनगर येथे २३ वर्षांखालील गटाची जिल्हा स्तरीय निवड चाचणी स्पर्धा होईल. ही स्पर्धा सकाळी नऊपासून सुरू होईल. स्पर्धा प्रवेशिका स्पर्धेच्या ठिकाणी स्विकारले जातील. १८-आक्टोंबर २००२ ते १७ आक्टोंबर २००५च्या दरम्यान जन्मलेले मुले व मुली यासाठी पात्र आहेत. राज्य प्रवेशासाठी ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाचे युआयडी असणे आवश्यक आहे. आधिक माहितीसाठी राजू प्याटी (मो. ९३२६०५५९४०) यांच्याशी संपर्क साधावा.

# येमूल, हिरेमठ, धुमाळ, सोनकुसरे अजिंक्य

**शालेय शहर लॉन टेनिस स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

शालेय शहर लॉन टेनिस स्पर्धेत आर्यन येमूल (संगमेश्वर पब्लिक स्कूल), भवानी हिरेमठ (बी.एफ. दमाणी हायस्कूल), सार्थक धुमाळ (पद्मश्री सुमतीबाई इंग्लिश मिडीयम हायस्कूल) व आकृती सोनकुसरे (संगमेश्वर कॉलेज) यांनी अनुक्रमे १७ व १९ वर्षांखालील मुले व मुलींच्या गटात अजिंक्यपद पटकाविले.

जिल्हा क्रीडा संकुलातील टेनिस कोर्टवर झालेल्या या स्पर्धेतून पुणे विभागीय स्पर्धेसाठी दोन्ही गटातून प्रत्येकी ५ मुले व मुलींची निवड करण्यात आली.

**अंतिम निकाल याप्रमाणे**

**१७ वर्षांखालील मुले :** आर्यन येमूल (संगमेश्वर पब्लिक स्कूल) वि.वि रुद्रप्रताप चव्हाण (एल.एफ. सी. स्कूल) ४/१. मुली : भवानी हिरेमठ (बी.एफ. दमाणी हायस्कूल) वि/वि विपश्याना सोनावणे (शांती इंग्लिश मिडीयम स्कूल) ४/२. **१९ वर्षांखालील मुली :** सार्थक धुमाळ (पद्मश्री सुमतीबाई इंग्लिश मिडीयम हायस्कूल) वि.वि. विजयकुमार वीरगौडा (नेताजी एस.बोस कॉलेज) ४/१. मुली : आकृती सोनकुसरे (संगमेश्वर कॉलेज) वि.वि. नैनिका रेड्डी (ए.डी. जोशी कॉलेज) ३/३ टायब्रेक ७/५.

**पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवडलेले गुणानुक्रमे पाच खेळाडू**

**१७ वर्षांखालील : मुले :** आर्यन येमूल, रुद्रप्रताप चव्हाण, रिषभ गोचडे, ईश्वराज होमकर, धैर्य गोरे. मुली : भवानी हिरेमठ, विपश्याना सोनावणे, पलक कोल्हापुरे, दर्शनी चाकोत, जान्हवी काजळे. **१९ वर्षांखालील :** मुले : सार्थक धुमाळ, विजयकुमार वीरगौडा, जोसेफ भंडारी, अवधूत कांबळे. मुली : आकृती सोनकुसरे, नैनिका रेड्डी, रिया गांधी, आहना गांधी, भक्ती जाधव.

# कर्मवीर विद्यालयाची तालुका तायक्वोंदो स्पर्धेत कामगिरी



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३ सप्टेंबर**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे झालेल्या तालुका तायकांदो स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. सुवर्ण पदक विजेत्यांची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे मुख्याध्यापक अशोक बागल, पर्यवेक्षक रमेश किरगत, वरिष्ठ लेखनिक तुकाराम बोरखडे, मार्गदर्शक शिक्षक भंडारे, सत्यवान वाघमारे, शेगर, प्रविण मेटकरी, पावले, इंगळे, वाजीद शेख यांनी कौतुक केले.

**कामगिरी : सुवर्ण :** १४ वर्षांखालील : आसिन शेख, माहीनुर पठाण, सोहम बोडरे. १७ वर्षांखालील गटात तमसिन शेख, काजल बाबर, पायल माने, समृद्धी साळवे, राधिका चव्हाण व फराज शेख. १९ वर्षांखालील : अक्षरा सुळे. **रौप्य :** १९ वर्षांखालील गट विराज बोडरे.



# सांगोला महाविद्यालयात क्रीडा दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२ सप्टेंबर -**

हॉकीचे जादूगार म्हणून ओळखले जाणारे मेजर ध्यानचंद यांच्या १२० व्या जयंती निमित्त सांगोला महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी फिजिकल डायरेक्टर प्रा.जगदीश चेडे यांनी मेजर ध्यानचंद यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान आणि त्यांच्या गौरवशाली कारकिर्दीची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांसमोर मांडली. कार्यक्रमाचे आयोजन प्रा.अमोल पवार, बाबासो इंगोले यांनी केले.

# खुल्या गटात मानस गायकवाड व सानवी गोरे अजिंक्य

**''स्व. शंकर शिवप्पा मस्कले स्मृती चषक'' जिल्हा बुद्धिबळ स्पर्धा**

**विविध वयोगटात अमोघ, विवान व नियान विजेते**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात अग्रमानांकीत आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त मानस गायकवाड याने स्पर्धेत सहा पैकी सहा गुण प्राप्त करत तर महिला गटात बार्शीच्या सानवी गोरे हिने पाच पैकी साडेचार गुण प्राप्त करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

खुल्या गटात मानांकित व अनुभवी खेळाडू विशाल पटवर्धन, बार्शीचा मानांकित शंकर साळुंके, पार्थ वलेकर व वेदांत मुसळे यांनी तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वराली हातवळणे, सृष्टी गायकवाड व पृथा ठोंबरे यांनी अनुक्रमे द्वितीय, तृतीय व चौथा क्रमांक पटकावीत जिल्हा संघातील आपले स्थान निश्चित केले. मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्यांची निवड झालेली आहे. १६ वर्षाखालील गटात अमोघ रेवणकर, १२ वर्षाखालील गटात विवान दासरी व ८ वर्षाखालील गटात नियान कंदीकटला यांनी उत्कृष्ट खेळ करत जेतेपद प्राप्त केले.

ग्रँडमास्टर चेस अकॅडमी व सोलापूर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने ''स्व. शंकर शिवप्पा मस्कले स्मृती चषक'' यांच्या



स्मरणार्थ आयोजित केलेल्या ईरण्णा उपलप मंगल कार्यालय येथे झालेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ स्पर्धेच्या प्रायोजीका कस्तुरबाई शंकर मस्कले यांच्या अध्यक्षतेखाली तसेच नामवंत उद्योजक द्वारकाप्रसाद उपलप, संस्थेचे सचिव सुमुख गायकवाड, ग्रँडमास्टर चेस अकॅडमीचे सचिव गणेश मस्कले, विद्या मस्कले, सरस्वती झंपले, शकुंतला माने, दिगंबर मस्के, राष्ट्रीय पंच संतोष पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संतोष पाटील यांनी मानले. विजेत्या खेळाडूंना रोख बक्षिसे, आकर्षक चषक व मेडल्स मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत मुख्य पंच म्हणून वरिष्ठ राष्टीय पंच उदय वगरे, सहाय्यक राष्ट्रीय पंच रोहिणी तुम्मा, प्रज्वल कोरे, पृथ्वीराज देशमुख, भरत वडीशेरला, गौरव माने, अभिषेक राठोड आदी काम पाहिले. विजेत्या खेळाडूंचे सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष खा. धैर्यशील मोहिते-पाटील, सोलापूरचे अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर यांनी राज्य स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

**अंतिम निकाल खालीलप्रमाणे**

**(अनुक्रमे १ ते १० गुण व बोकोल्स गुणांसह):**

✻ **खुला गट:** मानस गायकवाड-६, विशाल पटवर्धन-५, शंकर साळुंके - ४.५(२०.५), पार्थ वलेकर- ४.५(१५.५), वेदांत मुसळे-४(२२.५), स्वप्निल हदगल-४(२२), देवदत्त पटवर्धन-४(१९), चंद्रशेखर बसरगीकर-४(१७), वेद आगरकर-४(१६.५), नरसिंमा सिंग्रल-४(१२)

✻ **महिला गट:** सानवी गोरे-४.५, स्वराली हातवळणे-४, सृष्टी गायकवाड-३.५(१४.५), पृथा ठोंबरे-३.५(१३), सृष्टी मुसळे-३.५(१३), श्रावणी देवनपल्ली-३(१५), रिद्धी उपासे-३(१४), श्रीनिधी शाबादे-३(११), नवीना वडीशेरला-३(१०.५), संचिता सोनवणे-३(८.५)

✻ **१६ वर्षे:** अमोघ रेवणवार-६(३४.५), सिद्धांत चव्हाण-६(३१), रणवीर पवार-६(२८.५), हर्ष हलमल्ली-६(२८), आरुष कंदले-५(३३), समर्थ मेकाले-५(३०), आदिनाथ हावळे-५(२९.५), नागेश राजमाने-५(२९), अनन्या उलभगत-५(२७.५), सानिध्य जमादार-५(२६.५)

✻ **१२ वर्षे:** विवान दासरी-६.५(३२), विहान कोंगारी-६.५(२९), श्रीरंग पैकेकरी-६(२८.५), आयुष गायकवाड-६(२६.५), श्रेयश इंगळे-५.५(२८.५), हिमांशू व्हनगावडे-५.५(२७), श्रेयश कंदीकटला-५.५(२६.५), नैतिक होटकर-५(३२), आदित्य कसबे-५(२९.५), प्रतीक हलमल्ली-५(२९)

✻ **८ वर्षे:** नियान कंदीकटला -४, अद्विक ठोंबरे-३(९), नमन रंगरेज-३(८.५), आरव चव्हाण -३(८), ऋषांक कंदी-३(७), रिषभ पामनानी-३(६), कृष्णवर्धन कुलकर्णी-३(५), ज्ञानदा सांगुळे- २.५(७.५), स्वरा हंचाटे-२.५(५.५), रुद्रांश गरड- २(९)

✻ **उत्तेजनार्थ:** आदिती इनानी, पृथ्वीराज मुकाने, सुरेश बनसोडे, भक्त खातेनवरु, तनिष्क तेलगू, स्वराली जाधव, आरव पवार, विहान राठोड, मनन मालानी, श्रेया मस्कले

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### अवैध दारू धंद्यावर कारवाई; पंढरपूर तालुक्यात २५ हजारांची दारू जप्त

**पंढरपूर, दि.३ सप्टेंबर-**

येथील तालुका पोलिसांनी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने अवैध धंद्याविरुद्ध धडक मोहीम राबवून तालुक्यातील तारापूर, देगाव या ठिकाणी देशी विदेशी दारूचा किंमत रुपये २५ हजार ८०० रुपये किमतीचा अवैध दारूचा साठा जप्त केल्याची माहिती तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय.मुजावर यांनी दिली. या बरोबरच यामधील संशयीतांना विरुद्ध मुंबई दारूबंदी कायदा कलम ६५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई केल्याचे देखील त्यांनी सांगितले. दरम्यान ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर आणि येथील सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय.मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे पीएसआय भारत भोसले, पोलीस पीएसआय दत्तात्रय तोंडले, विजू गायकवाड मंगेश रोकडे, हेड कॉन्स्टेबल सय्यद, पोलीस कॉन्स्टेबल संजय गुटाळ यांच्या पथकाने केली.

### अल्पवयीन मुलीस पळवून नेल्याप्रकरणी आरोपीस दोन दिवसांची पोलीस कोठडी

**मंगळवेढा, दि.३ सप्टेंबर-**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून १७ वर्षीय अल्पवयीन मुलीस फुस लावून पळवून नेल्याप्रकरणातील आरोपी सोमनाथ कुंडलीक वाघमरे (रा.वेळापूर) याला पोलीसांनी २४ तासाच्या आत गजाआड केले. दरम्यान पंढरपूर येथील सत्र न्यायालयाने या आरोपीस दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. या घटनेची हकीकत अशी,यातील पिडीत १७ वर्षीय मुलगी ही अन्य तालुक्यातील असून दि.२८ जुलै रोजी दुपारी १२ वाजता ती भावासह मंगळवेढ्यातील एका गावात आली होती. यावेळी आरोपीने तिला कशाचे तरी अमिष दाखवून पळवून नेल्याचा प्रकार घडला होता. या दरम्यान नातेवाईकांनी तिचा सर्वत्र शोध घेतला मात्र ती मिळून आली नसल्याने अज्ञात व्यक्ती विरुध्द पोलीसात गुन्हा दाखल केला होता. याचा तपास डी.वाय. एस.पी.डॉ.बसवराज शिवपुजे, पो.नि. दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अंमलदार पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर, अमोल देवकते, पोलीस अंमलदार महेश कोरे यांच्यासह सोलापूर सायबर सेलचे पोलीस अंमलदार तांबोळी यांनी वेगाने तपास करुन २४ तासाच्या आत आरोपीला अकलूज येथे राहत असलेल्या ठिकाणी छापा टाकून पकडले. आरोपी विरुध्द कलमवाढ करण्यात आली आहे. आरोपीस न्यायालयात उभे केल्यावर तपासाधिकारी बनकर यांनी न्यायालयापुढे घटनास्थळाचा पंचनामा करणे,गाडी जप्त करणे, गुन्ह्यात इतर कोण आहे का? याचा शोध घेणे आदी मुद्द्यासाठी पोलीस कोठडी मागितल्यावर न्यायालयाने दि.४ सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.





### समृध्द पंचायत राज अभियानात ग्राम पंचायतींनी सहभागी व्हावे :आ. कल्याणशेट्टी

**अक्कलकोट दि.३ सप्टेंबर**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज या शासनाच्या महत्वाकांक्षी अभियान अंतर्गत देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्कार योजना मध्ये तालुक्यातील जास्तीत जास्त ग्रामपंचायती भाग घेऊन राज्यात चमकावे या साठी मी स्वतः सहकार्य करण्यास अहोरात्र तयार असल्याची ग्वाही आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली. अक्कलकोट येथील नवीन पंचायत समितीच्या हॉल मध्ये कार्यशाळा झाली. यावेळी आमदार कल्याणशेट्टी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी भुजबळ, गटविकास अधिकारी शंकर कवितके, सहायक गटविकास अधिकारी दोड्डमनी, विस्तार अधिकारी पाटील, कोळी, पठाण उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी ग्रामपंचायत सदस्य, रोजगार सेवक, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी आणि पंचायत समितीचे सर्व विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. येथे हॉल लहान असल्याने बसण्यासाठी जागा न मिळाल्याने अनेकांची तारांबळ उडाली. पुन्हा मोठ्या हॉल मध्ये कार्यशाळा घेण्याची मागणी यावेळी अनेक ग्रामपंचायत सदस्यांनी केली. जेवणाचीही तारांबळ उडाली. ११८ ग्रामपंचायत मधून सुमारे हजार ते अकराशे जण उपस्थित असताना फक्त चारशे माणसाना जेवणाचे कूपन वाटप केल्याने ग्रामीण भागातील अनेक ग्रामपंचात सदस्यांना जेवण मिळाले नसल्याने उपाशीपोटी माघारी जावे लागले.

## निधन वृत्त...

### शारदाबाई जानकर



**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

स्वातंत्र्यसैनिक नगर मधील शारदाबाई दिगंबर जानकर (वय-७० वर्षे) यांचे दीर्घ आजाराने आज दि. ४ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वा. निधन झाले. अंत्यविधी संध्याकाळी ७ वा रूपाभवानी स्मशानभूमीत झाला. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, नात, नाती असा परिवार आहे. लक्ष्मी बँकेचे माजी दिवंगत मॅनेजर दिगंबर जानकर यांच्या पत्नी तर स्वातंत्र्य सैनिक गृहनिर्माण सोसायटीचे सभासद दीपक जानकर यांच्या त्या मातोश्री होत.

# शेती महामंडळाने जमिनीसाठी आडकाठी आणू नये

## आमदार मोहिते-पाटील : अडवणूक झाल्यास वरिष्ठांकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.३ सप्टेंबर-**

शासनाने व शेती महामंडळाने नागरिकांसाठी आवश्यक असलेले मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी जमिनी देण्यास आडकाठी आणू नये असे आमदार रणजितसिंह मोहिते - पाटील यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. महामंडळातील वाटप आराखडा सोडून उर्वरित जमिनी घरकुल, पाणीपुरवठा योजना, घनकचरा व्यवस्थापन आणि गाव विस्तार यासाठी देण्याची तरतूद आहे. या संदर्भात अधिकाऱ्यांनी अडवणूक केल्यास त्यांची वरिष्ठांकडे तक्रार करा अथवा माझ्याकडे या असेही आमदार रणजितसिंह यांनी बजावले.

माळशिरस तालुक्यातील ज्या गावात सार्वजनिक सुविधांचे प्रकल्प रखडले आहेत त्या गावांची बैठक आज (मंगळवार)अकलूज येथे आमदार रणजितसिंह मोहिते - पाटील व खासदार धैर्यशील मोहिते -पाटील यांनी घेतली त्या बैठकीत गावा-गावातील नागरिकांनी आपल्या समस्या पोट तिडकीने मांडल्या. पुन्हा - पुन्हा या समस्यांसाठी बैठक घेण्याची वेळ येता कामा नये असे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी ठळकपणे बजावले. माळशिरस तालुक्यातील शेती महामंडळाकडील असणाऱ्या शेतीमधून जाणारे रस्ते जमिनी भाड्याने कसण्यासाठी घेतलेल्या कंपन्यानी अडवले आहेत. तर काही जुने वहीवाटीचे रस्ते महामंडळाने अडवल्यामुळे गावकऱ्यांची अडचण झाली आहे. महामंडळाच्या शेतीतून जाणाऱ्या ओढ्यावर महामंडळ दुरुस्ती करू देत नाही. अशा अनेक तक्रारी यावेळी नागरिकांनी केल्या. वन विभागाचे अधिकारीही नियमावर बोट ठेवून नागरिकांची अडवणूक करतात या मुद्द्यावरही आजच्या बैठकीत मोठा खल झाला. प्रांताधिकारी विजया पांगारकर यांनी यासंदर्भात मी वैयक्तिक बैठका घेऊन प्रश्नांची सोडवणूक करेल अशी ग्वाही बैठकीत दिली. शेतकऱ्यांचे रस्ते अडवणार नसल्याचे महामंडळाच्या स्थावर व्यवस्थापकांनी सांगितले. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते - पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, प्रांत अधिकारी विजया पांगारकर, तहसीलदार सुरेश शेजूळ, विश्वतेजसिंह मोहिते पाटील, सयाजीराजे मोहिते -पाटील, शेती महामंडळाच्या श्रीपुर, सदाशिवनगर व शिवपुरी येथील मळ्यांचे स्थावर व्यवस्थापक, वन अधिकारी राजू आटोळे, बीडीओ पवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



माळशिरस तालुक्यातील शेती महामंडळाच्या शेकडो एकर जमिनी महामंडळाने कराराने भाडे तत्त्वावर मोठ्या भांडवलदारांना कसण्यासाठी दिलेल्या आहेत. हे भांडवलदार लगतच्या शेतकऱ्यांना अरेरावी करतात अशा तक्रारी आल्यानंतर खासदार धैर्यशील मोहिते-पाटील चांगले संतापले. बाहेरच्यांनी आपल्या तालुक्यात जगायला येऊन तालुक्यातील जनतेला वेठीस धरण्याचा प्रयत्न करू नये, अशी तंबी खासदार धैर्यशील यांनी दिली. हे भांडवलदार येथील कालव्यांचे व बोअर घेऊन पाणी वापरतात परंतु शासनाकडे पाण्याची मागणी करत नाहीत. त्यामुळे पाण्याची मागणी कमी दिसत असल्याच्या तक्रारीचा सूर यावेळी उमटला. या भांडवलदारांच्या बोअरची चौकशी करण्याचे आदेश आमदार रणजितसिंह यांनी यावेळी दिले.

तरंगफळ (ता. माळशिरस) येथील जंगलामध्ये मोर, मुंगुस व कोल्ह्यांची अवैध शिकार होत आहे. तेथे सी. सी. टी. व्ही. कॅमेरे बसवावेत. या जंगलात घोणस जातीच्या अती विषारी सापांचे प्रमाण वाढल्यामुळे दोन नागरिकांचा साप चावल्याने मृत्यू झाला आहे.

शेतकऱ्याच्या शेतातून जाणाऱ्या ओढ्याची मालकी जर महसूल विभागाची असेल तर शेती महामंडळाच्या शेतातून जाणाऱ्या ओढ्याची मालकी शेती महामंडळाची कशी ? ओढा हा नैसर्गिक स्रोत आहे. त्याची मालकी महसूल विभागाकडेच पाहिजे. शेती महामंडळाने ओढ्यावरील कामे अडवू नयेत. सर्व शासकीय अधिकाऱ्यांनी वैयक्तिक हित लक्षात न घेता जनहित लक्षात घेऊन काम करावे अशी सूचना खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी अधिकाऱ्यांना केली. सार्वजनिक हितासाठी नागरिक शासनाकडे याचना करत असतील तर अधिकारी वर्गानेही त्यांना मदत करण्याची भूमिका ठेवावी असे खासदार धैर्यशील यांनी अधिकाऱ्यांना शेलक्या शब्दात सांगितले.



## अक्कलकोट लायन्स क्लबचे शिक्षक पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ सप्टेंबर-**

लायन्स क्लबच्यावतीने यंदा शहर व तालुक्यातील विविध शाळांमधील गुणवंत शिक्षकांना लायन्स आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले असून मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती क्लबचे अध्यक्ष अभय खोबरे व लायन्स क्लब शाळेचे चेअरमन राजेंद्र हत्ते यांनी दिली.

शिक्षक दिनानिमित्त दि.५ सप्टेंबर रोजी दुपारी एक वाजता लायन्स क्लबच्या सभागृहात पुरस्कारांचे वितरण वितरण श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते व आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहन डांगरे यांच्या उपस्थितीत होणार आहे. पुरस्काराचे स्वरूप शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे आहे. पुरस्काराचे मानकरी : डॉ.ए.एस शिंदे (खेडगी कॉलेज), आनंदप्पा कोरे (शहाजी हायस्कूल), कस्तुरचंद आळंद ( शिवचलेश्वर हायस्कूल,मैंदर्गी), कल्पना स्वामी (कल्याणशेट्टी विद्यालय) सचिन डफळे (मंगरुळे प्रशाला), दयानंद चिकणे (बसवेश्वर प्रशाला, काजीकणबस), परमेश्वर यादवाडे (जि.प. मराठी केंद्र शाळा, किणी),मसरत गौर (जि.प.शाळा,कर्जाळ) शंभूलिंग अकतनाळ (जि.प. केंद्र शाळा, चपळगाव), सुरेश भोसले (मूकबधीर निवासी शाळा,अक्कलकोट) शंभुलिंग बशेट्टी (माध्यमिक आश्रम शाळा,नागनहळ्ळी). यावेळी सचिव ला.शिरीष पंडित, खजिनदार ला.विठ्ठल तेली, ला.चेतन जाधव, ट्रस्टचे उपाध्यक्ष सुभाष गडसिंग, माजी अध्यक्ष ला.प्रभाकर मजगे, माजी अध्यक्ष ला.शदीद वळसंगकर आदी उपस्थित होते.

## गौरी-गणपती सजावट स्पर्धेत १५० महिलांचा सहभाग

### आयुष व्यसनमुक्ती संशोधन केंद्र व एकता महिला मंचचे आयोजन; महिलांचा केला सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ सप्टेंबर-**

जामगाव (आ) (ता. बार्शी) येथे आयुष व्यसनमुक्ती संशोधन केंद्र व एकता महिला मंच आयोजित गौरी-गणपती सजावट स्पर्धेत ज्योती कुंभार (सोन्याची नतनी) प्रथम, सुशीला सोनवणे (चांदीचा करंडा) द्वितीय, तर वैष्णवी सुतार (पैठणीची साडी) यांनी तृतीय क्रमांक मिळवला. लक्ष्मी सुतार, प्रमिला जाधव, सोनाली मंडलिक, रेश्मा मुक्ते, पूजा मोहिते, जयश्री जाधव, सारिका सुतार, प्रतिभा जगदाळे, विजया निचळ यांना उत्तेजनार्थ बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात आले. स्पर्धेमध्ये १५० सदस्यांनी भाग घेतला होता. त्यामधून १२ बक्षिसांचे वितरण करण्यात आले. एकता महिला मंचच्या सदस्यांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात आले.

प्रारंभी राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन डॉ संदीप तांबारे, डॉ पल्लवी तांबारे, कविता अंधारे, सुमनआई तांबारे, शीतल कुलकर्णी,प्रभाकर क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. तांबारे यांनी सर्व क्षेत्रांमध्ये महिला उल्लेखनीय कार्य करीत असलेबद्दल कौतुक केले. कविता अंधारे यांनी देखील महिलांना आहाराविषयी मार्गदर्शन केले. डॉ. संदीप तांबारे यांनी कुटुंबाचे व्यसनापासून संरक्षण करण्यासाठी प्रतिबंधक योजनांचे प्रशिक्षण दिले. त्यानंतर व्यसनमुक्ती पथनाट्य स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक गौडगाव, द्वितीय क्रमांक कारी, तृतीय क्रमांक गोरमाळे, उत्तेजनार्थ तांदुळवाडी, कारी, जामगाव (आ) यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात आले.

यावेळी डॉ. संदीप तांबारे, डॉ. पल्लवी तांबारे, सुमनआई तांबारे, डॉ. कविता अंधारे, अश्विनी कुंभार, शितल कुलकर्णी, मृणालिनी मोरे, एकता महिला मंचचे प्रभाकर क्षीरसागर उपस्थित होते. महिला मंचच्या शालन दसवंत, प्रभावती साबळे, नुरजहा शेख, जास्मिन शेख, प्रमिला जाधव, सुशीला सोनवणे, स्वाती शिंदे, पूजा मोहिते, प्रतीभा जगदाळे, लक्ष्मी सुतार, राणी पाटील, सुचिता काटे, राणी लोंढे, जानकी गायकवाड, शालन खळदकर उपस्थित होते. मृणालीनी मोरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रास्ताविक सारिका सुतार यांनी केले. प्रभाकर क्षीरसागर यांनी आभार मानले.

## सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ३ सप्टेंबर-**

वेळापूर (ता. माळशिरस) येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत वेळापूर येथील जिल्हा परिषद मुलींच्या शाळेत विद्यार्थिनींना वही, पेन आदी शालेय साहित्यांसह खाऊचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वेळापूर गावचे सरपंच रजनीश बनसोडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून वेळापूर पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक भाऊसाहेब गोसावी, महादेव देवालय ट्रस्ट अध्यक्ष अमृतराज माने-देशमुख, युवक आघाडी राज्य उपाध्यक्ष किरण धाईंजे, पश्चिम महाराष्ट्र संघटक एस. एम. गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष शामराव भोसले, जिल्हा सचिव भारत आठवले, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब धाईंजे, ज्येष्ठ मार्गदर्शक शिवाजी बनसोडे, तालुका सरचिटणीस मारुती खांडेकर, युवक तालुका अध्यक्ष दशरथ नवगिरे, तालुका मार्गदर्शक भास्कर बनसोडे, युवक सरचिटणीस प्रवीण साळवे, संपर्कप्रमुख अण्णासाहेब भोसले, ग्रामपंचायत सदस्य हनुमंत वायदंडे, पत्रकार तुषार केंगार व मुख्याध्यापक इनुस मुलाणी उपस्थित होते. यावेळी तालुका सचिव दादासो सरतापे, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष रणजीत सरवदे, श्रीपूर अध्यक्ष गणेश सावंत, विझोरी अध्यक्ष गौतम वाघंबरे, राजकुमार बनसोडे, प्रदीप सरवदे,अजय बनसोडे, वेळापूर युवक शहराध्यक्ष स्वप्निल सरवदे, संतोष बनसोडे, सतीश गायकवाड, संतोष जाधव, अतिश आठवले, दादा गालफडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन रिपब्लिकन पक्षाच्या वतीने तालुध्यक्ष मिलिंद सरतापे यांनी केले होते.



## सांगोल्यात सकल मराठा समाजाचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३ सप्टेंबर -**

मराठा समाज आरक्षण संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईमधील आझाद मैदानावर सुरू करण्यात आलेल्या मराठा आरक्षण लढ्याला यश मिळाल्याबद्दल सांगोल्यात सकल मराठा समाजाच्यावतीने बुधवार दि.३ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात जल्लोष साजरा करण्यात आला.

मराठा समाज आरक्षण संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईमधील आझाद मैदानावर दि.२९ ऑगस्ट पासून सुरू झालेल्या आंदोलनाच्या लढ्याला दि.२ सप्टेंबर रोजी सरकारने मराठा समाजाच्या मागण्या मान्य करीत अखेर पूर्णविराम दिला. सांगोला तालुक्यातील सुमारे ७ हजार मराठा आंदोलक या आंदोलनामध्ये सहभागी झाले होते. या विजयाचा जल्लोष साजरा करण्यासाठी बुधवार दि.३ सप्टेंबर रोजी स.११.३० वा. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक, वासूद चौक येथून मराठा बांधव महापुरुषांच्या पुष्पहार अर्पण करीत छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पोहचले. या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करीत जय जिजाऊ जय शिवराय, छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय असो, मनोज जरांगे पाटील यांचा विजय असोच्या घोषणा देण्यात आल्या.

मराठा समाजाला खऱ्या अर्थाने संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या रूपाने देवच भेटला आहे. ३५ किलो वजन व अडीच एकर शेती असणाऱ्या या मराठा योध्याने सकल मराठा समाजाला आरक्षणाचा लाभ मिळवून दिला आहे. मराठा समाजाला मिळालेल्या या ऐतिहासिक यशाचे श्रेय सकल मराठा समाज बांधवांचे आहे. मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा आरक्षणाच्या लढ्यात सकल मराठा समाजातील जे आंदोलक सहभागी झाले त्यांचा हा विजय आहे. त्याचे श्रेय इतर कोणीही घेऊ नये.

**- सकल मराठा समाज बांधव, सांगोला तालुका**

## आरक्षणाच्या यशस्वी लढ्याचा मंगळवेढ्यात जल्लोष




**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि.३ सप्टेंबर -**

मराठा आणि कुणबी एकच असून मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासह इतर प्रमुख मागण्यांसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आरक्षण लढ्याला यश मिळाल्याबद्दल मंगळवेढा सकल मराठा समाजाच्या वतीने पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला सुरवातीस शिवालयातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले यावेळी मनोज जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है एकच मिशन मराठा आरक्षण हम सब जरांगे एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देऊन दामाजी चौक,शिवप्रेमी चौकात पेढे वाटून जल्लोष करण्यात आला राज्य शासनाकडून ८ पैकी ५ मागण्या मान्य केल्याने पाटील यांनी उपोषण सोडत आंदोलन मागे घेतले आहे

मंगळवेढ्यातून सायकल, मोटारसायकल, फोर व्हीलर मधून हजारो मराठा बांधव आझाद मैदानावर दाखल झाले होते. यावेळी मंगळवेढा तालुक्यातील गावगावातून व शहरातील सकल मराठा समाज मोठया संख्येने उपस्थित होता.



दैनिक तरुण भारतच्या श्रींची पूजा स्वराज्य संग्रामचे प्रदेशाध्यक्ष तानाजीराव शिंदे आणि सोलापूर जिल्हा परिषदेचे अकाउंट ऑफिसर हरेश मेत्रस आणि सौ. म्हेत्रस यांच्या हस्ते संपन्न झाली. याप्रसंगी तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने आणि गंगाधर गायकवाड, सागर गायकवाड उपस्थित होते.

# १७० प्रशिक्षणार्थी पोलिसांना अन्नातून विषबाधा

- केगाव प्ररिक्षण केंद्रातील घटना
- ८८ जणांना उपचारानंतर सोडले
- १५ प्रशिक्षणार्थींना सलाईन लावले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**



मंगळवारी रात्री केगाव प्रशिक्षण केंद्रात जेवण केलेल्या १७० प्रशिक्षणार्थी पोलिसांना अन्नातून विषबाधा झाली. त्यांना बुधवारी सकाळी सातच्या सुमारास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारानंतर यातील ८८ जणांवर सोडून देण्यात आले, तर १५ प्रशिक्षणार्थींना सलाईन लावण्यात आले. रात्री त्यांना सोडून देण्यात आले.

दरम्यान प्रशिक्षणार्थी पोलिसांवर छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयाच्या प्रशासनाने डॉक्टरांची फौज उभी केल्याने लवकर उपचार झाले. केगाव प्रशिक्षण केंद्रात बुधवारी नेहमीप्रमाणे पोलिसांना कवायतीसाठी मैदानावर बोलवण्यात आले. तेव्हा काही जणांनी पोटात दुखणे, मळमळ, उलटीचा त्रास होत असल्याचे वरिष्ठ अधिका-यांना सांगितले. हळूहळू ही संख्या वाढू लागली. यामुळे पोलिसांनी तत्पर्ता दाखविली. त्रास होणा-या प्रशिक्षणार्थी पोलिसांना तातडीने बसमधून शासकीय रुग्णालयात दाखल केले. यातील पंधरा जणांना सलाईन लावण्यात आले होते. सायंकाळपर्यंत उपचार करून त्यांनाही घरी सोडण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

दरम्यान, ही माहिती मिळताच सिव्हिल प्रशासनाने आपात्कालीन वैद्यकीय पथके, औषध वैद्यकशास्त्र विभागातील विभाग प्रमुख व सर्व प्राध्यापक, १० कनिष्ठ निवासी डॉक्टर, इंटर्न यांना बोलावले. यात डॉ. अमर, डॉ. कल्याणी चव्हाण, डॉ. नितीन बनसलवार, डॉ. भाग्येशा, डॉ. वैष्णवी पाटील, डॉ. हर्षल मेश्राम, डॉ. गोरक्ष डॉ. सौरभ आदींचा सहभाग होता.

**१७० प्रशिक्षणार्थी पोलिसांना त्रास**
सोलापूर येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रात जवळपास १ हजार ४०० प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहेत. दरम्यान मंगळवारी सायंकाळच्या सत्रात या प्रशिक्षणार्थींना उलटी, जुलाब, मळमळ याचा त्रास सुरु झाला. त्यानंतर जवळपास १७० प्रशिक्षणार्थींना सोलापूर सिव्हील हॉस्पीटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.

**- विजयकुमार चव्हाण,**
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, केगाव, सोलापूर

## महत्वाचे...



### प्रीती केशेट्टी यांचे राज्यस्तरीय पात्रता परीक्षेत यश

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक येथील गणित विषयाच्या प्राध्यापिका प्रीती शरणप्पा केशेट्टी यांनी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा गणित विषयात यश संपादन केले आहे. या यशामध्ये त्यांना सोलापूर विद्यापीठ गणित विभागाचे विभागप्रमुख डॉ. ज्योती माशाळे, डॉ. धानय्या कवटगीमठ, खेडगी कॉलेजचे गणित विभागप्रमुख प्रा. एन. आय. धनशेट्टी तसेच महेश जरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष धर्मराज काडादी, विश्वस्त ॲड. आर. एस.पाटील, कॉलेजचे प्रा.गजानन धरणे यांनी अभिनंदन केले.



### मेहता प्राथमिक शाळेत 'हमारा विद्यालय हमारा स्वाभिमान' उपक्रम

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हमारा विद्यालय हमारा स्वाभिमान हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये अनुशासन, राष्ट्रीय भाव, सामाजिक समरसता, शाळेतील साधनसंपत्तीची काळजी घेणे व नागरी कर्तव्याचे पालन करणे हे मूल्याधिष्ठित जीवन विचार विकसित होण्यासाठी शाळेतील सहशिक्षक योगेश सरवदे यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. या उपक्रमांतर्गत शाळेत अनुशासन वृक्षारोपण, स्वच्छता यासारख्या उपक्रमातून प्रत्यक्ष मार्गदर्शन केले. सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी ही मूल्ये रुजवण्यासाठी संकल्प करून शपथ घेतली. तसेच गणेशोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या वैयक्तिक स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

### एमआयडीसी परिसरातून दुचाकीची चोरी

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

शहरातील नई जिंदगी परिसरातून होंडा कंपनीची एच.एफ.डिलक्स मोटारसायकल चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. फिर्यादी मोहम्मद अब्दुलसत्तार मालदार (वय-३८,रा.नई जिंदगी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार,दि.१ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजता ते २ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंतच्या दरम्यान त्यांची काळ्या रंगाची मोटारसायकल (क्र.एम.एच.१३.सी.वाय.०५६३) हँडल लॉक करून पार्क केली होती.दरम्यान अज्ञात चोरट्याने मोटारसायकल चोरून नेली.या चोरीचा एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून,अज्ञात चोरट्याचा शोध सुरू आहे.

## आजोबा ताता गणपती गणेशोत्सव मंडळाच्यावतीने केदारनाथ मंदिर देखावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

श्री आजोबा ताता गणपती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने यंदाच्या गणेशोत्सवात कॉम्रेड गोदुताई परुळेकर नगर नवीन विडी घरकुल येथे केदारनाथ मंदिर देखावा करण्यात आला. देखाव्याच्या उद्घाटन मंगळवार दि. २ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वा कॉम्रेड आडम मास्तर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कॉम्रेड गोदुताई परुळेकर नगर नवीन विडी घरकुल येथे केदारनाथ मंदिर देखावा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिकांनी गर्दी केली होती. यावेळी बापु साबळे, वसिम देशमुख, राजेशम बुटला, श्रीनिवास दुभाषी, श्री आजोबा ताता णपती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष भीमाशंकर झाडबुके, बाळकृष्ण मल्याळ, आनंद कटकम, संतोष बोडा, नागेश कासुल, दिपक भुदत्त, भास्कर वोद्दुल, मुकेश वल्लाल, दिपक भुदत्त, महेश जक्कुल, उपाध्यक्ष प्रशांत शेरला सचिव मधुकर गाजूल, खजिनदार अशोक माचन ,अमर रच्चा, राजू यंनगदुल, सतीश गुर्रम, पुरुषोत्तम मार्चला आदींची उपस्थिती होती.




## २२ सप्टेंबरपासून नवरात्रास आरंभ

- रूपाभवानी मंदिरात नवरात्र उत्सवाची तयारी
- प्रतिवर्षी लाखो भाविकांची मांदियाळी
- मुख्य पुजारी संजय पवार यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

तमाम सोलापूरकरांचे आराध्यदैवत श्री रूपाभवानी मातेच्या मंदिरात नवरात्र महोत्सवाची तयारी सुरू झाली असून, यंदा २२ सप्टेंबरला घटस्थापना होवून नवरात्रास आरंभ होणार आहे. हा उत्सव २ ऑक्टोंबर २०२५ पर्यंत म्हणजेच विजयादशमी पर्यंत आहे. त्यानंतर कोजागिरी पौर्णिमा उत्सव ३ दिवस चालतो. या काळात लाखो भाविक श्री देवीजींच्या चरणी लीन होण्यासाठी उपस्थिती लावतात.

दरम्यान, या उत्सवासाठी मंडप उभारणी सुरू झाल्याची माहिती श्री रूपा भवानी देवस्थान व भक्त तरुण मंडळाच्या वतीने येथील मुख्य पुजारी संजय पुजारी यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना आज (दि. ३) दिली. श्री रूपा भवानी मातेच्या नवरात्र उत्सवानिमित्त अधिक माहिती देताना मुख्य पुजारी पवार म्हणाले की, नवरात्र उत्सवातील पहिल्या आणि दुसऱ्या माळेला भाविकांची उपस्थिती कमी जाणवते. तिसऱ्या माळेपासून मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी सुरू होते. यानंतर अष्टमी, नवमी आणि दशमीस रोज ३० ते ४० हजार भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते. शिमोल्लंघनानंतर कर्नाटक, आंध्रातून हजारो भावीक श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी सोलापूरहून जातात. यावेळीही हे भावीक श्री रूपा भवानी मातेचे दर्शन घेवूनच तुळजापूरला मार्गस्थ होतात. यामुळे कोजागिरी पौर्णिमा पार पडेपर्यंत श्री रूपा भवानी मातेच्या मंदिरात भाविकांची मोठी गर्दी दिसून येते. प्रतिवर्षीप्रमाणे धार्मिक विधी पार पडणार असून, यंदा जास्त पाऊस पडल्याने मंडपाची तयारी लवकरच सुरु केल्याचे पवार यांनी सांगितले.





सोलापूर : जोड बसवण्णा चौक येथील ताता गणपती येथे महिला भक्तांनी मोठ्या उत्साहात दीपोत्सव साजरा केला.

## बोरामणी येथे एसटीची कंटेनरला धडक; सात प्रवाशी जखमी

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुकयातील बोरामणी गावाजवळ एसटी आणि कंटेनरच्या झालेल्या अपघातात सात प्रवाशी जखमी झाले. हा अपघात बुधवारी दुपारी घडला.

शिवकुमार म्हेत्रे (वय ४६), संजीवणी म्हेत्रे (वय ७०, दोघे रा. बिदर कर्नाटक), श्रावणकुमार शिवाजीराव दाडगे (वय ३५ , रा. बिदर, कर्नाटक), रविंद्र रमेश पाटील (वय ४५, रा.जेवळी ता लोहारा), समीर अ. सत्तार काझी (वय ३३, रा. नळदुर्ग ता. तुळजापूर),मौजन अबुबकर नजरअली (वय ३०, रा. नळदुर्ग) अशी जखमींची नावे आहेत. वरील सर्व प्रवाशी हे बुधवारी दुपारच्या सुमारास हैद्राबादहून सोलापूरकडे जात असलेल्या एसटी बसमधून प्रवास करत होते. दक्षिण सोलापूर तालुकयातील बोरामणी गावाजवळ आल्यानंतर समोरील कंटेनरला ओव्हरटेक करण्याचा एसटी चालकाचा प्रयत्न होता. परंतु त्यावेळी एसटीची कंटेनरला धडक लागली. यात एसटीतील प्रवाशी जखमी झाले. सर्वजखमी रुग्णवाहिकेतून उपचाराकरीता रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## चबुतऱ्यावर चढून हातवारे करणाऱ्या तरुणाचा मारहाणीत मृत्यू




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छ. शिवाजी महाराजांच्या चबुत-यावर चढून हातवारे करणा-या तरुणाचा मारहाणीत मृत्यू झाला. ही मारहाण पहाटे ४.३० च्या सुमारास झाली असून याप्रकरणी दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मृत तरुणाची ओळख पटविण्याचे काम सुरु असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

याबाबत पोलीस अंमलदार अतुल लक्ष्मण रेसिपी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी सुरज सुरेश सुरवसे (रा. मराठा वस्ती, भवानी पेठ, सोलापूर)व प्रशांत दत्तात्रय मरगणे (रा. अवंती नगर, सोलापूर) या दोघांना अटक केली आहे. यातील फिर्यादी आणि पोलीस अंमलदार चव्हाण असे दोघे एसटी स्टॅन्ड येंथे चहा पिण्यासाठी जात होते. त्यावेळी त्यांना छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे गर्दी दिसून आली. तेथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या चबुत-यावर एकजण चढलेला दिसला. त्याला खाली घेण्यासाठी एक तरुणवर चढलेला दिसला. ती व्यकती खाली येत नसल्याने त्यास लाकडाने मारहाण करून खाली उतरवत असताना ती व्यक्ती खाली पडली.

त्यादरम्यान खाली जमलेल्या गर्दीतील एकाने त्यास लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यावेळी फिर्यादी तसेच अंमलदार मुरकुटे व चव्हाण यांनी त्या व्यकतीची सोडवणूक करून रिक्षातून रुग्णालयात नेले. यादरम्यान तो असबंध बडबड करत होता. तेथील डॉक्टरांनी तपासणी केली असता ती व्यक्ती उपचारापूर्वीच मृत झाल्याचे सांगितले. त्या व्क्तीचे अंदाजे वय ४० असल्याचे पोलिसात नमूद आहे. या घटनेचा तपास सपोनि खंडागळे करत आहेत.

**अनोळखी व्यक्तीविरूध्द गुन्हा**
रोहित सुभाष सातपुते (वय ३२, रा. मराठा वस्ती) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी आणि त्यांचा मित्र सुरुज सुरवसे असे दोघे बस स्टॅन्डकडून छत्रपती शिवाजी महाराज चौक यामार्गे जाताना आरोपी अनोळखी व्यक्ती ही चबुत-यावर चढून हातवारे करत होती. त्यावेळी सुरज सुरवसे हा तरुण त्यास खाली घेण्यासाठी चबुत-यावर गेला तेव्हा फिर्यादी खाली थांबल्याचे या नमूद करण्यात आले आहे.






**श्री शंकराच्या अवतारात गणेशांच्या मूर्ती...**

सोलापूर : यंदाच्या गणशोत्सवात श्री शंकरांच्या अवतारातील गणेश मूर्ती मोठ्या प्रमाणात विविध मंडळामध्ये आहेत. तसेच देखावेही शंकराच्या मंदिररूपात आहेत. यामध्ये जय शितलादेवी तरुण मंडळ उत्तर सदर बाजार, जय जवान तरुण मंडळ मुंशी बंगला, जय भोलेनाथ मित्र मंडळ लोधी गल्ली, श्री गणेश मित्र मंडळ मूर्ती मौजश्री संस्था बेडर पूल. (सर्व छायाचित्रे : केवल तिवारी)




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.







# २०१७ च्या मनपा निवडणुकीप्रमाणेच प्रभाग रचना



- **महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना जाहीर**
- **महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली पत्रकार परिषदेत माहिती**
- **शहरात राजकीय मोर्चे बांधणी सुरु**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

सर्वांना उत्सुकता लागलेल्या सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रारूप प्रभाग रचना आज सकाळी १० वाजता महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी प्रसिद्ध केली आहे. मागील सन २०१७ च्या निवडणुकीप्रमाणे रचना जैसे थे असल्याचे दिसून येते. प्रभाग रचना तयार करताना कोणतेही प्रगणक गट फोडण्यात आले नाहीत.१५ सप्टेंबरपर्यंत हरकती व सूचना नोंदविता येणार आहे.

एकूण १०२ सदस्य आणि एकूण २६ प्रभागासाठी ही रचना आहे. यामध्ये ४ सदस्यीय २४ तर तीन सदस्यीय २ प्रभागांचा समावेश आहे. यामुळे आतापासूनच राजकीय मोर्चे बांधणीला सुरुवात अधिक गतीने येणार आहे. सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचनेसंदर्भात महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सकाळी पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती दिली. महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग रचना तयार करताना कोणतेही प्रगणक गट फोडण्यात आलेले नाहीत.सोलापूर महानगरपालिकेची प्रभाग रचना तयार करताना प्रभागाची लोकसंख्या त्या प्रभागाच्या सरासरी लोकसंख्येच्या १० टक्के कमी किंवा जास्त या मर्यादेतच ठेवण्यात आलेले आहे. केवळ प्रभाग क्र.६ व २६ या २ प्रभागांची लोकसंख्या कमाल मर्यादेपेक्षा अनुक्रमे ३० व २४ ने जास्त आहे. प्रभागाच्या सीमारेषा, मोठे रस्ते, नाले, रस्ते, रेल्वे रुळ, फ्लायओव्हर इत्यादी नैसर्गिक मर्यादा विचारात घेऊन निश्चित करण्यात आली आहे. या प्रभागास आवश्यक रस्ता, फ्लायओव्हर याचा विचार करुन प्रभागाची रचना करण्यात आली आहे. या क्षेत्रामध्ये दळणवळणाच्या अनुषंगाने जागेवर ओव्हर ब्रिज व रस्ते उपलब्ध आहेत. सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ मधील चार सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार रचना होती. या प्रभाग रचनेमध्ये कोणताही बदल न करता सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये चार सदस्यीय २४ प्रभाग व तीन सदस्यीय २ प्रभाग (प्रभाग क्र. २५ व २६) तयार करण्यात आले आहेत. शासनाचे दि. १४ ऑगस्ट २०२५ चे आदेशानुसार व राज्य निवडणूक आयोगाचे दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता तयार करण्यात आलेली प्रारुप प्रभाग रचना दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आली आहे.

प्रारुप प्रभागांचे एकत्रित नकाशा तसेच प्रत्येक प्रभागाचे स्वतंत्र नकाशे सोलापूर महानगरपालिकेच्या कौन्सिल हॉल येथे कार्यालयीन वेळेत सर्व नागरिकांना पाहण्यासाठी उपलब्ध असतील. प्रारुप प्रभागांचा एकत्रित नकाशा सोलापूर महानगरपालिकेच्या सर्व विभागीय कार्यालयामध्येही प्रसिध्द करण्यात आला आहे.

प्रारुप प्रभागांचा एकत्रित नकाशा व सर्व प्रभागांचे नकाशे आणि अधिसूचना सोलापूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ www.solapurcorporation.gov.in प्रसिद्ध करण्यात येईल, असे डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगररचना उपसंचालक मनीष भिष्णूकर, निवडणूक विभागाचे अधिक्षक ओमप्रकाश वाघमारे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

### अशी आहे नकाशांसाठी फी

सर्व प्रभागांचा एकत्रित नकाशा हा ७ हजार रुपये व एका प्रभागाचा नकाशा ७०० रुपये आणि शासन अधिसूचना पानास ३ रुपये इतकी शासकीय फी आकारण्यात येणार आहे. हा नकाशा मिळण्यासाठी नागरिकांनी अभिलेखापाल कार्यालय, सोलापूर महानगरपालिका येथे नागरिकांनी अर्ज करावा.

### ३ ते १५ सप्टेंबर दरम्यान हरकती व सूचना

प्रारुप प्रभाग रचनेवर नागरिकांनी हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी ३ ते १५ सप्टेंबर २०२५ (दुपारी ३.०० वाजेपर्यंत) आहे. हरकती व सूचना सोलापूर महानगरपालिका निवडणूक कार्यालय, डॉ. द्वारकानाथ कोटणीस शॉपिंग सेंटर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, सोलापूर येथे प्रत्यक्ष सादर कराव्यात. हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरिकांना सुनावणीसाठी स्वतंत्ररीत्या कळविण्यात येणार आहे. सुट्टी दिवशीही कामकाज सुरू राहणार आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले आहे.

### १६ ते २२ सप्टेंबर दरम्यान हरकती व सूचनावर सुनावणी

दि. १६ ते २२ सप्टेंबरच्या कालावधीत जिल्हाधिकारी अथवा जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांमार्फत हरकती व सूचनांवर सुनावणी घेण्यात येणार आहे. दि. २३ ते २५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत हरकती व सूचनांवरील शिफारसी विचारात घेवून प्राधिकृत अधिकारी यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना ही नगर विकास विभागास सादर करण्यात येणार आहे.

### ९ ते १३ ऑक्टोबरदरम्यान अंतिम प्रभाग रचना प्रसिध्दी

दि. २६ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना नगर विकास विभागामार्फत राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात येणार आहे. दि. ९ ते १३ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राज्य निवडणूक आयोग यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना अधिसूचनेद्वारे शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येणार आहे.

**सोलापूर महापालिकेत सन २०१७ मध्ये असे होते पक्षीय बलाबल... सोलापूर महापालिकेच्या स्थापनेनंतर प्रथमच सन २०१७ मध्ये सोलापूर महापालिकेत भाजपाची सत्ता प्रस्थापित झाली.**

| १०२ जागांपैकी पक्षीय बलाबल असे | |
|---|---|
| भाजपा | ४९ |
| शिवसेना | २१ |
| काँगेस | १४ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ४ |
| एमआयएम | ९ |
| बसपा | ४ |
| माकपा | १ |

**यापूर्वी महापालिका निवडणूक २०१७ मध्ये चार सदस्यांचा एक प्रभाग होता. यात प्रत्येकी दोन जागा महिलांसाठी तर दोन जागा सर्वसाधारण अशी रचना होती. त्यामुळे सर्वांना संधी उपलब्ध झाली होती.**

### सरासरी ३७ हजार ३१६ लोकसंख्येचा चार सदस्यीय प्रभाग

प्रभागांची एकूण संख्या – २६ असून चार सदस्यीय प्रभाग २४ तर तीन सदस्यीय प्रभाग २ (प्रभाग क्र.२५ व २६) आहेत. सोलापूर महानगरपालिका क्षेत्राची २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या – ९ लाख ५१ हजार ५५८ आहे. यामध्ये अनूसुचित जातीची लोकसंख्या – १ लाख ३८ हजार ७८, अनुसूचित जमातीची लोकसंख्या – १७ हजार ९८२ आहे. यासाठी चार सदस्यीय प्रभाग सरासरी ३७ हजार ३१६ लोकसंख्या तर तीन सदस्यीय प्रभागात सरासरी २७ हजार ९८७ लोकसंख्या धरण्यात आली आहे. निवडून दयावयाच्या महानगरपालिका सदस्यांची संख्या – १०२ आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

### प्रारूप प्रभाग रचना पाहण्यासाठी महापालिकेत गर्दी

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठीची प्रारूप प्रभाग रचना आज सकाळी दहा वाजता महापालिकेच्या कौन्सिल हॉल सभागृहाचे आवारात नागरिकांना पाहण्यासाठी लावण्यात आली आहे. येथील व्यवस्थित महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी पाहणी केली. दरम्यान महापालिका आवारात प्रारुप प्रभाग रचना आणि नकाशे पाहण्यासाठी राजकीय नेते, माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, इच्छुक तसेच नागरिकांनी गर्दी केल्याचे दिसून आले.







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - ११९८

**गाईसी देखोनि बदबदा मारी ।**
**घोड्याची चाकरी गोड वाटे ॥**

अनेकांना चांगल्यांची किंमत करण्यात किंवा स्तुती करण्यात अकारण खेद वाटत असतो. पण अशांना वाईटांची स्तुती करण्यास सकारण आनंद वाटतो. वाईटांची स्तुती करण्यामुळे वाईट लोक मदत करतील किंवा आपले नुकसान करणार नाहीत, म्हणून लोक दुर्गुण असणाऱ्यांना भितीपोटी का होईना चांगले म्हणतात. चांगले, सज्जन लोक मूळात सज्जन असल्याने कोणाला दुखावण्याचा त्यांचा मानस नसतो. अशा लोकांना कोणी छळले किंवा नांव ठेवले तरी हे लोक शांत असतात. अशा लोकांना छळण्यात, नांव ठेवण्यात काहींना आनंद वाटतो. अशा लोकांचे चांगलेपण आवडत नसावे किंवा अशांना चांगले म्हटल्याने आपले मोठेपण कमी होईल अशा चुकीच्या भावनेने, लोक चांगल्यांना छळतात किंवा नांव ठेवतात. गाय ही अत्यंत पवित्र असली तरी ती गरीब असते. ती लाथा मारीत नाही किंवा समोरच्याला मारत नाही. त्याचबरोबर चवताळून अंगावर येत नाही किंवा चावत नाही. म्हणून तिला बदाबदा मारायचे आणि घोड्यावर बसून स्वारी करता येते किंवा त्याला मारले तर तो लाथा मारेल, वर बसल्यास पाडेल किंवा चवताळेल म्हणून त्याची सेवा करायची. अर्थात, गरीबांना, चांगल्यांना छळायचे आणि कठोरांची, दमदारांची सेवा करायची असे वर्तन ठेवणारे भरपूर लोक समाजात आहेत. अशा लोकांचा सहवास आपणाला लाभू नये. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**गाईसी देखोनि बदाबदा मारी ।**
**घोड्याची चाकरी गोड वाटे ॥**

एखाद्या घरात दोन किंवा त्यापेक्षा जास्त सुना असतील तर सासू-सासरे किंवा घरातील इतर मंडळी जी सून गरीब आहे, कोणत्याही परीस्थितीत उलट बोलत नाही, चुगल्या चहाड्या करीत नाही, तिला छळतात. तिला नको तेवढी कामे दिली जातात. तिच्या प्रत्येक गोष्टीत हस्तक्षेप केला जातो. पण त्याच घरातील स्वभावाने कडक असणाऱ्या सुनेला मात्र कांहीच बोलले जात नाही. असे सर्वच घरी घडते असे नसले तरीही काही ठीकाणी तरी घडते, हे विसरता येणार नाही. असो, अशाच घटना जवळपास सर्वच क्षेत्रात घडत असतात. लोक दुष्टांच्या, सत्ता असणाऱ्यांच्या, स्वभावाने कडक असणाऱ्यांच्या पुढे पुढे करतात आणि गोरगरीबांना किंवा कोणाच्या अध्यात-मध्यात न जाणाऱ्यांना छळतात. स्वार्थापोटी, भितीपोटी एखाद्याला पात्रता नसतांनाही मोठेपण देणे, त्याचा उदो उदो करणे आणि पात्रता असतांनाही केवळ स्वभावाने गरीब आहे, कांही केले तरी तो किंवा ती सहन करतो किंवा करते म्हणून त्याला छळणे हा वेडेपणा आहे. असो, आपल्यासारख्या ज्ञानोबा-तुकोबांच्या भक्तांकडून अशा प्रकारचे वर्तन होऊ नये, अशी अपेक्षा.

**जय जय राम कृष्ण हरी ॥**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. ४ सप्टेंबर २०२५ | वामन जयंती, श्री मदन |
| विक्रम संवत् २०८२ | महाराज महाप्रसाद - नांदगाव |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - भाद्रपद | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. द्वादशी (२८.०७) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - उत्तराषाढा (२३.४३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सौभाग्य (१५.२०) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (१६.१९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

# दक्षिणमधील नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करा

### आ. सुभाष देशमुखांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

दक्षिण तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः भीमा व सीना नदीला आलेल्या पुरामुळे नदीकाठच्या शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या शेतीचे पंचनामे प्रशासनाने पूर्ण केले आहेत. मात्र, इतर ठिकाणी झालेल्या नुकसानीचे पंचनामे अद्याप झालेले नाहीत. याबाबत आमदार सुभाष देशमुख यांनी गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी या भागाचे त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी व तहसीलदारांना दिले आहेत.

गेल्या महिन्यात दक्षिण तालुक्यात मोठा पाऊस झाला. यामुळे शेतकर्यांचे तूर, उडीद, मक्यासह अनेक पिकांचे नुकसान झाले आहे. भीमा व सीना नदीला या पावसामुळे पूर आला होता. शासनाने या नदी काठच्या नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे केले. मात्र इतर ठिकाणचे पंचनामे अद्याप केले नाहीत. त्याचे पंचनामे त्वरित करण्याचे आदेश आ. देशमुख यांनी दिले आहेत. शेतकर्यांच्या संसारावर या अतिवृष्टीमुळे संकट कोसळले आहेत. शेतकरी कर्जबाजारी असून या नुकसानीमुळे त्यांच्या अडचणी अधिक वाढल्या आहेत. शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही तर त्यांची परिस्थिती आणखी गंभीर होईल. त्यामुळे नुकसान भरपाईसाठी शासनाच्या यंत्रणांनी जलद गतीने काम करावे, असे आ. देशमुख म्हणाले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची मदत करणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. पिकांचे नुकसान झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याला दिलासा मिळेपर्यंत आपण प्रयत्नशील राहू, असे आ. सुभाष देशमुख म्हणाले.



## उत्तम त्याग धर्म

जैन धर्मातील दशलक्षण धर्मांमध्ये उत्तम त्याग धर्म अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्याग म्हणजे केवळ वस्तूंचा त्याग नव्हे, तर लोभ, मोह, क्रोध, मत्सर यांसारख्या अंतर्गत विकारांचा त्याग करणे हाच त्याचा खरा अर्थ आहे. मनुष्याने जर जीवनात त्याग स्वीकारला, तर त्याला खरी शांती आणि समाधान मिळते. त्यागेनैके अमृतत्वमानशुः फक्त त्यागानेच अमरत्व प्राप्त होते. त्याग हा बाह्य आणि आभ्यंतर अशा दोन स्वरूपात दिसतो.




बाह्य त्याग म्हणजे धन, वस्तू, सुखसोयींचा त्याग. हा त्याग केल्याने साधेपणा व संयम येतो. आभ्यंतर त्याग म्हणजे राग-द्वेष, मत्सर, अहंकार, लोभ, मोह यांसारख्या वासनांचा त्याग. हा त्याग केल्याने आत्मा शुद्ध आणि निर्मळ होतो. त्यागो हि परमं दानम त्याग हेच सर्वोच्च दान आहे. आजच्या जीवनातील माणूस भौतिक सुखांच्या मागे धावताना अधिक स्वार्थी आणि अस्वस्थ होत चालला आहे. समाजात स्पर्धा, लोभ आणि असहिष्णुता वाढली आहे. अशा परिस्थितीत त्याग धर्म हेच खरी जीवनशैली ठरते. त्यागामुळे मन शांत होते. लोभावर विजय मिळतो. सहिष्णुता, करुणा व प्रेम वाढते. समाजात बंधुभाव आणि समरसता निर्माण होते. दैनंदिन जीवनात त्याग धर्म अवघड नाही. आपल्या रोजच्या जीवनातही त्यागाचा अंगीकार करता येतो. गरजेपुरतेच उपभोग करणे, लोभाला वश न होणे, इतरांच्या हितासाठी काहीतरी सोडणे, स्वार्थापेक्षा परमार्थाला प्राधान्य देणे, साधेपणा आणि संयम स्वीकारणे, हेच खरे त्याग धर्माचे आचरण आहे. त्यागेन सुखमाप्नोति त्यागानेच खरे सुख मिळते. उत्तम त्याग धर्म हा आत्मशुद्धीचा व समाजहिताचा मार्ग आहे. त्यागाने माणूस अधिक दयाळू, सहिष्णु आणि समाधानी बनतो. भौतिक सुखसोयी तात्पुरते सुख देतात; परंतु त्याग धर्म जीवनाला शाश्वत शांती व आध्यात्मिक उन्नती प्रदान करतो. न त्यागात् परमं धर्मः त्यागासारखा मोठा धर्म नाही.

**- प्रा. अजित देवसाळे**
९८५००९२९७५

# लोकमंगल शिक्षकरत्न पुरस्कारांचे रविवारी वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ सप्टेंबर-**

लोकमंगल फाउंडेशन आणि लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था यांच्यातर्फे देण्यात येणाऱ्या लोकमंगल शिक्षकरत्न पुरस्कारांचे वितरण रविवार दि. ७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहात होणार आहे, अशी माहिती पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. ह. ना. जगताप यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावर्षी हे पुरस्कार १० शिक्षक आणि दोन प्राथमिक शाळांना देण्यात येणार आहेत. या पुरस्कारांचे हे १९ वे वर्ष आहे. हे पुरस्कार गुणवंत शिक्षकांकडून प्रस्ताव मागवून घेऊन काही पुरस्कारांची निवड केली जाते तर शिक्षण क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींनी निर्देशित केलेल्या दोन शिक्षकांना पुरस्कारित केले जाते. सोलापूर जिल्ह्याचे नाव मोठे करणाऱ्या एका कर्तबगार व्यक्तीला प्रेरणा देणाऱ्या शिक्षकाला डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम पुरस्काराने सन्मानित केले जाते. त्याशिवाय जिल्हा परिषदेच्या दोन प्राथमिक शाळांना आदर्श शाळा पुरस्कार दिले जातात. यंदा राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तम यश मिळवून सध्या तेलंगणामध्ये करीमनगरच्या जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असणाऱ्या अश्विनी वाकडे-एडगे यांना प्रेरणा देणारे शिक्षक म्हणून सांगोला तालुक्यातील घेरडी येथील निवृत्त शिक्षक विनायक कुलकर्णी यांना अब्दुल कलाम पुरस्कार दिला जाणार आहे. निर्देशित शिक्षक म्हणून वालचंद कला विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आणि इतिहास तज्ज्ञ डॉ. चंद्रकांत चव्हाण आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील शिंगडगावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक डॉ. अनिल सर्जे यांना पुरस्कार दिले जाणार आहेत,

कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन मधील प्राध्यापक डॉ. दत्ता वाघमारे आणि दयानंद शिक्षण शास्त्र महाविद्यालयातील डॉ. किसन शिंदे या वरिष्ठ महाविद्यालयातील दोन प्राध्यापकांना पुरस्कार दिले जातील. कला / क्रीडा शिक्षक या श्रेणीतील पुरस्कारासाठी दक्षिण सोलापूर तालुक्यातल्या जीवन विकास प्रशालेतील शिक्षक विजय बिज्जरगी यांची निवड करण्यात आली आहे. आदर्श माध्यमिक शिक्षक म्हणून महंमद इलाही शेख (कारी, ता. बार्शी) तर डॉ. अंजली शिरसी (सेवासदन प्रशाला सोलापूर) यांची आणि आदर्श प्राथमिक शिक्षक म्हणून आशा गणेश पवार (कंदलगाव ता द. सोलापूर) आणि दत्तात्रय येडवे (मरोळी ता. मंगळवेढा) यांची निवड करण्यात आली आहे.सोलापूरच्या मजरेवाडी जिल्हा परिषद शाळेला तसेच उत्तर सोलापूर तालुक्यातील कारंबा येथील जिल्हा परिषद शाळेला आदर्श शाळा पुरस्कार देण्यात येणार आहे. या पुरस्कारांचे वितरण शिक्षण तज्ज्ञ डॉ. दत्तात्रय तापकीर यांच्या हस्ते होणार आहे आहेत. या कार्यक्रमाला लोकमंगल संस्थेचे प्रणेते आमदार सुभाष देशमुख यांची प्रमुख उपस्थित राहणार आहेत. या पत्रकार परिषदेस डॉ. आशालता जगताप, अरविंद जोशी, तानाजी माने, मारुती तोडकर, राजकिरण चव्हाण, दिपाली कोठारे उपस्थित होते.

# मुद्रांक जिल्हाधिकारीपदी अनिकेत बनसोडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर**

जिल्ह्यातील सह जिल्हा निबंधक वर्ग १ च्या मुद्रांक जिल्हाधिकारी पदाचा अनिकेत शेषराव बनसोडे यांनी पदभार घेतला असून, यांच्याकडे बार्शी उपनिबंधक देखील पदभार आहे. सन २०२२-२३ मध्ये सोलापूर मुद्रांक कार्यालयात दुय्यम निबंधक पदी उत्तम कामगिरी केल्याने त्यांना परांडा, धाराशिव येथे बढती मिळाली होती. खोमणे हे सेवानिवृत्त झाल्यानंतर अनिकेत बनसोडे यांना सोलापूर जिल्हा मुद्रांक वर्ग -१ च्या जिल्हाधिकारी पदी नियुक्ती करण्यात आल्यानंतर त्यांनी पदभार घेतला आहे.



# आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्या ५४ व्या वाढदिवसानिमित्त नगर येथील दत्त मंदिर परिसरात मंगळवारी मोफत आरोग्य व रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिराची सुरुवात दत्त महाराजांचा पुजारने पूर्व विभाग दत्त मंदिराचे अध्यक्ष महेश देवसानी यांच्या हस्ते करून सुरुवात करण्यात आली. शेकडो युवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. अनेक नागरिकांनी मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले.

यावेळी नवलकुमार चिलवेरी, नरेंद्र सांगा, श्रीनिवास बिटला, नागेश दिकोंडा, पवन गुंडेटी, व्यंकटेश पासकंटी, आनंद अवधूत, राजेश ताटीपामुल, श्रीनिवास कनकी, अनिल कोंडा, लक्ष्मीकांत दावत, प्रमोद चारगुंडी, राजेश वासम, गणेश पोतन, राघवेंद्र शासम, अनंत आडम, विनायक जगताप, रामकृष्ण बोगा, उमेश मच्छा, नागेश चन्ना, श्रीनिवास मंथेन, अंबादास गुज्जा, मार्कंडेय गुत्तीकोंडा, गणेश भंडारी, सोमनाथ गोयल, श्रीनिवास यन्नम उपस्थित होते.

# गरज विकृत मनोवृत्तीच्या विसर्जनाची

**पवित्र श्रावणानंतर सुरू झालेल्या भाद्रपदातील गणेशोत्सवाने सध्या सर्वत्र जल्लोष आहे. महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सवास 'राज्य उत्सव' केल्याने यंदाचा उत्सव 'दुधात साखर' असाच आहे. घराघरातील हा उत्सव ज्यावेळी सार्वजनिक झाला त्यावेळी लोकमान्य टिळकांनी एक उदात्त हेतू समोर ठेवला होता. तो हेतू कालपरत्वे उत्सवात होणाऱ्या बदलामुळे कुठेतरी मागे पडतोय अशी स्थिती आहे. तो हेतू आपल्याला पुन्हा साध्य करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करावे लागणार आहेत. त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने सक्रिय होत आपापला योग्य सहभाग देण्याची गरज आहे. गणेशोत्सवाला काही अपवाद वगळता आलेले विकृत स्वरूप बदलण्यासाठी समाजातील विकृत मानसिकता बदलणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे यंदाच्या गणेश विसर्जनावेळी फक्त मूर्तीचे नाही तर विकृत मनोवृत्तीचे विसर्जन करणे ही काळाची गरज आहे.**

श्रावणात महिनाभर गावोगावी शिवमंदीरातून रूद्रपाठ, शिवपूजन, शिवामूठ अर्पण, भजन किर्तनादि विविध धार्मीक कार्यक्रमांची रेलचेल होती. नागपंचमी, मंगळागौरी, रक्षाबंधन, जन्माष्टमी, दहिहंडी, बैलपोळा अशा सणांची रेलचेल होती. यंदा दहिहंडीच्या कार्यक्रमाने शहर व जिल्ह्यातील काही गावात कहरच झाला. पंढरपूर येथे दहिहंडी कार्यक्रमावेळी तेथील कर्णकर्कश्श आवाजामुळे एकाचा मृत्यू झाल्याचे समोर आले. सोलापूरातही विविध मंडळांकडून दहिहंडी करताना लावलेल्या मोठ्या आवाजातील गाण्यांनी अनेकांच्या कानाचे पडदे फाटले. यास कार्यक्रमातून धडा घेत सोलापूरात उत्सवातील आवाजाबाबत आवाज उठण्यास सुरूवात झाली. त्याचा परिणाम होऊन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी याबाबत अध्यादेश काढून डीजे व लेजर लाईट बंदी जाहीर केली. त्यामुळे गणेश विसर्जन मिरवणूका पारंपारिक वाद्यांसह निघणार हे चांगले झाले. यापुढील काळातही सर्व मिरवणूकांसाठी हा नियम राहावा हिच अपेक्षा.

यंदाचा गणेशोत्सव राज्य उत्सव घोषीत झाला असला तरी तो पूर्वीपासूनच लोकोत्सव आहे. सर्व समाजातील लोक यानिमित्ताने दहा दिवस एकाच देवाची एकत्रित पूजा करतात हे त्याचे वैशिष्ट्य आहे. उत्सवातून लोकोपयोगी उपक्रम राबवत एकमेकांना मदतीचा हात देण्याचे कामही केले जाते. यंदा शासनाचे विविध विभागही या उत्सवानिमित्त विविध उपक्रम राबवताना दिसत आहेत. त्यानिमित्ताने शासनाच्या दुर्लक्षित योजना सामान्यापर्यंत पोचण्याचा 'श्रीगणेशा' यानिमित्ताने झाला आहे. राज्यातील भजनी मंडळांना अनुदान वाटप करण्यासाठी एक पाऊल टाकले गेले आहे. ही एक चांगली सुरूवात आहे. आता त्यात पुन्हा घोटाळा होणार नाही याची मात्र खात्री देणे कठीण आहे. यंदा सरकारी खात्याकडून या उत्सवानिमित्त काही उपक्रम सुरू केले गेले असले तरी सार्वजनिक मंडळांकडून यापूर्वीच असे उपक्रम राबवले जात आहेत. ज्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू झाला तो उद्देश पूर्ण करण्याचे काम काही सार्वजनिक मंडळाकडून आजही केले जाते हे अभिमानास्पद आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची प्रेरणा सोलापूरातून श्रध्दानंद समाज अजोबा गणपती मंडळाकडून घेतल्याचे सांगितले जाते. समाजोपयोगी उपक्रमांचा हा वसा अनेक मंडळांकडून आजही सांभाळला जात आहे. परंतू कालपरत्वे या उत्सवाचे स्वरूप बदलत गेले अन् काही प्रमाणात त्यामध्ये विकृतीचा शिरकाव झाला. पारंपारिक उत्सवाने आधुनिकतेच्या नावाखाली



**धर्म-संस्कृती**
**श्याम जोशी**
**मो.7447788349**

भलतेच रूप धारण केले. समाजातील अनेकांनी पुढे येत 'हे नको' असे सांगायला सुरूवात केली. त्याचा परिणाम होऊन सोलापूरात मिरवणूकीसंदर्भात कडक कायद्यांची अमंलबजावणी करण्याचे ठरले हे एक चांगले पाऊल पडले आहे. त्याचे सर्व सत्रातून स्वागतच होत आहे. गणेशोत्सवातील गणपती प्रतिष्ठापनेनंतर घरोघरी गौराईचे आगमन झाले. त्यामध्ये महिलांसह घरातील सर्वांच्याच सहभागाने विविध देखावे, आरास यातून सामाजीक संदेश दिला गेला. गौरी गणपती उत्सवामुळे बाजारात तेजी होती. मोठी आर्थिक उलाढाल यानिमित्ताने झाली. आता गणेश विसर्जनानंतर पितृपंधरवडा आहे. त्यानिमित्ताने घरोघरी आपापल्या पूर्वजांबद्दल आदर व्यक्त होईल. सर्वपित्री आमावस्येनंतर नवरात्रोत्सव आहे. त्यानिमित्त सोलापुरात घरोघरी स्वच्छता मोहीम मोठ्या प्रमाणात राबवली जाते. दरवर्षी या मोहिमेवेळी कपडे धुण्यासाठी तलावात, विहिरीत, नदीत कोणाचा तरी बळी गेल्याचे घडतेच. याबाबत काळजी घेतली तर आपण ते टाळू शकतो. प्रशासनानेही या काळात वेळेत पाणीपुरवठा केल्यास स्वच्छता मोहिमेला साथ मिळणार आहे. यंदा पाऊसही चांगला झाल्याने पाणीपुरवठा सोपा जाईल असे वाटते. सध्याचा गणेशोत्सव अंतिम टप्प्यात आहे. विविध मंडळांचे देखावे बघण्यासाठी लोकांची गर्दी होत आहे. शनिवारी ६ सप्टेंबरला गणेश विसर्जन आहे. त्यादिवशी मिरवणूकांद्वारे लाडक्या गणरायाला पुढच्या वर्षी लवकर या.. च्या गजरात निरोप दिला जाणार आहे. अकरा दिवसांच्या उत्सवाची सांगता होणार आहे. प्रत्येकाने यंदा बाप्पांकडे तुझे विसर्जन होताना आमच्यातील विकृतींचे विसर्जन होऊ दे अशी मागणी करून या. समाजातील विकृत मनोवृत्तीचे विसर्जन होण्याची खरी गरज आहे.



# बाळे परिसरात ड्रेनेजलाईनची कामे चुकीच्या पद्धतीने

### आनंद चंदनशिवे यांची तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर -**

बाळे हद्दवाढ भागातील विविध ठिकाणी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत ड्रेनेजलाईनचे काम मक्तेदाराकडून चुकीच्या पद्धतीने होत आहे, अशी तक्रार राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी गणेश पुजारी,अमोल साबळे, किशोर कटके ,विजयकुमार राजगुरू, सत्यम काटकर, शंकर गायकवाड, हर्षल शिंदे, आकाश कळसे, महेश गवळी, किशोर खडके, सुरेश पाटील सुरज पाटील, महानंदा शिंदे शितल साबळे, मनीषा भोसले संगीता सौदागर, मुद्रिका बाईस कवठे, रुक्मिणी चंदनशिवे, शांताबाई भुई, शीला गायकवाड आदी उपस्थित होते.

प्रभाग क्रमांक ५ मधील बाळे हद्दवाढ भागामध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तर योजनेअंतर्गत मेंगाने नगर, ठोकळ नगर, साईनगर, पद्मावती नगर, शिवाजीनगर, संतोष नगर,गणेश गौरी नगर, जय मल्हार नगर या भागामध्ये मुख्य व अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकण्यासंदर्भात चंदनशिवे व माजी नगरसेवक गणेश पुजारी यांनी मागणी केली होती. यानुसार महापालिकेकडून हे काम हाती घेण्यात आले आहे. या योजनेचा मक्ता लक्ष्मी इंजीनियरिंग प्रायव्हेट लिमिटेडला देण्यात आले आहे. मक्तेदाराकडून विविध ठिकाणी काम सुरू झाले असून काही ठिकाणी फक्त मुख्य रस्त्यावर ड्रेनेज टाकण्याचे काम होत आहे. बऱ्याच ठिकाणी अंतर्गत नागरी वसाहतीमध्ये ड्रेनेजलाईन टाकण्याबाबत मक्तेदार टाळाटाळ करीत आहेत तसेच बऱ्याच ठिकाणी खडकाळ जमीन असल्याने खोदकाम करण्यास चालढकल करीत आहे. बाळे हद्दवाढ भागातील महाराष्ट्र सुवर्ण जयंती योजनेअंतर्गत सुरू असलेल्या ड्रेनेजलाईन कामाची चौकशी करून वरील सर्व ठिकाणी मुख्य व अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकण्यात यावी. हे काम उत्तम दर्जाचे होण्यासंदर्भात मक्तेदाराला सूचना द्याव्यात तसेच चुकीचे काम केल्याप्रकरणी मक्तेदारावर कारवाई करावी अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

# प्रा. डॉ. ननवरे लिखित तीन पुस्तकांचे उद्या प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

येथील प्रा. डॉ. दीपक ननवरे लिखित आउटकम-बेस्ड एज्युकेशन मेड सिंपल, एक्सलन्स इन हायर एज्युकेशन आणि फीडबॅक अँड इन्स्टिट्यूशनल ग्रोथ इन हायर एज्युकेशन या तीन इंग्रजी पुस्तकांचे प्रकाशन शुक्रवार, दि. ५ सप्टेंबर रोजी हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या सभागृहात संध्याकाळी ५ वाजता होणार आहे, अशी माहिती संयोजक तथा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



२१व्या शतकात जगभरात होत असलेल्या वेगवान बदलांना सक्षमपणे सामोरे जाताना, कौशल्याधारित आणि ज्ञानकेंद्रित पिढी घडविण्यासाठी नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू झाले आहे. या धोरणाला अनुसरून प्रा. डॉ. दीपक ननवरे यांनी ही तीन पुस्तके लिहिली आहेत.

पुस्तक प्रकाशन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० सुकाणू समितीचे अध्यक्ष तथा सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी मा. प्रा. डॉ. प्रकाश महानवर (कुलगुरू, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ) भूषविणार असून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा व दयानंद शिक्षण संस्थेचे माजी प्राचार्य डॉ. विजयकुमार उबाळे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या पत्रकार परिषदेस प्रा. डॉ. दीपक ननवरे, डॉ. शिल्पा ननावरे, डॉ. पार्थ ननवरे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### माजी आमदार बबनदादा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त विधवा महिलांसाठी रक्षाबंधन

**टेंभुर्णी, दि. ३ सप्टेंबर-**

मिटकलवाडी येथे माजी आमदार बबनदादा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त जीवनाआधार फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष किशोर सलगर यांच्याकडून विधवा महिलांसाठी भेट म्हणून साडी चोळी व मिठाई वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. लक्ष्मण आसबे यांची उपस्थिती होती. याचबरोबर अमेरिकेमध्ये बबनदादा यांच्यावर यशस्वी हृदय शस्त्रक्रिया करणारे डॉक्टर अमित पावले यांचे माता पिता डॉक्टर औदुंबर पावले व हेमलता पावले यांना जीवनगौरव पुरस्कार माढा तालुक्याचे सभापती विक्रमसिंह शिंदे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरवण्यात आले. प्रास्ताविक किशोर सलगर यांनी केले. यावेळी बंडू ढवळे, शिवाजी कांबळे, समाधान सलगर, विष्णुपंत हुंबे, सचिन होदाडे यांनी मनोगते व्यक्त केले. यावेळी विविध क्षेत्रांमध्ये चांगले कार्य केलेल्या व्यक्ती व संस्था यांनाही आदर्श पुरस्कार देण्यात आले. यामध्ये सांगा आदर्श माता पिता रामचंद्र लिंबाजी लोकरे व सीताबाई लोकरे यांना आदर्श कुटुंब पुरस्कार अरुण गोरख सुरवसे उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार मारुती जगन्नाथ सुरवसे यांना प्रगतिशील बागायतदार पुरस्कार लक्ष्मण यशवंत ठेंगल, पालकरत्न पुरस्कार श्रीपती पांडुरंग मिटकल, आदर्श युवा उद्योजक सोमनाथ रत्नाकर निर्धार, आदर्श वाचक पुरस्कार अशा मोहन ठेंगल प्रधान असे पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कारखान्याचे संचालक विष्णुपंत हुंबे, माढा तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन बंडू ढवळे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती शिवाजी कांबळे, परमेश्वर खरात, सचिन होदाडे, सोमनाथ तांबे, सुरेश लोंढे, सोमनाथ हुलगे, बंकट काळे, मुकुंद शेठ, यश कोठारी, यश गांधी, गणेश गायकवाड, रामभाऊ टकले, बळीराम टाकले, धनाजी जवळगे, हिमंत सोलंकर, काकासाहेब पाटील, कांतीलाल काळे, अशोक मिस्किन, हनुमंत चव्हाण, अरुण लोकरे, डॉ. पायल चौधरी, बाळासाहेब पवार, डॉ. प्रवीण लोंढे, राजा खटके उपस्थित होते.




### बालरंगभूमी परिषदेच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

येथील बालरंगभूमी परिषद शाखा सोलापूर यांच्या वतीने जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय सोलापूर व सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभाग यांच्या संयुक्त समन्वयातून एक दिवसीय मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशाला येथे करण्यात आले होते. याचे उदघाटन माजी आमदार प्रकाश यलगुलवार यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून संपन्न झाले. शिबिरामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील डॉ.रश्मी राजनाळ व डॉ. विजय चौगुले यांच्या पथकांनी गरजू व सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या तब्येतीची मोफत तपासणी करून औषध उपचार करण्यात आले. यावेळी उपस्थित नागरिकांनी अशा प्रकारचे शिबिर नियमितपणे आयोजित करण्यात यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. या शिबिरात गरीब आणि गरजू नागरिकांची तसेच बालकलाकारांची ब्लड प्रेशर (रक्तदाब), मधुमेह, नेत्र आणि रक्त तपासणी मोफत करण्यात आली. या कार्यक्रमास माजी महापौर संजय हेमगडडी, आरिफ शेख, विद्यानंद स्वामी, शशिभूषण यलगुलवार, बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार, कार्याध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, नियामक मंडळ सदस्य सुमित फुलमामडी, उपाध्यक्ष गोवर्धन कमटम, खंडू शिंदे, प्रमुख कार्यवाह अर्चना अडसूळ, सहकार्यवाह संजय सावंत, डॉ. किशोर देशपांडे, शांता येळमकर, प्रा.ज्योतिबा काटे, किरण फडके आदी मान्यवर उपस्थित होते.

### रस्त्याच्या कारणावरून वृद्धास हायड्रोलिक पाईपने मारहाण; चौघाविरूद्ध गुन्हा

**मंगळवेढा, दि.३ सप्टेंबर-**

शेजारील शेत घेतल्याचे मनात राग धरून शेताकडे जाण्या येण्यासाठीचा रस्ता आडवून हायड्रोलिक पाईपने एका ६५ वर्षीय वृद्धास डोक्यात मारून गंभीर जखमी केल्याप्रकरणी शोभा नंदकुमार दोडगे, कमल सोपान दोडगे, समाधान सोपान दोडगे, नंदकुमार सोपान दोडगे (रा.जालिहाळ) या चौघाविरूद्ध मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी सोमलिंग शिवगोंडा पाटील वय ६५, रा.जालिहाळ हे दि.१ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता जालिहाळ गावी असलेल्या शेताकडे जात असताना शेतातून जाण्या -येण्यासाठी वाट दिली नाही तसेच फिर्यादी आरोपीच्या शेताच्या शेजारी असणारे दोन एकर शेत बाबू दोडगे व राजू चौंडे यांची जमीन विकत घेतली होती. याचा राग मनात धरून आरोपीनी फिर्यादीस शिवीगाळ करून तुला जिवंत सोडत नाही असे म्हणून ठार मारण्याच्या उद्देशाने हायड्रोलिक पाईपने फिर्यादीच्या डोक्यात मारून गंभीर जखमी केले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत सोमलिंग पाटील यांनी म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलिस निरीक्षक लातूरकर हे करीत आहेत. शोभा नंदू दोडगे, कमल सोपान दोडगे, नंदू सोपान दोडगे या तिघा आरोपीना पोलिसांनी अटक केली आहे.

### कथामालेतर्फे विद्यार्थिनींना मदत व मान्यवरांचा सत्कार

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

अ.भा.साने गुरुजी कथामाला जिल्हा समितीच्या वतीने दहावीच्या गरजू व हुशार विद्यार्थिनींना प्रत्येकी एक हजार रुपये शैक्षणिक मदत,प्रतिवर्षी देण्यात येते. विविध शाळांमधून निवड केलेल्या दहा विद्यार्थिनींना,ही शैक्षणिक मदत दिली जाते. त्याचप्रमाणे या वर्षी विद्यावाचस्पती पदवी प्राप्त डॉ.रामचंद्र धर्मसाले त्यांचे मार्गदर्शक. प्रा.डॉ.तानाजी देशमुख, अन्य संस्थांकडून पुरस्कार प्राप्त आरती काळे व प्रा.गणेश लेंगरे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुनील पुजारी, उज्ज्वला साळुंके,प्रा.गंगाधर धोंगडे, फैय्याज शेख आणि कल्पना म्हमाणे यांनाही सन्मानित करण्यात येणार आहे. ज्येष्ठ समाजसेवक निवृत्ती होनप्पा गायकवाड (स्वकुळ साळी) यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख अतिथी ज्येष्ठ कविवर्य माधव पवार यांच्या प्रेरक उपस्थितीत हा कार्यक्रम रवि. दि.७ सप्टेंबर रोजी दुपारी एक वाजता रंगभवन चौकातील समाज कल्याण केंद्रसोलापूर येथे संपन्न होईल. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष अशोक खानापुरे यांनी केले आहे.


# जिल्ह्यात साडेअकरा हजार युवकांना प्रशिक्षण

## कौशल्य विकासाच्या माध्यमातून रोजगार निर्मितीला गती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

कौशल्य विकासाच्या विविध रोजगार व उद्योजकता योजनांद्वारे जिल्ह्यात ११ हजार ५८० उमेदवारांना मागील एक वर्षात कृषी, आरोग्य, हरित ऊर्जा, गारमेंट, बँकिंग या क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणामुळे युवकांना आधुनिक तंत्रज्ञान, व्यावसायिक शिस्त आणि उद्योग क्षेत्रातील गरजांनुसार कौशल्य प्राप्त झाले आहे.

जिल्ह्यातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त प्रयत्नातून विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनांमुळे जिल्ह्यातील हजारो युवकांना प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि रोजगाराच्या संधी प्राप्त झाल्या आहेत. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये ३ हजार १८५ उमेदवारांनी प्रशिक्षणासाठी सहभाग घेतला. ही योजना युवकांना प्रत्यक्ष कार्यानुभव मिळवून देण्यासाठी उपयुक्त ठरली असून, त्यांच्या व्यावसायिक कौशल्यात लक्षणीय वाढ झाली आहे. याशिवाय, विभागामार्फत ७ हजार ००३ बेरोजगारांना विविध औद्योगिक, बँकिंग, टेक्सटाईल, अ‍ॅग्रो फूड क्षेत्रातील उद्योजकांमार्फत रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. ही आकडेवारी कौशल्य विकासाच्या योजनांची परिणाम कारकता अधोरेखित करते. वर्ष २०२४-२५ मध्ये विभागामार्फत ६ रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यांमध्ये ७३ उद्योजक उपस्थित होते आणि ७ हजार ४१० रिक्त पदांची अधिसूचना देण्यात आली. एकूण २ हजार ०७० उमेदवारांनी सहभाग घेतला असून, त्यापैकी ८०२ उमेदवारांची प्राथमिक स्वरूपात निवड करण्यात आली. रोजगार मेळावे हे युवकांना थेट उद्योजकांशी संपर्क साधण्याचे व्यासपीठ उपलब्ध करून देतात, जे त्यांच्या करिअरच्या प्रारंभासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहेत. जिल्ह्यात कौशल्य विकासाच्या योजनांमुळे युवकांमध्ये स्वावलंबनाची भावना निर्माण झाली असून,



रोजगार निर्मितीच्या दिशेने ठोस पावले उचलली गेली आहेत. प्रशासन, प्रशिक्षण संस्था आणि उद्योजक यांच्यातील समन्वयातून या योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होत आहे.

# माळशिरस तालुक्यातून ५३ जण तडीपार

### पोलीसांकडून डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईटला प्रतिबंध

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.३ सप्टेंबर-**

गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद शांततेत पार पाडण्याकरिता व उत्सव काळात ५३ जणांस माळशिरस तालुक्यात न राहण्याचे व प्रवेश न करण्याचे आदेश दिले आहेत.

माळशिरसचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्याकडे याबाबत प्रस्ताव पाठवले होते. त्यानुसार संबंधितांना पोलीसांकडून आदेश बजावण्यात आला आहे. सद्यस्थितीत गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद असे सण साजरे होत आहेत. सदर उत्सवाच्या कार्यक्रमात लोकांची गर्दी होणार असून गावात सण साजरे करण्याच्या कारणावरून वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीतील समाजकंटक लोकांवर गुन्हे दाखल असूनही अवैध दारू विक्री करणे, अवैध मटका घेणे, गर्दीत मारामारी करणे असे सवयीचे झाले आहेत. वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीतील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, गणेशोत्सव मिरवणुकीमध्ये डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईट शो वापर करण्यास प्रतिबंधित अधिसूचना काढली आहे. गणेशोत्सव मिरवणूक काळात सर्व गणेश मंडळांनी नो डीजे नो डॉल्बी संकल्पना राबवून पारंपारिक वाद्याचा वापर करावा. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज संतोष वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी पोलीस अंमलदार यांनी केली आहे.



# शाळा ज्ञानार्जनासह चारित्र्य निर्माणाचे केंद्र

### प्राचार्या रेखा गाडेकर : हमारा विद्यालय-हमारा स्वाभिमान' हा संस्कारक्षम उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.३ सप्टेंबर-**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे शळा हे सामूहिक केंद्र आहे. येथे स्वच्छता, शिस्तबद्धता अनुशासन, राष्ट्रभक्ती, सामाजिक समरसता व नागरी कर्तव्यांचे पालन शिकवले जाते. त्यामुळे शाळ केवळ ज्ञानार्जनाचे नाही तर राष्ट्रीय चारित्र्य निर्माण करण्याचे केंद्र असल्याचे प्राचार्या रेखा गाडेकर यांनी केले.

येथील ट्विंकल स्टार इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज येथे अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्यावतीने गटशिक्षणाधिकारी विकास यादव व केंद्रप्रमुख संतोष वरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली 'हमारा विद्यालय-हमारा स्वाभिमान' हा संस्कारक्षम उपक्रम राबविण्यात आला. त्यावेळी प्राचार्या गाडेकर बोलत होत्या. यावेळी स्वप्नाली भोसले यांनीही मनोगत मांडले. यावेळी यशोदा गाडेकर, संस्थापक हरिचंद्र गाडेकर, सचिवा अर्चना गाडेकर, प्राचार्य रेखा गाडेकर, मनीषा सोनवणे, स्वप्नाली भोसले, पालक प्रतिनिधी सुनिता शिंदे उपस्थित होते.

# रब्बी हंगामासाठी पीक प्रात्यक्षिक

### शेतकरी गटांनी करावेत अर्ज

### कृषी विभागाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान अंतर्गत अन्नधान्य, वाणिज्यिक पीके आणि राष्ट्रीय खाद्यतेल अभियान अंतर्गत तेलबिया पिकांसाठी रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये पीक प्रात्यक्षिक कार्यक्रम राबविण्यात येणार असून, शेतकरी गटांनी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा कृषी अधिक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

गहू, कडधान्य, पौष्टिक तृणधान्य, ऊस, करडई, मोहरी व सूर्यफूल या पिकांच्या उत्पादकतेसाठी आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी गटांनी या योजनेंतर्गत अर्ज करून लाभ घ्यावा. सदर प्रात्यक्षिकांसाठी दि.



३१ मार्च २०२४ पूर्वी शासकीय यंत्रणेकडे नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी व कृषी क्षेत्रातील सहकारी संस्था पात्र आहेत. प्राधिकृत सदस्याने महाडीबीटी पोर्टलवर अर्ज सादर करावा. अर्ज सादरीकरणाची सुविधा दि. २ सप्टेंबर २०२५ पासून उपलब्ध असून, प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर गटांची निवड होणार आहे. अर्ज करताना https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/griLogin/grilogin या संकेतस्थळावर बियाणे वितरण, प्रात्यक्षिक, फ्लेक्सी घटक, औषधे आणि खते या टाईल अंतर्गत अर्ज करता येतील. अर्जदार गट सदस्यांचा Farmer ID असणे

# शाहीर अमर शेख पुरस्कारांसाठी साहित्य पाठवण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ सप्टेंबर-**

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा बार्शी यांच्यावतीने प्रतिवर्षी महाराष्ट्रातील साहित्यिकांना साहित्य पुरस्कार दिले जातात. हे पुरस्कार शाहीर अमर शेख यांच्या नावाने दिले जातात. यासाठी राज्यभरातून साहित्यकृती मागवल्या जातात. गद्य प्रकारातील दोन आणि पद्य प्रकारातील दोन असे चार पुरस्कार दिले जातात.

रोख रक्कम, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल असे पुरस्काराचे स्वरुप असते. साहित्यिकांनी पुढील नियमांचे पालन करुन आपले प्रकाशित साहित्य दोन प्रतीत पाठवावे, असे आवाहन म. सा.प. शाखा बार्शीचे अध्यक्ष पां. न. निपाणीकर यांनी केले आहे. नियम व अटी- दि. १ जानेवारी २०२४ ते ३० जून २०२५ या कालावधीत प्रकाशित झालेले गद्य, पद्य पुस्तके पुरस्कारासाठी गृहीत धरले जातील. साहित्यिकांनी आपल्या पुस्तकाच्या दोन प्रती पाठवाव्यात. सोबत आपले पूर्ण नाव ,पत्ता, मोबाईल नंबर, फोटो, मिळालेले पुरस्कार इत्यादी माहिती स्वतंत्र कागदावर पाठवावी. आपल्या साहित्यकृती दि. २५ सप्टेंबर पर्यंत पोहोचतील अशा बेताने प्रकाश गव्हाणे (कार्यवाह म.सा.प. बार्शी) ईश्वरी अभ्यासिका, पाटील प्लॉट, शिवाजीनगर, बार्शी-४१३४११ जि. सोलापूर. या पत्त्यावर पाठवाव्यात अधिक माहितीसाठी ७४९९८३४३९३ या क्रमांकावर संपर्क करावा. पुरस्कार वितरण समारंभ नोव्हेंबर २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात पार पडेल.

साहित्यिकांनी साहित्य पाठवण्याचे आवाहन कार्याध्यक्ष डॉ.रविराज फुरडे, कोषाध्यक्ष बी.आर. देशमुख, सहकार्यवाह प्रकाश महामुनी, दिलीप कल्याणी, प्रा.कल्याण घळके,आबासाहेब घावटे, रामचंद्र इकारे यांनी केले.

# संपूर्ण जगामध्ये एलआयसीची विश्वासार्हता

### पोलीस उपअधीक्षक वाळके यांचे प्रतिपादन

### अकलूजमध्ये एलआयसीचा वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि. ३ सप्टेंबर-**

एलआयसीही भारत सरकारची एकमेव सरकारी विमा कंपनी असून देशाच्या विकासामध्ये भारतीय आयुर्विमा महामंडळाचा सिहांचा वाटा आहे. त्यामुळेच संपूर्ण जगात एलआयसीची मोठी ख्याती व विश्वासार्हता आहे. प्रत्येकाने विमा पालिसी करने ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन पोलीस उपअधिक्षक संतोष वाळके यांनी व्यक्त केले.

अकलूजमध्ये एलआयसीच्या ६९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजीत करण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी अकलूज विभागाचे पोलीस उपअधिक्षक संतोष वाळके बोलत होते. प्रारंभी श्रीगणेश प्रतिमा पूजन, दिपप्रज्वलनाने व एलआयसी निगम गीताने कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. यावेळी आयडीबीआय बकेचे ब्रंच मनेजर राकेशकुमार अगस्ती, प्रशासकीय अधिकारी संजय खंदारकर, विकास अधिकारी शंशिकांत निकम, अमोल काळे, संदेश मोहिते तसेच क्लीया अधिकारी मोहनराव लोंढे, शंकरराव बागडे, धनंजय शिंदे-पाटील,



विमाप्रतिनिधी संघटनेचे अध्यक्ष रामचंद्र आसबे तसेच तालुक्यातील सर्व विमा प्रतिनिधी व पालिसीधारक यावेळी उपस्थित होते. प्रारंभी अकलूज ब्रँचचे शाखाधिकारी विजय अनोकार यांनी सगळ्यांचे स्वागत करुन शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन अमोल काळे यांनी केले. तसेच यावेळी अकलूज शाखा व विमाप्रतिनिधी संघटनेच्या वतीने भव्यरक्तदान शिबीर आयोजीत करण्यात आले होते. यामध्ये एलआयसीचे अधिकारी, विमाप्रतिनिधी, पालिसीधारकांसह ७१ जणांनी आपले पवित्र रक्तदान करुन सहभाग घेतला. सर्व रक्तदात्यांना सोलापूर येथील अक्षय ब्लड बँकेच्या वतीने योग्य सुविधा पुरवण्यात आले होते. त्यांना प्रशस्तीपत्रक देवून सन्मानीत करण्यात आले.

# कामाच्या स्वरूपावरून कामगारांचे मोजमाप करू नये : तानाजी माने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ सप्टेंबर-**

कामाचे स्वरूप, शिक्षण, वेतन या गोष्टीवरून कामगार प्रतिष्ठा व दर्जा यांचे मोजमाप करू नये. तर गुणवत्ता, प्रामाणिक पणा आणि सेवाभाव विचारात घेऊन कामगारांचा मानसन्मान जपला पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक महामंडळाचे अध्यक्ष तानाजी माने यांनी भारतीय आझाद कामगार महासंघ यांच्या वतीने हॉटेल शिव पार्वती, सोलापूर येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय विविध कामगार नेत्यांच्या प्रशिक्षण शिबिराचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केले.



प्रशिक्षण शिबिराच्या अध्यक्षस्थानी भारतीय आझाद कामगार महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष चंद्रहंस गंभीर हे होते. या प्रशिक्षण चर्चासत्रात परिवहन, सहकार, कृषी, शिक्षण, अंगणवाडी, बालवाडी, घरेलू महिला कामगार, सार्वजनिक क्षेत्रातील कामगार प्रतिनिधी सहभागी झाले होते. महाराष्ट्र आझाद कामगार महा संघांचे महासचिव. बी. आर. देशमुख यांनी या शिबिराचे नियोजन केले होते. प्रशिक्षण शिबिरात आदर्श मुख्याध्यापक नंदाजी सरदार कदम, समुपदेशक. नाना साहेब साठे व गौतमी भालशंकर यांची प्रमुख उपस्तिथी होती. या राजस्तरीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन प्रा. सुधाकर शिंदे यांनी उत्तम केले. सोलापूर ते मुंबई पायी प्रवास करून ऑटो रिक्षा युनियन नेते तानाजी मसलकर यांनी परिवहन मंत्र्यांना भेटून ऑटो रिक्षा चालक कल्याणकारी मंडळाबाबत केलेल्या पयत्नाबद्दल सत्कार करण्यात आला. बोसालिया (यूरोप) मध्ये वैद्यकीय शिक्षण घेणारे युवक राजवर्धन पाटील यांनी यूरोप मधील कामगार जीवनाची माहिती भाषणामधून सांगितली.

# जिल्ह्यात एम-सॅन्ड धोरणाची प्रभावी अंमलबजावणी

### अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर

### अर्जदारांनी महाखनिज प्रणालीवर अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

एम-सॅन्ड युनिट स्थापन करण्यासाठी अर्जदारांनी महाखनिज प्रणालीवर अर्ज दाखल करणे आवश्यक असून, त्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे Consent to Establish d Consent to Operate प्रमाणपत्र, नियोजन प्राधिकरणाची नाहरकत, अकृषिक परवानगी, जिल्हा उद्योग केंद्राची नोंदणी इत्यादी कागदपत्रांची पूर्तता अनिवार्य आहे, अशी माहिती अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांनी दिली.

शासनाच्या एम-सॅन्ड (Manufactured Sand) धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधित विभागांची बैठक घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा खनिकर्म अधिकारी नीलिमा जाधव, सार्वजनिक बांधकाम विभाग, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जिल्हा परिषद, नगर रचना विभाग, भुजल विकास यंत्रणा, महावितरण, प्रदूषण नियंत्रण मंडळ, भूमि अभिलेख विभाग यांसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांनी नैसर्गिक वाळूची मर्यादित उपलब्धता आणि पर्यावरणपूरक मानकांमुळे निर्माण झालेल्या अडचणींचा उल्लेख करत, विकासकामांसाठी एम-सॅन्ड ही योग्य पर्यायी सामग्री असल्याचे स्पष्ट केले. शासनाने दि. २३ मे व १७ जुलै २०२५ रोजीच्या निर्णयांद्वारे याबाबत धोरण निश्चित केले आहे.

एम-सॅन्ड युनिट स्थापन करण्यासाठी अर्जदारांनी महाखनिज प्रणालीवर अर्ज दाखल करणे आवश्यक असून, त्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे Consent to Establish d Consent to Operate प्रमाणपत्र, नियोजन प्राधिकरणाची नाहरकत, अकृषिक परवानगी, जिल्हा उद्योग केंद्राची नोंदणी आदी कागदपत्रे आवश्यक असल्याचे ठाकूर यांनी यावेळी स्पष्ट केले.

### आजअखेर ५१ अर्जदारांचे अर्ज दाखल

आजअखेर जिल्ह्यातील ५१ अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज दाखल केले असून, संबंधित विभागांनी तातडीने नाहरकत अहवाल व आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्याच्या सूचना अपर जिल्हाधिकारी ठाकूर यांनी दिल्या. अर्जदारांना विभागीय कार्यवाहीची माहिती देण्यासाठी पुढील १५ दिवसांत एकत्र कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे.

### उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक पुरस्कार; ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करा

**सोलापूर, दि. ३ सप्टेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार तसेच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांच्या नावाने डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार देण्यात येतात.

राज्यातील शहरी व ग्रामीण विभागातील अ, ब, क व ड वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे रु.१ लक्ष, रु.७५ हजार, रु.५० हजार , रु. २५ हजार इ. रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येते. सन २०२४-२५ या वर्षाच्या पुरस्कारासाठी इच्छुक असणारी ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक (ग्रंथमित्र) यांनी आपले विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह दि. ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत तीन प्रतीत आपल्या जिल्हयातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांकडे पाठवावेत असे आवाहन अशोक गाडेकर, प्र. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सेट परीक्षेत प्रा. अमोल बंडगर यांचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ३ सप्टेंबर-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील चंद्रशेखर विद्यालय व नारायण काका आगाशे कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. अमोल बंडगर यांनी लाईफ सायन्स (Life Science) या विषयात राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (SET) यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे. त्यांच्या या यशामुळे आबासाहेब देशमुख चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रामदास देशमुख, उपाध्यक्षा शुभांगी देशमुख, प्रा. पांडुरंग बनसोडे, सर्व शिक्षक, विद्यार्थी व मित्रमंडळींकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.



प्रा. बंडगर यांनी हे यश मिळवताना लहानपणापासून आई वडिलांची शिक्षणाबाबत असणारी गोडी व त्यानंतर शिक्षणाचे महत्व ओळखून मी नित्य नियमित अभ्यास करत गेलो आज या गोष्टीचे उत्तम फळ मला मिळाले. यात अर्थातच गुरुजनांचा सहभाग ही तितकाच महत्त्वाचा आहे असे सांगून या यशामुळे मला पुढील शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रवासासाठी नवे दालन खुले असून शैक्षणिक क्षेत्रात अधिक जोमाने कार्य करणेची प्रेरणा मिळाली असल्याचे सांगितले.



## महत्त्वाचे



### करमाळ्याच्या अनिकेत मेनकुदळे ची एनआयटीसाठी निवड

**करमाळा, दि.३ सप्टेंबर-**

वांगी (ता.करमाळा) येथील अनिकेत दीपक मेनकुदळे याने जेईई मेन परीक्षेत अखिल भारतीय पातळीवर ५७९४ वी रँक मिळवली आहे. त्याचे दहावीपर्यंत शिक्षण सैनिक स्कूल चंद्रपूर येथे झाले. अकरावी बारावी राजस्थान कोटा येथे केले. बारावी परीक्षा सीबीएससी मध्ये ८८.५० टक्के गुण मिळवले. त्याने जेई मेन्समध्ये १४ लाख विद्यार्थी बसले होते. त्यामध्ये त्याने ५७९४ रँक मिळवली. त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. पुढील शिक्षणासाठी त्याला NIT रायपुर (छत्तीसगड) C.S.E शाखेसाठी प्रवेश मिळाला आहे.परिसरातून अनिकेतच्या या यशाबद्दल कौतुक होत आहे.

### चोपडी येथील आशा बाबर यांचे सेट परीक्षेत यश

**सांगोला, दि.३ सप्टेंबर-**



सांगोला तालुक्यातील चोपडी येथील आशा सचिन बाबर यांनी भौतिकशास्त्र विषयातून सेट परीक्षेत मोठे यश संपादन केले आहे. त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण पंढरपूर येथे, बारावीपर्यंतचे शिक्षण सांगोला विद्यामंदिर येथे तर भौतिकशास्त्र विषयातून बी.एससीचे महाविद्यालयीन शिक्षण आटपाडी येथे पूर्ण केले. श्रीमती काशीबाई नवले कॉलेज, कमलापूर येथे बी.एडचे तसेच एम.एससीचे शिक्षण कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर येथे पूर्ण केले. शिक्षक अभियोग्यता परीक्षेतही त्या यशस्वी झाल्या आहेत. सध्या त्या आटपाडी येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करीत आहेत. या यशाबद्दल त्यांचे चोपडीसह तालुक्यातून अभिनंदन होत आहे.

### गर्दीचा फायदा घेऊन अनोळखी महिलेने केले पर्समधून ३२ हजार रूपये लंपास

**सोलापूर, दि.३ सप्टेंबर-**

शहरातील एस.टी.स्टॅन्ड परिसरात गर्दीचा फायदा घेत एका अनोळखी महिलेने प्रवाशाच्या पर्समधून तब्बल ३२ हजार रुपये चोरले आहेत.फिर्यादी सोनाली शंकर वगरे (वय-४१, रा.घोटी,ता.माढा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार,दि.२ सप्टेंबर रोजी सकाळी ११.४० च्या सुमारास त्या बसमधून उतरत असताना,अंगात चॉकलेटी डिझाईनचा पंजाबी ड्रेस घातलेल्या अनोळखी महिलेने (सोबत ३-४ वर्षांचे मूल) त्यांच्या पर्समधून ५०० रुपयांच्या ६४ नोटा,अशी एकूण ३२ हजार रुपयांची रोकड चोरली.याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी महिलेचा शोध सुरू आहे.

### ऑटो रिक्षा व मिटर्ड टॅक्सी चालकांनी कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा

**सोलापूर, दि.३ सप्टेंबर-**

शासनाच्या दि. २४ जुलै २०२४ च्या निर्णयानुसार धर्मवीर आनंद दिघेसाहेब महाराष्ट्र ऑटो/रिक्षा मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळ, मुंबई स्थापन करण्यात आले असून, सोलापूर शहर व जिल्ह्यातील ऑटो रिक्षा चालकांसाठी विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येत आहे.या योजनांमध्ये वय ६५ वर्षावरील चालकांसाठी सन्मान निधी योजना, कर्तव्यावर असताना जीवन विमा व अपंगत्व विमा, आरोग्य लाभ योजना, कामगार कौशल्य वृद्धी योजना, दुखापतीसाठी अर्थसाहाय्य, तसेच पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना यांचा समावेश आहे. सदर योजनांचा लाभ घेण्यासाठी चालकांनी मंडळाचे सभासद होणे आवश्यक असून, http://ananddighekalayankarimandal.org या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावा. सभासदत्वासाठी अर्जदाराकडे राज्य शासनाकडून नोंदणीकृत ऑटो रिक्षा किंवा मिटर्ड टॅक्सी अनुज्ञप्ती व वैध बॅच असणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे संपर्क साधावा, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## वैराग आरोग्य केंद्रच सलाईनवर

### एकच वैद्यकीय अधिकारी सेवेला । रुग्णांच्या लागतात रांगा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.३ सप्टेंबर-**

जिल्ह्यातील सर्वात मोठे आरोग्य केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वैराग प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एकाच वैद्यकीय अधिकाऱ्यावर कारभार चालू असल्यामुळे रुग्णांना चक्क तासभर रांगेत उपचारासाठी थांबावे लागत आहे. अगोदरच आरोग्य केंद्राला इमारत नसल्या मुळे ऑपरेशन थियेटरमध्ये रुग्णांवर उपचार सुरू आहेत. त्यातच एकाच वैद्यकीय अधिकाऱ्यांवर रुग्ण उपचाराचा भार पडत असल्याने दवाखानाच आजारी पडल्याचे दिसून येत आहे.



सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त बाह्य रुग्ण तपासणी वैराग प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये केली जाते . त्यामुळे या ठिकाणी दररोज सुमारे २५० ते ३०० रुग्ण तपासणी केली जाते. त्यासाठी दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांची नितांत आवश्यकता आहे. मात्र गेल्या दोन महिन्यांपासून या आरोग्य केंद्रामध्ये एकाच वैद्यकीय अधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपविण्यात आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे खेडेगावातून येथे उपचार घेण्यासाठी आलेल्या रुग्णांना उपचारासाठी रांगेमध्ये खुप वेळ थांबावे लागत आहे. सध्या वैराग मध्ये ताप ,खोकला आणि सर्दी यांची साथ सुरू आहे. त्यामुळे आरोग्य केंद्रामध्ये रुग्णांची संख्या देखील वाढली आहे. या वाढलेल्या रुग्णांमुळे एकटे असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर मोठा ताण देखील वाढला आहे. त्यातच राष्ट्रीय ग्रामीण स्वास्थ मिशन योजनेअंतर्गत सेवेमध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांनी संप पुकारल्यामुळे ते मदतीला नाहीत . परिणामी वैराग प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधून आरोग्य कर्मचाऱ्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये बोलावले जात आहे.

चक्क १७ गावांसह वैराग शहराचे आरोग्य सांभाळणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्राचा सध्या कार्यभार अवघ्या दहा लोकांवर पार पाडला जात आहे. कर्मचाऱ्यांची कमतरता त्या पाठोपाठ वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता यामुळे वैराचे प्राथमिक आरोग्य केंद्र उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या अभावी मानसिक दृष्ट्या देखील आजारी पडू लागले आहे.

गेल्या दोन महिन्यांपूर्वीच तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांना दुसरे वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याबाबतची माहिती देण्यात आली आहे . मात्र तरी देखील दुसऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपलब्धता करून देण्यात आलेली नाही . त्यामुळे या प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व रुग्णांचा भार एकाच वैद्यकीय अधिकाऱ्यावरती पडत आहे. सध्या वैराग प्राथमिक आरोग्य केंद्राला इमारत नसल्यामुळे सर्व कारभार नव्याने बांधण्यात आलेल्या ऑपरेशन थिएटर मधून सुरू आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पोस्टमार्टम देखील बंद आहे. सध्या वैराग शहरामध्ये सात पसरल्यामुळे वैरागच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये त्यासंबंधीची औषधे उपलब्ध असणे गरजेचे आहे . मात्र गेल्या चार दिवसांपासून खोकल्यावरती परिणाम कारक असलेले कफ सिरप संपलेले आहे. पॅरासिटामोल सारख्या आवश्यक असणाऱ्या गोळ्या नेहमीच कमी पडतात. जिल्हा आरोग्य प्रशासन जिल्ह्यातील ७७ प्राथमिक आरोग्य केंद्रांना औषधाचा सम ान वाटा करून वाटते. मात्र ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये रुग्ण अधिक येतात त्या प्राथमिक आरोग्य केंद्रांना औषधांचा साठा अधिक देणे गरजेचे आहे .ज्या केंद्रांमध्ये रुग्ण अधिक येतात त्यामधील वैराग एक केंद्र असून त्यांनादेखील रुग्णांच्या प्रम ाणात औषध साठा मिळणे गरजेचे आहे . मात्र तसे होताना दिसून येत नाही त्यामुळे वैराग प्राथमिक आरोग्य केंद्राला वारंवार सोलापूर सिव्हिल हॉस्पिटल आणि धाराशिव सिविल हॉस्पिटल यांच्याकडे औषधांची मागणी करावी लागते.

वैराग मध्ये दर सोमवारी आणि बुधवारी डोळ्यांचे वैद्यकीय अधिकारी येऊन तपासणी करत होते मात्र सध्या डोळे तपासण्याचे वैद्यकीय अधिकारीच उपलब्ध नसल्यामुळे दर सोमवारी होणारी तपासणी बंद करण्यात आली असून आठवड्यातून फक्त एकदाच म्हणजे बुधवारी चालू राहिली आहे.

> वैरागचे प्राथमिक आरोग्य केंद्र आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असून नेहमीच उपचारासाठी येथे जातो मात्र गेल्या दोन महिन्यांपासून आमच्यावर वेळेत कधीच उपचार होत नाहीत नेहमीच रांगेमध्ये उभा राहवे लागते त्यामुळे आणखी एका वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी.
>
> **- तात्यासाहेब पवार, रुग्ण**

> मोडकळीस आलेली इमारत, कमी जास्त होणारा औषधांचा कोठा, परिसरातील अस्वच्छता या गोष्टी आम्ही समजून घेऊ मात्र कमी कर्मचारी आणि एकच वैद्यकीय अधिकारी यामुळे होणारा त्रास समजण्यापलीकडचा आहे. यामध्ये लवकर बदल झाला नाही तर आम्हाला स्वत:मध्ये बदल करून तुमच्या मागणीसाठी आक्रमक व्हावे लागेल.
>
> **- विलास घाटे, माजी पं. स. सदस्य**

> वैराग प्राथमिक आरोग्य केंद्रातील कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकारी सेवेमध्ये रुजू झाले. मात्र त्यानंतर येथून गेले ते पुन्हा हजर झाले नाहीत. आता या जागेबाबत निर्णय घेण्याच्या जिल्हास्तरावरून हालचाली सुरू झाल्या आहेत लवकरच या ठिकाणी दुसरा वैद्यकीय अधिकारी मिळेल त्यामुळे ज्या अडचण निर्माण झाले आहेत त्यातून मार्ग निघेल-
>
> **- डॉ. अनिता बांगर, तालुका वैद्यकीय अधिकारी**

## माढा लोकसभा मतदारसंघात १३ नवीन पोस्ट ऑफिसला मंजुरी

### खा.धैर्यशील मोहिते-पाटलांच्या पाठपुरव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ सप्टेंबर-**



माढा लोकसभा मतदारसंघात तब्बल १३ नवीन पोस्ट ऑफिसेस सुरू होणार असून ग्रामीण भागातील नागरिकांसाठी ही मोठी दिलासादायक बाब ठरणार आहे. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्रीय संचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांची नवी दिल्ली येथे भेट घेऊन मतदारसंघात नवीन पोस्ट ऑफिसेस सुरू करण्यासंदर्भात केलेल्या मागणीला यश मिळाले आहे.

नवीन मंजूर झालेली पोस्ट ऑफिसेस पुढील गावांमध्ये सुरू होणार आहेत सांगोला तालुक्यात वाणी चिंचोली, सोनलवाडी; करमाळा तालुक्यात हिवरे, आळजापूर; माढा तालुक्यात गवळेवाडी; माळशिरस तालुक्यात मारकडवाडी; पंढरपूर तालुक्यात पिराची कुरोली, करोळे तसेच माण तालुक्यात कारखेल, हिंगणी, जांभूळनी, ढाकणी व सोकासन. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना बँकिंग सेवा, पत्र व्यवहार, आधार लिंकिंग, विमा योजना व इतर टपाल सुविधा गावाजवळच उपलब्ध होणार आहेत. यामुळे शेकडो नागरिकांचा वेळ आणि खर्च दोन्ही वाचणार आहे.

या संदर्भात खासदार धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले की, ग्रामीण भागातील सामान्य माणसाला केंद्र सरकारच्या विविध योजना सहजपणे उपलब्ध व्हाव्यात यासाठी या पोस्ट ऑफिसेस महत्त्वाची भूमिका बजावतील. यासाठी केंद्रीय संचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांचे आभार मानतो.

## संग्रामनगर येथे गौराईसमोर मांडला कर्तृत्ववान महिलांचा इतिहास देखावा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.३ सप्टेंबर-**

संग्राम नगर येथील उमेश शेटे यांच्या कुटुंबीयांनी महालक्ष्मीसमोर प्राचीन व मध्ययुगीन तेज शलाका हा देखावा सादर केला. त्यामध्ये राष्ट्रमाता जिजाऊ, सती सावित्री, याज्ञसेना महाराणी द्रोपदी, काश्मीरची राणी दिद्दा, रजया सुलतान, झाशीची राणी लक्ष्मीबाई, कित्तूरची राणी चन्नम्मा, महिषासुर मर्दिनी राणी दुर्गावती, पुण्यश्लोक अहिल्या बाई होळकर आदी कर्तृत्वान महिलांचा इतिहास व त्यांच्या प्रतिकृती मांडल्या होत्या.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षिका असलेल्या वंदना शेटे यांनी यावेळी प्रत्येकाला पुस्तक देऊन इतिहास सांगितला. देखाव्यासाठी ऋषिकेश, कौतुभ, पुष्कर यांची मदत झाली. देखावाचे सर्व साहित्य घरातील वस्तूंपासून तयार केले. हा देखावा पाहण्यासाठी परिसरातील महिलांनी गर्दी केली होती. दरवर्षी विविध देखावे सादर करण्यात त्यांचा हातखंडा आहे. यापूर्वी त्यांनी जय जवान, जय किसान, जय विज्ञान हा देखावा केला होता. स्त्रीशक्तीचं माहात्म्य सांगणं एवढाच उद्देश यात नसून ती शक्ती स्वत:मध्ये परावर्तित कशी करता येईल या दृष्टीने आणि त्या दिशेने काही प्रयत्न व्हावेत हा आमचा खरा उद्देश असल्याचे वंदना शेटे यांनी सांगितले.

## मराठा आरक्षणाचे जनक देवेंद्र फडणवीस : केदार-सावंत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ सप्टेंबर-**

मराठा समाजाला शैक्षणिक व नोकरीमध्ये आरक्षणाची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होती. १९८० च्या दशकापासून आरक्षणाची मागणी होत आहे. या काळात शरद पवार तब्बल चारवेळा मुख्यमंत्री होते. उद्धव ठाकरे एकदा मुख्यमंत्री होते. पण त्यांनी सत्ता काळात आरक्षण दिले नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार सकारात्मक आहेत.

देवेंद्र फडणवीस यांनीच मराठा समाजाला दोनवेळा आरक्षण मिळवून दिल्याने मराठा आरक्षणाचे जनक देवेंद्र फडणवीस हेच आहेत असे मत भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी व्यक्त केले. २०१४ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. २०१८ मध्ये त्यांनी मराठा समाजाला एकमताने १६ टक्के आरक्षण मिळवून दिले होते. त्यानंतर मात्र राज्यात २०१९ मध्ये महाविकास आघाडीचे सरकार आले. ५ मे २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने, हे आरक्षण ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडत असल्याचे सांगून ते रद्द केले.



> मराठा समाजातील गरजू लोकांना आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन सुरू होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनीच मराठा समाजाला आरक्षण मिळवून दिले आहे. आतापर्यंत अनेक मराठा मुख्यमंत्री असताना देखील मराठा आरक्षण देऊ शकले नव्हते. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला आरक्षण दिलं आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाचे जनक देवेंद्र फडणवीस आहेत.
>
> **- चेतनसिंह केदार सावंत, जिल्हाध्यक्ष, भाजपा**

फडणवीस यांनी मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम केले. तर शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी ते आरक्षण घालवण्याचे पाप केले. आरक्षण कोर्टात न टिकण्यामागे शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचा हात आहे. जून २०२२ मध्ये राज्यात महायुतीचे सरकार आले. या सरकारने २०२४ च्या फेब्रुवारी महिन्यात विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात मराठा आरक्षण विधेयक २०२४ सादर करून ते एकमताने मंजूर केले. या विधेयकाद्वारे मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकरीत १० टक्के आरक्षण देण्यात आले. देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाच्या मूळ प्रश्नावर भर देत अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या तीन नवीन योजना सुरू करून ८०० कोटीपेक्षा अधिक निधी दिला. मराठा समाजातील मुलांना शिक्षणासाठी मदत करताना राज्य सरकारने राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सुरू केली असे मत चेतनसिंह केदार सावंत यांनी व्यक्त केले.

## वेळापुरात मराठा समाजाचा विजयोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ३ सप्टेंबर-**

मराठा समाजाच्या ऐतिहासिक लढ्याला यश मिळताच वेळापूर शहरात उत्साहाची लाट उसळली. मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली पाच दिवस चाललेल्या उपोषणानंतर राज्य सरकारने मराठा समाजाच्या प्रमुख मागण्यांना मान्यता देत शासन निर्णय हाती दिला. या निर्णयानंतर मराठा बांधवांनी जल्लोषात शहर दुमदुमून टाकले.



काल संध्याकाळी पालखी चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ मराठा समाजातील तरुण कार्यकर्त्यांनी गुलालाची मुक्त उधळण करीत एक मराठा लाख मराठा, मनोज रंगे पाटलांचा विजय असो अशा गगनभेदी घोषणा दिल्या. चौक रंगीबेरंगी गुलालाने नटून गेला आणि वातावरणात उत्साह, ऐक्य व सम ाधानाचे सूर गुंजत राहिले. सरकारने पाच ते सहा महत्वाच्या मागण्यांना मान्यता दिल्याने मराठा समाजाच्या संघर्षाला न्याय मिळाल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

वेळापूरसह संपूर्ण महाराष्ट्रात जल्लोषाचे व उत्सवाचे वातावरण असून समाजातील बांधवांमध्ये अभूतपूर्व समाधान दिसून येत आहे. वेळापूरचा पालखी चौक काल हालग्यांचा कडकडाटासह गुलाबी, केशरी, लाल रंगांनी उजळून निघाला आणि मराठा बांधवांच्या विजयाचा जल्लोष प्रत्येकाच्या मनाला स्पर्शून गेला. यावेळी मराठा समाज बांधव तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## मोडनिंब येथे मराठा समाजाचा आनंदोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ३ सप्टेंबर-**

मराठा आरक्षण लढ्याला यशाबद्दल मोडनिंब (ता. माढा) येथे सकल मराठा समाजाच्या वतीने फटाके फोडून, पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.हैदराबाद गॅझेटियरमधील नोंदी विचारात घेत मराठा सम ाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी किंवा मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्याबाबतचा शासन निर्णय जारी झाल्यानंतर तसेच इतरही मागण्यांबाबत सरकारने सकारात्मकता दर्शवल्यानंतर मनोज जरांगे-पाटील यांनी आपले आमरण उपोषण मागे घेतले.



त्यानंतर मोडनिंब सकल मराठा बांधवांनी पारंपरिक वाद्याच्या तालावर भगवा उधळण करत जल्लोष केला.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी 'जय भवानी, जय शिवाजी,मनोज जरांगे पाटील तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है. एकच मिशन मराठा आरक्षण, हम सब जरांगे, एक मराठा लाख मराठा', अशा घोषणा देत दत्त चौकात पेढे वाटून जल्लोष केला. मराठा समाजातील गोरगरिबांना यामुळे न्याय मिळेल. महाराष्ट्रातील कोट्यवधी जनतेचे त्यांच्यामुळे कल्याण झाले. मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील यांचे आभार मानण्यात आले. शहरातून विजयी पदयात्रा काढण्यात आली. दुचाकी, चारचाकी रैली काढण्यात आली. चौकाचौकात तरुणांनी तोफा वाजवून, फटाके फोडून आनंद साजरा केला.